श्री रामदास स्वामी संस्थान,सज्जनगड,संचालित

मासिक

# ॥ रघुवीर समर्थ ॥

एप्रिल २०१३,
वर्ष सातवे, अंक चौथा,
मुल्य रु. १५

e-mail : raghuvirsmasik@gmail.com



॥ श्रीरामं मारुतीं वंदे रामदासो जगद्गुरुं ॥

## श्रीसमर्थ रचित भावकाव्य...!

# धन्य ते वानर ...!

हुले कपाळ ज्यांचे । घुले पाहाणे त्यांचे ।
फुटाणे आणि चण्यांचे। आर्त बहु ।। धृ ।।
वांकुल्या दाविती। कुंसी कांडोळीती ।
उडाणे घेता लोंबती । लांगुळे लांबे ।। १ ।।
मऊ किरकोळे बोटे । लांब नखे तिखटे ।
खोउनी फोडिती पोटे । निशाचरांची ।। २ ।।
संकोचित बैसणे । पाला वरपोनी खाणे ।
तातडी चाविता चणे । हनुवटी हले ।। ३ ।।
कुळ हनुमंताचे । मोठे किराण त्यांचे ।
भुभुकारे जयांचे । किलकिलाटे ।। ४ ।।
आता वाटते जावे । त्यांचे सांगाती व्हावे ।
डोळे भरुनी पहावे । सर्वांग त्यांचे ।। ५ ।।
ऐकोनि हंसाल परी । नये त्यांची सरी ।
विचार जयांसी करी । स्वामी माझा ।। ६ ।।
असंख्य मिळाला मेळा । रामा भोंवता पाळा ।
पालथे या भुगोळा । घालू शकती ।। ७ ।।
ऐसी करणी त्यांची । व्यर्थ जीणी आमुची ।
पाला खाऊनी रामाची । सुश्रुषा केली ।। ८ ।।
ऐसे ते रामदास । सर्वस्वे उदास।
रामी जयांचा विश्वास । बाणोनी गेला ।। ९ ।।

(पदरचना पृ. क्र. ५९७ – समग्र समर्थ साहित्य, सुमंगल प्रेस)



श्री रामदासस्वामी संस्थान, सज्जनगड, संचालित

मासिक

# ।। रघुवीर समर्थ ।।

• वर्ष सातवे
• अंक चौथा

एप्रिल २०१३/ फाल्गुन शके १९३४ -चैत्र शके १९३५





पू. श्रीधरस्वामी
पुण्यतिथी अभिवादन
चैत्र कृ. २

• वार्षिक वर्गणी : रु. १५०
• चार वर्षांसाठी : रु. ५००
• आठ वर्षांसाठी : रु. १०००

**नमः शांताय दिव्याय सत्यधर्मस्वरुपिणे ।**
**स्वानंदामृततृप्ताय श्रीधराय नमो नमः।।**

• मालक •
श्री रामदास स्वामी संस्थान,
श्री रामदास स्वामींचा मठ,
मु.पो. सज्जनगड, ता.जि. सातारा.
पिन ४१५०१३
फोन (०२१६२) २७८२२१
Website :
www.samartharamdas.com
E-mail :
samartharamdas@gmail.com

• संपादक •
स. भ. मंदारबुवा रामदासी
• कार्यकारी संपादक •
डॉ. सौ. ज्योत्स्ना कोल्हटकर
• मानद उपसंपादक •
स. भ. मोहनबुवा रामदासी
• संपादन साहाय्य •
स. भ. अमृतबुवा रामदासी
• मुखपृष्ठ •
सौ. अर्चना धीरज पेटकर
• प्रकाशक/मुद्रक •
श्री. सूर्याजी गवालाक्ष स्वामी (C.A.)
श्री रामदास स्वामी संस्थान,
सज्जनगड, जि. सातारा,
• मुद्रण स्थळ •
श्री गजानन प्रेस,
७६ अ, चिमणपुरा, सातारा
• सल्लागार मंडळ •
– श्री. भूषण महारुद्र स्वामी
– ॲड. महेश. ना. कुलकर्णी
– ॲड. राजेन्द्र. ना. कुलकर्णी
– श्री. विजय प. ठोंबरे
– कलेक्टर अँड कोर्ट ऑफ वॉर्डस् सातारा यांचे प्रतिनिधी

हे मासिक प्रकाशक श्री रामदास स्वामी संस्थानचे वतीने प्रकाशक व मुद्रक श्री. सूर्याजी गवालाक्ष स्वामी यांनी श्री रामदास स्वामींचा मठ, मु.पो. सज्जनगड, ता.जि.सातारा, (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. श्री गजानन प्रेस, ७६ अ, चिमणपुरा, सातारा येथे मुद्रित केले.
संपादक– स. भ. मंदारबुवा रामदासी

• लेखातील मजकुराशी संपादक/प्रकाशक/सल्लागार सहमत असतीलच असे नाही.

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| • **संपादकीय** | मंदारबुवा रामदासी | ४ |
| • **समर्थ महाद्वार** | श्री. गिरीष देशपांडे | ६ |
| • **चिंतन दासबोधाचे** | श्री. मोहनबुवा रामदासी | ८ |
| • **वर्तमानाच्या संदर्भात ‘दासबोधा’चे महत्त्व** | श्री. अरविंद ब्रह्मे | १० |
| • **जनीं सर्वसूखीं असा कोण आहे ?** | डॉ. कमलेश सोमण | १४ |
| • **अभंग योगवासिष्ठ** | श्री. वामन वा.कोल्हटकर | १८ |
| • **यज्ञसंकल्पना-१** | शरयु दाते, रामदासी | २४ |
| • **समर्थांचा राम** | सौ. सीमा रिसबूड | २७ |
| • **तुका म्हणे (अभंग ३ रा)** | सौ. माधुरी दि. जोशी | ३० |
| • **दृष्टांत** | अमृतबुवा रामदासी | ३३ |
| • **समर्थ युवा स्पंदन** | श्री. ग. प्र. कुलकर्णी | ३४ |
| • **दास म्हणे** | श्री. प्रसादबुवा रामदासी | ३६ |
| • **दासबोध-सानुल्यांसाठी** | सौ. अनुजा सोमण | ३८ |
| • **जुना दासबोध-सगुणध्यान (लेखांक ९ वा)** | सौ. मंजिरी श. धूपकर | ३९ |
| • **नमस्कार माझा सद्गुरु रामदासा (६)** | सौ. संध्या कोल्हटकर | ४२ |
| • **दासनवमी कार्यक्रम वृत्ते** | | ४५ |



## संपादकीय

# जनाकारणे देव लीलावतारी...

*सर्व समर्थ भक्तांसी*
*सादर जय रघुवीर!*

*सर्वप्रथम श्रीदासनवमीच्या निमित्ताने प्रकाशित झालेल्या मार्च महिन्यातील 'उपासनामार्ग प्रदीप' या विशेषांकाचे सर्व समर्थ भक्त, वाचकांनी उत्स्फूर्त स्वागत केले, त्याबद्दल अंतःकरणपूर्वक धन्यवाद! श्रीसमर्थरूपी ज्ञानसूर्यापासून प्रवर्तित झालेला हा बोधरूप प्रकाश आपणा सर्वांची अंतःकरणे उजळीत, या 'रघुवीर समर्थ' मासिकाच्या माध्यमातून बिंबित-प्रतिबिंबीत होतो. यातून मिळणारी प्रसन्नता हाच श्रीसमर्थ कृपेचा प्रसाद!*

***।।श्रीरामं मारुतिं वन्दे रामदासो जगद्गुरुं ।।***

*चैत्र महिना सकल रामदासी जनांसाठी पर्वणीच घेऊन येतो. या महिन्यात प्रभु श्रीरामचंद्रांची जयंती (चैत्र शु. ९) श्री मारुतीरायाची जयंती (चैत्रपौर्णिमा), श्रीसमर्थ रामदास स्वामी जयंती (चैत्र शु.९) असा भक्तीचा, गुरुस्मरणाचा वसंतोत्सव साजरा होतो. 'श्रीरामं मारुतिं वन्दे रामदासो जगद्गुरुं' ही श्रीगुरुवंदना चैत्रात श्रीगुरुस्मरणाच्या त्रिवेणी संगमात न्हाऊन सार्थ ठरते.*

***हनुमंत आमुची कुळवल्ली । राममंडपा वेला गेली ।***
***श्रीरामभक्तीने फळली । 'रामदास' बोले या नावे ।।***

*'रामदासी अग्रगण्यु' अशा मारुतीरायाच्या उपासनेने, त्यांच्या चरित्राच्या चिंतन, मननाने व कृतीभक्तीने मारुती श्रीरामाजवळ घेऊन जातो, रामत्वाचा अनुभव देतो. साधक रामत्वाच्या बोधात राहूनही श्रीरामाची सगुण भक्ती विसरत नाही. किंबहुना 'श्रीरामभक्ती' हेच त्याचे जीवन होते. या श्रीरामभक्तीरूपी जीवनाच्या सिंचनाने परमार्थाच्या वेलीला 'रामदास्याचे' मधुर फळ येते. साधक खरा 'रामदासी' होतो. या परमार्थवेलीला आलेली पाने-फुले, फळेही श्रीसद्गुरूचरणी, श्रीरामचरणी सहज समर्पित होतात. कारण या परमार्थवेलाचा आधारही राम आणि मंडपही रामच! चैत्र महिन्यात जन्मोत्सवाच्या निमित्ताने पुनश्च भक्तीचे, दास्याचे नवे अंकुर, नवी पालवी फुटते. ही परमार्थ वेला लक्षावधी जनांच्या जीवनाचा आधार होते, त्यांना समाधानाची, आनंदाची छाया देते.*

*जयंती महोत्सवाच्या निमित्ताने भक्तांच्या भावविश्वात भगवंताचे-संतांचे अवतरण ही एक रम्य लीला आहे. एवढेच नव्हे, तर संपूर्ण विश्वालाच भगवंत आणि संतांच्या स्मरणाचा मोठा आधार आहे. या विश्वात जी नीती, सदाचार, सत्प्रवृत्ती अस्तित्वात आहे. ती या सत्-चित्-आनंदरूप असलेल्या ईश्वरावरील श्रद्धेमुळेच! एरव्ही कायद्याने नीती-सदाचार निर्माण होत नाहीत, कायदा फक्त रक्षण करू शकतो. मात्र भक्ती ही सत्प्रवृत्तींना जन्म देते. म्हणूनच आपण भक्तीच्या माध्यमातून श्रीराम, श्रीमारुती व श्रीसमर्थांचा जन्मोत्सव, त्यांचे अवतरण साजरे करतो. या पार्श्वभूमीवर श्रीसमर्थांनी समजावलेली अवतार संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे. विवेकाच्या आधाराने व्यापक झालेल्या सत्पुरुषांना अवतार असे संबोधिले जाते.*

*विवेकें बहुत पैसावले । म्हणौन अवतारी बोलिले ।*
*मनु चक्रवती जालें । येणेंचि न्याये ।।दा.१५-३-५ ।।*

*जीवन कसे जगावे ? कशासाठी जगावे ? याचे समग्र शिक्षण देण्यासाठी अवतार असतो.*

*जनाकारणे देव लीळावतारी । बहुतांपरी आदरे वेषधारी ।*
*तया नेणती ते जन पापरूपी । दुरात्मे महानष्ट चांडाळ पापी ।।म.श्लो. १२६।।*

*भक्तांनी या थोर अवतारांच्या चरित्राचे परिशीलन करून ही जीवनमूल्ये आत्मसात करावीत, अवतारांची शिकवण व वर्म जाणून घ्यावे असे श्रीसमर्थांचे सांगणे आहे.*

*येक जाणणे करून परतें । कोण सोडी प्राणियातें ।*
*कोणी येक कार्य जे ते । जाटिल्याविण न कळे ।।दा.८-४-३८ ।।*
*जाणणें म्हणिजे स्मरण । नेणणें म्हणिजे विस्मरण ।*
*दोहींमध्ये कोण प्रमाण । शाहाणें जाणती ।।दा.८-४-४० ।।*
*जाणतां समर्थांचे अंतर । प्रसंगें वर्तें तदनंतर ।*
*भाग्य वैभव अपार । तेणेंचि पावे ।।दा.८-४-३० ।*

*''रामो विग्रहवान धर्मः''- श्रीराम म्हणजे साक्षात् मूर्तिमंत धर्मच होय. अशा सकलसद्‌गुणमंडित स्वामी श्रीरामाचे मारुतीप्रमाणे दास्य करणारा भक्त 'समर्थ'होतो. त्याचे ठिकाणी 'रामत्व' आणि 'दासत्व'-अंतरी सामरस्य आणि बाहेर सामंजस्याच्या रूपाने नांदते. अशाप्रकारे व्यक्तीचे व्यष्टी आणि समष्टी स्तरावरील जीवन हळूहळू सर्वार्थाने पुष्ट होते. यास्तव देशभरातील शेकडो रामदासी मठांमध्ये जन्मोत्सवाचे प्रयोजन असते.*

*याकारणे समुदाव । जाला पाहिजे महोत्साव ।*
*हातोपाती देवाधिदेव । वोळेसा करावा ।।दा.१२-१०-३५ ।।*

*श्रीराम, श्रीमारुती, श्रीसमर्थ तत्वरूपाने सदैव सर्वांतर्यामीच आहेत. त्यांच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने बोधरूपाने त्यांचे अवतरण साजरे करूया !*

*।। जय जय रघुवीर समर्थ ।।*

*- मंदारबुवा रामदासी (भ्रमणध्वनी - ९७६३२७१४०७)*
C/o स.भ. मीनाताई भावे, श्रीधर-दत्त निवास, ४८४/८७, मित्रमंडळ सोसायटी, पुणे-४११ ००९.


## 'रघुवीर समर्थ' मासिकातील पृष्ठ प्रायोजनासंबंधी आवाहन

एप्रिल २०१३ च्या अंकापासून **'रघुवीर समर्थ'** मासिकासाठी पृष्ठ प्रायोजकत्व स्वीकारले जाईल.

आपण आपल्या नावाने आपल्या दिवंगत आप्तेष्टांच्या स्मृतीप्रीत्यर्थ किंवा परिवारातील सदस्याच्या वाढदिवसाप्रीत्यर्थ श्रीसमर्थ विचारांचा प्रसार व प्रचार सेवा म्हणून अंकातील एक अथवा अधिक पानांचे प्रायोजकत्व स्वीकारू शकता. प्रायोजित केलेल्या पानावर आपले नाव छापले जाईल.

**पृष्ठ प्रायोजनाचे दर : एका अंकातील एका पानासाठी रु. ५००/-**

**अधिक माहितीसाठी संपर्क- स. भ. मंदारबुवा रामदासी, ९७६३२७१४०७, श्री. रवि देशपांडे ९४०५५४२४६१**




सर्व समर्थ भक्तांसि
सादर जय रघुवीर!

**देवाच्या सख्यत्वासाठी । पडाव्या जिवलगांच्या तुटी ।।**
**सर्वस्व अर्पावे सेवटी । प्राण तोही वेचावा ।।**

समर्थांनी आपले अवघे आयुष्य देवाच्या कार्यासाठी रामाच्या आज्ञेनुसार धर्माच्या रक्षणासाठी, जड जीवांच्या उद्धारासाठी वेचले. एवढेच नव्हे तर जसे रामाने वाल्मिकी रामायणात आधीच वर्णन करून ठेवल्यानुसार नरदेहधारी रामाने आचरण करून आदर्श निर्माण केला, तद्वतच वरील वचनानुसार स्वामींनीही आदर्श जीवन पद्धतीचा अवलंब केला. विवेक - वैराग्य, औदार्य, धैर्य, क्षमाशीलतेचा अत्युच्च कोटीचा जणू आदर्श म्हणजे त्यांचे अवघे जीवन म्हणून सर्वांना परिचित झालेय. देश-विदेशांत रामदास स्वामींच्या व्यवस्थापनावर चिंतन होतेय ह्यानुसार तत्त्वप्रणाली ठरवून आचरण करण्याचा संकल्पही समाज करतोय. दासबोध - आत्माराम- मनाचे श्लोक ह्या त्यांच्या चिरंतन वाङ्मयाद्वारे मार्गदर्शक असा अमोल ठेवा (हिरे-माणके व्यावहारिक नव्हे) त्यांनी कल्याणस्वामींच्या माध्यमातून आपणास उपलब्ध करून ठेवलाय. त्याच्या श्रवणाने- मननाने-निजध्यासानेच परमार्थातील सायोज्यमुक्तीचा मार्ग सुगम झालाय यात तिळमात्र शंका नाही! अशा महापुरुषाचे पुण्यस्मरण ''दासनवमी'' साजरी करून सर्व समर्थ भक्त करीत असतात. ह्यावर्षी ''दासनवमीचा हा महोत्सव' (३३१ वी) शके १९३४, नंदननाम संवत्सर माघ वद्य १ ते माघ वद्य १० दि. २६/२/२०१३ ते ६/३/२०१३ असा श्रीरामदास स्वामी संस्थान सज्जनगड सातारा येथे मोठ्या दिमाखाने व सर्व परंपरांचे आचरण करून, पारंपरिकरीत्या समर्थ वंशज व रामदासी मंडळी अनेक समर्थ भक्तगण (भारतातील, विदेशातीलही) सर्व सज्जनगड रहिवासी, मानकरी, पंचक्रोशीतील भक्तगण यांच्या उपस्थितीत अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात श्रद्धायुक्त अंतःकरणाने संपन्न झाला.

''दासनवमी उत्सवाची'' सुरुवात परंपरेनुसार उद्वार्चनाने होत असते. दि. २५/२/२०१३ रोजी सकाळी रामपंचायतन मूर्तींना-अभ्यंगस्नान- अभिषेक झाला. संस्थानचे अध्यक्ष श्री. भूषण स्वामी यांच्या हस्ते हा सोहळा झाला. त्यानंतर राममूर्ती (पंचायतन) पुन्हा त्यांच्या स्थानी स्थानापन्न झाल्यानंतर समर्थांच्या समाधीला अभिषेक पूजा करण्यात येऊन दासनवमी महोत्सवास प्रारंभ झाला. दि. २६/२/२०१३ सकाळी काकड आरती (५ वाजता) त्यानंतर समाधीला षोडशोपचार अभिषेक पूजा आरती असा धार्मिक विधी झाल्यानंतर खरी उत्सवाला सुरुवात झाली. ह्या दासनवमी महोत्सवात सतत दहा दिवस समाधी मंदिरात गायन-वादन-कीर्तन-प्रवचन इ.ची रेलचेल होती. दहा दिवसांचा नैमित्तिक कार्यक्रम असा होता.

सकाळी ५ वाजता काकड आरती-
,, ६ वाजता समाधीस अभिषेक पूजा आरती
,, ८ ते ९ प्रवचन
,, १० ते ११ सांप्रदायिक भजन
,, ११ ते १२ छबिना व तेरा प्रदक्षिणा
दुपारी १२ ते १२.३० अध्यात्म रामायण
,, १२.३० ते २.३० महाप्रसादाचे वाटप
सायंकाळी ६ ते ७ दैनंदिन उपासना
,, ७ ते ७.३० सायं आरती
रात्री ८ ते ८.३० छबिना (पालखी)
,, ९ ते ९.३० दासबोधाचे वाचन व आरती
,, ९.४५ ते १०.१५ महाप्रसादाचे वाटप
,, १०.१५ ते १२.१५ कीर्तन

दासनवमी महोत्सवात रोज विविध कार्यक्रम सादर करण्यात आले. भक्तांनी मोठ्या संख्येने सर्व कार्यक्रमाचा आनंद घेतला.

या दासनवमी महोत्सवाच्या काळातच दि. ३/३/२०१३ रोजी सज्जनगडावरील गुरुत्वाकर्षण पाणी योजनेचे उद्घाटनही संपन्न झाले. सज्जनगडावर जिवंत पाण्याचे झरे नाहीत. पूर्वी उरमोडी नदीचे पाणी वीजपंपाद्वारे परळी मार्गे गडावर आणले होते पण खर्चिक व अपुरा पाणीपुरवठा होत असे त्यावर उपाय म्हणून जवळच असलेल्या पांगारी धरणाचे पाणी गडावर आणण्याची योजना श्री. सु. ग. स्वामींनी शासनाकडे मांडली, तिचा सतत योग्य मार्गाने पाठपुरावा केला आणि समर्थांच्या कृपेने भक्तांची दैना संपली. माननीय अजितदादा पवार यांनी जातीने लक्ष देऊन योजनेतील सर्व अडसर दूर केले व ही १.५० कोटी रु.ची सायफन पद्धतीची योजना यशस्वीरीत्या कार्यान्वित करण्यात मोलाचा वाटा उचलला. आता स्वच्छ, निर्मळ, मुबलक असे पाणी गडावर उपलब्ध झाले आहे ही समर्थांचीच कृपा होय. लोकसहभागातून ही योजना पूर्णत्वास गेली. दासनवमी महोत्सवाची सांगता दि. ६/३/२०१३ रोजी ह.भ.प. श्री. राघवेंद्र बुवा यांच्या ललिताच्या कीर्तनाने झाली.त्यानंतर सर्व समर्थ भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. पंधरा ते सोळा हजार भक्तांनी याचा लाभ घेतला.

**सदा सर्वदा राम सन्निध आहे।**
**मना सज्जना सत्य शोधूनि पाहे।**
**अखंडीत भेटी रघुराज योगु।**
**मना सांडी रे मीपणाचा वियोगु।।**

स्वामींच्या मते दास्यभक्तीच्या योगे देव आपलासा करता येतो. तो सतत आपल्याजवळच असतो. परंतु अहम्‌पणामुळे दूर असलेल्याचा भास निर्माण होतो. जेव्हा तो अहम् संपतो त्या प्रत्येकवेळी अखंड रघुराज भेटीचा योगु आपल्या जीवनात जुळून येतो. या दासनवमीच्या योगावर-पर्वावर जशी मारुतीराय व रामदास स्वामींनी रामाची दास्यभक्ती केली तशीच आम्हा पामरांकडून घडावी अशी त्यांच्या चरणी लीन होऊन प्रार्थना करूया व त्यांनी दाखवलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आचरण करून आपणही सत्‌चित् आनंदाचा अनुभव चाखूया. ।।इतिश्री।।

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

# युवा संस्कार शिबिर, सज्जनगड



दिनांक १ जून २०१३ ते ९ जून २०१३ या कालावधीमध्ये श्रीक्षेत्र सज्जनगड येथे श्रीरामदास स्वामी संस्थानद्वारा आयोजित संस्कार शिबिर संपन्न होणार आहे.

शालेय सुट्टीचे कालावधीमध्ये युवा वर्गासाठी (वय १५ ते २५ वर्षेपर्यंत मुले व मुली) श्रीरामदास स्वामी संस्थानतर्फे विनाशुल्क संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. या शिबिराच्या माध्यमातून मनाचे श्लोक, व्यायाम, सूर्यनमस्कार, प्राणायाम योगासने, समर्थ वाङ्मयातून सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास, दैनंदिन उपासना असे अनेक प्रबोधनात्मक आणि संस्कारक्षम सांस्कृतिक कार्यक्रम सज्जनगडावर संपन्न होणार आहेत.

पाश्चात्य संस्कारांचे अनुकरण हे आजकाल आपला सहज स्वभाव होऊन गेला आहे. पण त्यास आवश्यकतेप्रमाणे घेऊन भारतीय संस्कृतीची उपासना आपल्या युवा वर्गातून घडावी आणि उपासनेकरिता त्याच्या माहितीची जोपासना व्हावी व मनाने सक्षम व विचारांनी सुसंस्कृत अशी युवा पिढी समजात कार्यरत व्हावी, या सद्‌हेतूने या संस्कार शिबिराचे आयोजन श्री शिवसमर्थांच्या पदस्पर्शाने शतशः पुण्य-पुनीत झालेल्या श्रीक्षेत्र सज्जनगडावर श्रीरामदास स्वामी संस्थान तर्फे आयोजित करण्यात आलेले आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क - **श्रीरामदास स्वामी संस्थान सज्जनगड.** कार्यालयः फोन- ०२१६२- २७८२२१
**शहाजीबुवा रामदासी** ९४२१८७१८६८ **अमृतबुवा रामदासी-** ९४०४५९०७७३
**आनंदबुवा रामदासी-** ९४०५११०१६२



# चिंतन दासबोधाचे

स. भ. मोहनबुवा रामदासी, सज्जनगड, मो. ९४२११७७८२१

## गणेश स्तवन

दासबोध ग्रंथाचा मुख्य उद्देश पहिल्या समासात सांगून झाला. नंतर समर्थ गणेशाचे नमन करतात. वास्तविक पाहता, ग्रंथाच्या आरंभी गणेशाचे चिंतन करावे अशी प्रथा असताना, समर्थांनी प्रथम ग्रंथारंभ लक्षणात ग्रंथाचे प्रयोजन सांगितले. अर्थात हे सांगत असताना समर्थांनी ही प्रथा किंवा परंपरा सोडली असे अजिबातच वाटत नाही; कारण ज्या विषयाचे चिंतन समर्थांनी पहिल्या समासात मांडले ते सुद्धा गणेशाचे अंतरात चिंतन करूनच मांडलेला आहे. अंतःकरणाची व्याप्त भूमिका जेव्हा निर्माण होते तेव्हा विचारांची आकाशभेदी भूमिका पहावयास मिळते. अंतःकरणाची व्याप्ती किंवा विशालता परंपरा आणि संकुचित भावनांना फारसा थारा न देता आध्यात्मिकदृष्ट्या विधायक विचारांचाच सतत विचार करत असतात. विचारांचा विचार करून सर्व अविचारांना बाजूला करून समर्थ स्वतःच्या अनुभूतिचे विचार मांडतात.

गणेशाचे चिंतन मांडतानासुद्धा समर्थ या समासात म्हणतात

**ॐ नमोजी गणनायका। सर्व सिद्धी फलदायका।**
**अज्ञान भ्रांती छेदका। बोधरूपा ।।**

गणेशाला वंदन करून किंवा प्रार्थना करून आपण आपल्या प्रपंचाबद्दल भौतिक व्यवहाराचे मागणे मागतो म्हणजे आपण सुरुवातीला गणेशाच्या प्रार्थनेत स्वतःबद्दल मागणे मागतो. पण इथे मात्र समर्थ म्हणतात, गणेश हे केवळ सिद्धी नाही तर सर्व सिद्धींचे फळ आहे. समर्थांना सिद्धी हवी होती ती अज्ञान आणि भ्रांती समूळ नष्ट करण्यासाठी हवी होती. हीच सिद्धी सर्वार्थाने श्रेष्ठ आहे. गणेशाची कृपा झाल्यानंतर त्यांच्या कृपेने भ्रांतीचे अवस्था दूर होईल. ती भ्रांती अध्यात्मात साधकाचे खूपच नुकसान करत असते. गणेशाचे चिंतन केले, ध्यान केले तर परम समाधान वाटेल. ज्या सत्यसमाधानासाठी आपण तहानलेलो आहोत त्या समाधानासाठी समर्थ गणेशाचे चिंतन करावे असे सांगतात.

गणेशाच्या दर्शनाने आणि कृपेने मन पांगळे व्हावे असे मागणे मागणारे समर्थ गणेशाच्या दर्शनाची आणि कृपेची फलश्रुती सांगतात.

चौदा विद्यांचा गोसावी म्हणूनच समर्थ गणेशाकडे पाहत म्हणजे गणेशाकडे कोणत्या दृष्टीने पहावे व आपण कोणत्या दृष्टीने पाहत आहोत हे समर्थ सांगतात. सर्व विद्यांचा आगर असणाऱ्या गणेशाला काय मागावे हे समर्थ सांगतात.

जे मूर्ख आहेत, अवलक्षणी आहेत जे अत्यंत हीन दर्जाचा विचार करतात, ज्यांचे मन शुद्ध नाही त्याने गणेशाचे चिंतन करून व परम समर्थ असणाऱ्या गणेशाची पूजा करत असताना समर्थ आपल्यासाठी हे मागत असतात.

**ऐसा गणेश मंगलमूर्ति। तो म्या स्तविला येथामती।**
**वांच्छ धरून चित्ती। परमार्थाची ।।**

हाच समर्थांचा समर्थ विचार आपण अंतःकरणाशी घट्ट धरावा.

## आता वंदीन वेदमाता

प्रत्येक ग्रंथामध्ये गणेश, शारदा, सद्गुरू हे त्रिकुट ठरलेले आहे. त्यांचा क्रमही ठरलेला असतो. या संपूर्ण विश्वात एक शुद्ध जाणीव व्यापून राहिली आहे तिला गणेश असे म्हणतात. तसेच या विश्वामध्ये एक शुद्ध आणि अत्यंत सूक्ष्म अशी शक्तीदेखील व्यापून आहे. तिला शारदा असे म्हणतात. ज्यांच्या कृपेमुळे ही शक्ती

जागृत होते व शुद्ध जाणिवेचे ज्ञान होऊन समाधानाची प्राप्ती होते, त्यांना सद्‌गुरू असे म्हणतात. परमार्थाची सुरुवात , मध्यंतर आणि अंतिम साध्य या तिन्हींच्या माध्यमांतूनच होतो. गणेश शारदेच्या माध्यमातून सद्‌गुरूंची प्राप्ती आणि सद्‌गुरूंच्या प्राप्तीसाठीच गणेश शारदेचे चिंतन असे हे एकमेकात फुलांच्या माळेप्रमाणे हे तिघांचे स्थान आहे. गणेश ही बुद्धीची देवता आहे तर शारदा ही शक्तीची देवता आहे. कलियुगामध्ये बुद्धी आणि शक्तीची देवता म्हणून गणेश, शारदेकडे पहावे.

गणेशाच्या रूपाने ज्ञान होते तर शारदेच्या रूपानेच ते ज्ञान व्यक्त होते. ज्ञानानंतर त्या ज्ञानाची अभिव्यक्ती फार महत्त्वाची आहे. ज्ञान अभिव्यक्त झाल्यानंतर सद्‌गुरूंच्या भेटीने याच ज्ञानाचे विज्ञानात रूपांतर होईल. गणेश प्रत्यक्ष ईश्वर तर शारदा ही माया आहे. गणेश पुरुष तर शारदा त्रिगुणात्मक आहे. गणेश स्वाधीन तर शारदा पुरुषाधीन आहे. ध्वनी लहरींचा शोध हे गणेशाचे स्वरूप आहे. तर त्या बद्दलची उपकरणे हे शारदेचे स्वरूप आहे. अध्यात्म आणि विज्ञानाचे यथासांग वर्णन करणारा ग्रंथ म्हणजे दासबोध. शारदेला समर्थ वेदांची माता म्हणतात. जिच्यामुळे वेद जन्माला आले, शब्दांचे मूळ आणि शब्दांकुर जन्माला घालणारी शारदा शब्दांच्या आतले सामर्थ्य म्हणजे शारदा शब्दांचा अर्थ समजला तरच त्याला महत्त्व आहे. योगी जे असतात, त्यांची महासमाधी म्हणजे शारदा. विद्येला जन्म देणारी शारदा अविद्या संपवून टाकते.

परमार्थाचे मूळ अत्यंत महत्त्वाचे आहे. मूळाचा शोध घेत असताना त्या मूळाशी शारदाच असते. स्वरूप स्थितीचा अनुभव फक्त तिच्या कृपेमुळेच प्राप्त होतो. निर्गुणाची ओळख आणि अनुभवाची खूण पटवून देणाऱ्या शारदेचे वर्णन समर्थ त्यांच्या वेगळ्या अनुभूतीतून देतात. हे वेगळे चिंतन जेव्हा आपण अनुभवतो तेव्हा समर्थ आपल्याला शारदेच्या अंतरंगात घेऊन जातात; ती शारदा आपल्यामध्येच आहे. तिचा परिचय ही जीवनाची खऱ्या अर्थाने फलश्रुती आहे.

**।।जय जय रघुवीर समर्थ।।**


।। श्रीराम समर्थ ।।

# श्रीमत् ग्रंथराज दासबोध सामुदायिक पारायण सोहळा




**श्री अष्टविनायक गणपती मंदिर, सरस्वतीनगर, उद्योगभवन समोर, विश्रामबाग, सांगली**

**वैशाख शुद्ध १ शुक्रवार दि. १० मे २०१३ ते वैशाख शुद्ध ७ गुरुवार दि. १६ मे २०१३**

श्रीसमर्थ सद्‌गुरु रामदास स्वामी यांचे कृपेने श्रीसंत वेणास्वामी यांच्या सान्निध्यात पावन झालेल्या सांगली शहरामध्ये श्री अष्टविनायक गणपती मंदिर, सरस्वतीनगर, उद्योगभवन समोर, विश्रामबाग, येथे विघ्नहर्त्या गणेश नगरीमध्ये वैशाख शुद्ध प्रतिपदा शुक्रवार दि. १० मे २०१३ ते वैशाख शुद्ध सप्तमी गुरुवार दि. १६ मे २०१३ अखेर श्रीमत् ग्रंथराज दासबोध सामुदायिक पारायण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

श्रीसंत वेणास्वामी, मिरज मठाचे मठपती श्री कौस्तुभबुवा रामदासी व श्री माधव रामचंद्र देशपांडे, सज्जनगड संपर्क कार्यालय, सांगली यांचे मार्फत तसेच श्री रामदास स्वामी भक्त परिवार, विश्रामबाग, सांगली-मिरज आणि इतर यांचे सौजन्याने कार्यक्रम पत्रिकेनुसार संपन्न होईल. तरी जास्तीत जास्त भक्तगणांनी तन, मन, धनानी याचा लाभ घ्यावा.

आपले विनीत,

**समर्थ विचार प्रबोधिनी, विश्रामबाग, सांगली**

**आधिक माहितीसाठी संपर्क**

| | |
|---|---|
| श्री. माधव देशपांडे | ९८६०२४२४२३ |
| श्री. मोहन गोसावी, | ९४२२६१३३३० |
| श्री. अरविंद मालेकर, | ९३७०७७१४४७ |
| श्री. कौस्तुभबुवा रामदासी | ९८५०९९४८९८ |
| | ९४०४७०६०६९ |

# वर्तमानाच्या संदर्भात 'दासबोधां'चे महत्त्व

**श्री. अरविंद ब्रह्मे, पुणे**- मो.९७६७४३९९४०

(फेब्रुवारी २०१३ च्या अंकापासून पुढे चालू)

माणसाच्या हातून होणाऱ्या कोणत्याही कामापासून त्याला व इतरांना आनंद, समाधान मिळावे यासाठी समर्थ कर्माचा संबंध भक्तीशी जोडतात. भक्ती आणि कर्म यांच्या संयोगाला ज्ञानाचे कोंदण लाभले तर पुरुषोत्तम आकारणे सुकर व सुलभ होईल. यासाठी जीवनात ज्ञानाला महत्त्व आहे. ज्ञानाचा संबंध थेट बुद्धीशी असून बुद्धी हा दुर्लभ, दुर्मीळ मानवी गुण आहे. बुद्धीमुळेच मनुष्यप्राणी इतर सजीव प्राण्यांहून वेगळा व श्रेष्ठ आहे. समर्थांना 'ज्ञान' म्हणजे शाश्वत ज्ञान अभिप्रेत असून यासाठी ते 'आत्मज्ञाना'ची दीक्षा देतात. आत्मज्ञान म्हणजे, 'स्वतःविषयक होणारी समग्र जागृत जाणीव आकलन, ही जाणीव, आकलन, मानवी मनाशी निगडीत आहे. समर्थ आत्मज्ञानाला शुद्ध, विमलज्ञान असे संबोधतात.

**ऐक ज्ञानाचे लक्षण। ज्ञान म्हणिजे आत्मज्ञान।**
**पाहावें आपणासी आपण। या नाव ज्ञान।।**(दा.५-६-१)

आपल्या मनात विचार, वासना, इच्छा, लालसा समुद्रलाटांप्रमाणे अविरत खळबळत असतात. त्यांचा त्रिगुणांतील ज्या गुणाधिक्याचा संबंध येतो, त्यानुसार विचार दृढ होतात. दृढ विचार बुद्धीला मनाच्या माध्यमातून प्रेरित करतो. विचाराचे वाचेत, कृतीत वा दोन्हीत रूपांतर होते. म्हणून मन शुद्ध, विमल, निर्मळ हवे. शुद्ध मन निर्मळ विचारधारा तयार करते. चांगले काय, वाईट काय याची निवड बुद्धीमुळे होते. बुद्धीला ज्ञानाची साथ मिळाली की चांगल्याची, योग्य निवड करणे सहज शक्य होते. ही निवड प्रक्रिया म्हणजे 'विवेक'. बुद्धीला विवेकाची जोड ज्ञानामुळे मिळते. कर्म, भक्ती आणि ज्ञान यांचा संयोग यासाठीच अनिवार्य आहे हे समर्थ स्पष्ट करतात. कर्म व भक्ती संयोगाने प्रत्येक कृती उत्कट होते. प्रत्येक काम हे पवित्र कर्म, पूजा होते. अशी जीवनधारणा झाली की मानवात विधायक बदल होतो. पूजा म्हणजे ठरावीक कालावधी हा बाह्यात्कारी विचार. पूजा मनाने, मनःपूर्वक, समर्पिततेने घडली पाहिजे. ती वृत्ती व्हायला हवी. मानवी जीवन भक्तिपूर्ण, भक्तिमय होणे हेच हरिकथा निरूपण, समर्थ अपेक्षितात. कर्म, भक्ती आणि ज्ञान असा त्रिवेणी संगम झाला की जीवनाचे तीर्थक्षेत्र बनते. पूजा म्हणजे गंध, अक्षता, फूल वाहणे हेच नाही. हा बाह्योपचार. काया,वाचा,मनाने भगवंतमय होणे ही पूजेची संकल्पना आहे.ईश्वराशी समरूप होणे. त्याला जळी,स्थळी, काष्ठी, पाषाणी-चराचरात अनुभवणे. सर्वत्र एकच आत्मतत्त्व, मीच भरून आहे. सारी सृष्टी माझ्या चैतन्याचे प्रतिबिंब आहे ही दृष्टी व त्यानुसार कृतीउक्ती होणे हे 'ज्ञान' समर्थांना असे विमलज्ञान प्रत्येकात हवे आहे. यासाठी प्रत्येकाने आपल्यातील 'शुद्धस्वरूपा'ला जाणावे हा आग्रह समर्थ यासाठीच करतात. 'मी' म्हणजे केवळ देह नाही. देहाव्यतिरिक्त 'मी'ला जाणणे हे विमलज्ञान.

**मी कोण ऐसा हेत। धरून पाहातां देहातीत**
**अवलोकितां नेमस्त। स्वरूपचि होये।। (दा.५-६-२१)**

'आत्मज्ञान' माणसाला निर्भय, संयमी, विचारी व बंधनातीत करते. त्यामुळे मनाची ऐहिक जीवन व भौतिक विश्वापलीकडे असणाऱ्या अतींद्रिय जगन्नियांत्याशी सायुज्यता होते. देहातीत होऊन जगणे अशी ही अवस्था असते. लौकिक जीवनात परत न येणे अशी जीवन्मुक्तावस्था आकारते. शाश्वत समाधान, मनाला शांती व तृप्ती देणारे असते. खऱ्या 'मी'ला हे समाधान मिळते. 'खरा'मी शरीराहून वेगळा व तरीही या

नश्वर शरीराचा सूत्रधार असतो. जसा चराचर चालविणारा, चराचरात असूनही त्यापासून वेगळा असतो, तसाच शरीरस्थ 'आत्मा,जीव,प्राण, चैतन्य' हा आहे हे समर्थ सोदाहरण व समजणाऱ्या भाषेत उलगडतात. जगदात्मा आणि अंतरात्मा यांचे स्वरूप , सख्य आणि अद्वैत वैशिष्ट्य समर्थ सामान्य प्रापंचिकासमोर ठेवतात.

सामान्य माणसाने 'काल'चा विचार किंवा 'उद्या'ची चिंता न करता 'आज' जो मानवजन्म लाभला आहे तो समग्रतेने, उत्कटतेने जगावा तरच माणूस क्लेशमुक्त होईल. आजचा प्रत्येक क्षण जगायला भक्ती हाच मूलाधार आहे हे दिशादर्शन करताना समर्थ मानवजन्माची महती सांगतात. जन्म आणि मरण या जीवन नावाच्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जन्ममरण हे शारीर, कायिक आहे. ते नश्वर आहे. जीवनातले 'चैतन्य' ज्याला आत्मा, प्राण म्हणतात ते चिरंतन, शाश्वत, अमर आहे. लौकिक जीवनात पान, फूल,फळ, काया हे नश्वर आहे. म्हणून मृत्यूचे स्मरण मनात सतत ठेवून जीवनाचा प्रत्येक क्षण समग्रतेने, उत्कटतेने,भक्तिभावाने जगायचा हे समर्थ सातत्याने मनावर बिंबवतात.

**मरणाचें स्मरण असावें। हरिभक्तीस सादर व्हावे।**
**मरोन कीर्तीस उरवावें। येणें प्रकारें।। (१२-१०-१३)**

हरिकथा निरूपणाबरोबरच, समर्थ इतर वृत्तीवागणूक मापदंड खुलासेवार स्पष्ट करतात.

'राजकारण' हा शब्द समर्थ बहुआयामी दृष्टीने वापरतात. आजच्या भाषेत ज्याला राजकारण (Politics) म्हणतात. त्या सवंग अर्थाने समर्थ विचार करीत नाहीत. ते राजकारण संज्ञा व्यापक अर्थाने उपयोजितात, 'व्यक्ती आणि समाजाची भक्तिमय धारणा' असा समर्थांचा अभिप्राय आहे. 'राजकारण' म्हणजे प्रपंच आणि परमार्थातील वृत्तीवागणूक पावित्र्य. व्यक्ती, कुटुंब, समाज व राष्ट्र यांची सर्वस्तरीय, सर्वोन्नतीकारक, समाईक विचारधारणा, सर्वंकष समाजोन्नतीसाठी योजलेली भक्ती अधिष्ठान चळवळ म्हणून समर्थ राजकारण संकल्पना प्रस्तुत करतात. समाज व्यवस्थापन आणि भक्तीपंथ यांचा विधायक समन्वय असा समर्थांचा भाव आहे. 'पारमार्थिक समाजाचे लोकनेतृत्व म्हणजे राजकारण असा प्रगल्भ विचार समर्थ मांडतात. रयतेने, जनसामान्यांनी समाजात व कुटुंबात कसे वागावे, त्यांची भावनिक, वैचारिक स्थितीगती याचे विश्लेषण करून, ते जसे आहेत तसे स्वीकारून सकल लोकसमुहाला सर्वासह,सर्वोन्नतीकडे नेणे हे लोकनेत्याचे, लोकशिक्षकाचे, (महंत, निःस्पृह) आत्मज्ञानी अभिजनांचे मुख्य कार्य 'राजकारण' संकल्पनेतून समर्थ अधोरेखित करतात. विस्कळीत लोकसमूह, धार्मिक गढुळता, आपापसातील दुजाभाव यांना समूळ छेद देऊन नव्या आध्यात्मिक लोकशाही समूहाची निर्मिती व सर्वोन्नती ही पार्श्वभूमी समर्थांच्या राजकारण विचाराला आहे. जनसामान्यांचे आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक आणि पारमार्थिक उन्नयन आणि स्थैर्य स्थापनेसाठी ते राजकारणाची मात्रा महंत, निःस्पृह नामक समाजवैद्याकडून देतात. महंत निःस्पृहालाही यम-नियमांची कठोर दीक्षा देतात. जनमानस जाणणे, जपणे, एकसंध राखणे यासाठी महंत (लोकनेता) स्वतः आत्मप्रचीत म्हणजे आचार विचार संपन्न असावा. हे रोखठोकपणे मांडतात. दशक अकरावा-समास पाचवा व दशक एकोणीस-समास नवव्यातून या संकल्पनेचा ऊहापोह समर्थ करतात. समर्थ रामदासातील तळमळीचा लोकशिक्षक, समाज व्यवस्थापक आणि द्रष्टा विचारवंत या निमित्ताने ठसठशीतपणे प्रतीत होतो.

'सावधपण' किंवा सावधानता म्हणजे दक्षता, सतर्कता, सर्वांगीण खबरदारी घेणे. (Alertness) हा विचारही समर्थ व्यापकतेने व बहुआयामी दृष्टीने प्रस्तुत करतात. 'समाजाच्या व व्यक्तीच्या संदर्भातील सर्वस्तरीय व सर्वव्यापी दक्षता' म्हणजे सावधपण हे समर्थांना अभिप्रेत आहे. सावधपण प्रपंचात आणि परमार्थात हवे. या संकल्पनेत चातुर्य, विवेक, वैराग्य, लोकरिती, सारासाराची जाणीव, जनसामान्यांची परमार्थ प्रवणता, समाज आणि व्यक्तीचे परस्परावलंबन, संघटन, समाजस्वास्थ्य आणि

स्थैर्य, शिकण्याची आवड, शिकवण, उत्तमगुण समन्वय, इच्छाशक्ती, सांघिकवृत्ती, निःस्पृहता इत्यादी विविध विचार समर्थ वेगवेगळ्या दशकातून व समासातून स्पष्ट करतात. समर्थकाळात बेसावधपणा व गाफील असणे हे समाजाच्या पचनी पडले असल्याने, समाजाची विस्कटलेली घडी नीट करण्यासाठी, समाजाची मरगळ, सुस्ती झटकून टाकण्यासाठी व्यक्तीसह समाजाचे सर्वांगीण उत्थापन सुघड, सुसंघटित व सुयोग्य होण्यासाठी समर्थ सावधानतेचा उद्घोष करतात. या संकल्पनेत राष्ट्रवाद, अर्थकारण, समाजसंगोपन, पारमार्थिक लोकशाही अशी सर्वसमावेशकता, समाजाच्या नवनिर्मितीसाठी समर्थ एकात्मकतेने मांडतात. सशक्त, सदाचारी, सहिष्णू, राष्ट्रभावप्रेरित, समाजउभारणीचा श्रीगणेशा समर्थ करतात. यासाठी सावधपण सर्वगामी असणे अनिवार्य आहे. हा त्यांचा मानस आहे. व्यक्तीच्या 'आत्मपरीक्षण' (self-introspection) आणि 'आत्मसुधार' (self-improvement) यावर समर्थ लक्ष केंद्रित करतात. या सावधानतेला दूरगामी दृष्टीची, द्रष्टेपणाची जोड देतात. ''लेकुरे उदंड झाली। तो लक्ष्मी निघोन गेली, अंतरासी लागेल ढका। ऐसी वर्तणूक करूं नका, अभ्यासें प्रकट व्हावें। नाही तरी झांकोन असावे, जो दुसऱ्यावरी विश्वासला। त्याचा कार्यभाग बुडाला, मेळविती तितुकें भक्षिती। ते कठीण काळीं मरोन जाती, जगामधें जगमित्र। जिव्हेपासीं आहे सूत्र, राखावी बहुतांचीं अंतरें। भाग्य येते तदनंतरे, दुसऱ्याच्या दुःखे दुखवे। दुसऱ्याच्या सुखें सुखावे, उत्कट भव्य तेंचि घ्यावें। मळमळीत अवघेंचि टाकावे,। मठ करूनी ताठा। धरूं नये, जितुकें कांही आपणासी ठावें। तितुकें हळूहळू सिकवावें, दुःख दुसऱ्याचे जाणावें। ऐकोन तरी वांटून घ्यावे, सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जो करील तयाचें। परंतु येथें भगवंताचें। अधिष्ठान पाहिजे।। या बरोबरच लेखन, वाचन, श्रवण, उपासना यातील सावधानता समर्थ स्पष्ट करतात. व्यक्तीच्या आणि समाजाच्या सर्वांगीण सावधानतेला समर्थ महत्त्वपूर्ण स्थान देतात.

'साक्षेप' म्हणजे प्रयत्न सातत्य, कार्य पूर्णत्वास जाईतो प्रयत्न करणे. प्रपंचात आणि परमार्थात सर्वंकष उन्नतीसाठी केलेले अथक प्रयत्न म्हणजे साक्षेप. समर्थ प्रयत्नवादाचे खंदे पुरस्कर्ते असल्याने त्यांना कोणत्याही प्रकारचा दैववाद किंवा दैवाधीनवृत्ती मान्य नाही. 'यत्न तो देव जाणावा' हाच त्यांचा ध्यास आणि दीक्षा मंत्र आहे. समाज व्यवस्थापनात, प्रपंच व्यवस्थापनात आणि आध्यात्मिक व्यवस्थापनात ते प्रयत्न पराकाष्ठेला प्राधान्य देतात. आळशी, सुस्त, संथ, मंद गतीने काम करणारे, चालढकल करणारे अशांचा समर्थ धिक्कार करतात. करंटे, कमनशिबी, टोणपे अशा विशेषणांनी ते या वृत्तीचा खरपूस समाचार घेतात.

**सुखा आंग देऊं नये। प्रेत्न पुरुषें सांडू नये।**
**कष्ट करितां त्रासों नये। निरंतर।। (२-२-१४)**

असे समर्थ दासबोधाच्या प्रारंभाच्या दुसऱ्या दशकातून स्पष्ट करतात. प्रयत्न करणाऱ्याला आधी त्रास होतो. परंतु केलेल्या कष्टाचे फळ उर्वरित आयुष्यात सुखावह होते. 'साक्षेप करितां कष्टती। परंतु पुढे सुरवाडती' असे स्पष्ट करून, समर्थ कष्टाशिवाय भाकरही मिळत नाही. हे प्रयत्न महात्म्य सांगतात. फुकटचे, विनाकष्टाचे अन्न खाऊ नये, 'कांही मेळवी मग जेवी' असे समर्थ परखडपणे सांगतात. कष्ट करणाऱ्याची वृत्ती कायम चपल असते. जो अचूक प्रयत्न करतो त्यालाच यश प्राप्त होते. अचूक प्रयत्न करणाऱ्याला आपले दोष लक्षात येतात. माणसाने आळस झटकून प्रयत्नशील रहावे. स्वतः समर्थ अहर्निश कार्यरत असल्याने ते सर्वांकडून कार्यमग्नतेची अपेक्षा करतात.

**म्हणोन आळस सोडावा । येत्न साक्षेपें जोडावा।**
**दुश्चितपणाचा मोडावा। थारा बळें।। (१२-९-८)**

असे ते बजावतात. माणसाने आळशीपणा, करंटेपण सोडावे आणि उत्तम गुण अंगी बाणण्यासाठी सतत प्रयत्न करावेत. आळस, निद्रा यांनी आत्मनाश होतो म्हणून समर्थ सामान्य प्रापंचिकाला भल्या पहाटे उठून काम करावे व रात्री योग्य समयी विश्राम घ्यावा अशी

दिनचर्या आखून देतात.'शिकवण निरूपण' या नावाने समर्थ सकल मानवजातीला दिशादर्शन करतात. आळशीपण, चालढकल, उद्यावर काम टाकणे, कामचुकारपणा, बघतो-पाहतो वृत्ती अशा निष्क्रियतेचा समर्थ यथेच्छ समाचार घेतात. प्रपंचात आणि परमार्थ उपासनेत प्रयत्न सातत्य हवे, आळस नसावा.

**प्रेत्नेंविण राहों नये। आळसदृष्टी आणू नये**
**देह अस्तां पाहों नये। वियोग उपासनेचा।।**(१४-१-६०)

कष्ट करताना आचार-विचार योग्य हवेत. 'आचारविचारेंविण। जें जें करणें तो तो सीण' असे ते निक्षून सांगतात. जे कष्ट न करता वाचीवीर असतात त्यांच्या नशिबी दुःख असते. हे स्पष्ट करताना समर्थ सांगतात-

**जेहीं उदंड कष्ट केले। ते भाग्य भोगून ठेले।**
**येर ते बोलतचि राहिले। करंटे जन।।(दा.१८-७-१६)**

माणसाने सत्कारणासाठी कष्ट सोसले तर त्याचा समाजात उदो उदो होतो, समाजप्रियता लाभते. असे कष्टमहात्म्य समर्थ व्यक्त करतात. प्रयत्न सातत्य राखताना, कधीही दुसऱ्यावर विसंबून राहू नये. त्याने कार्यविघ्न येते हे सांगून समर्थ शिकवण दशकातून प्रयत्नांची थोरवी स्पष्ट करतात.

**जो दुसऱ्यावरी विश्वासला। त्याचा कार्यभाग बुडाला।**
**जो आपणचि कष्टत गेला। तो चि भला।।**(दा.१९-९-१६)

माणसाने अवगुण टाकण्यासाठी, शिकण्यासाठी, ज्ञानी होण्यासाठी कष्ट, प्रयत्न करणे आवश्यक आहे. वाल्या कोळ्याचा महर्षी वाल्मिक झाला. ह्या लोककथेच्या आधारे समर्थ प्रयत्न पराकाष्ठा अधोरेखित करतात.

भक्तीला समर्थ जीवनाचा अविभाज्य भाग आणि मानवी वृत्तीचा भाव मानतात. ही भक्ती मनापासून समर्पिततेने व अनन्यतेने हवी. अन्यथा ते केवळ प्रदर्शन, कर्मकांड, बाह्योपचार ठरेल याची प्रत्येकाने जाणीव ठेवावी. भक्तिभावापासून विभक्त न होणे हेच खऱ्या भक्तीचे व भक्ताचे गमक आहे. भक्ती करूनही जर आपल्या आचारविचारात विधायक परिवर्तन झाले नाही तर केलेले प्रयास व्यर्थ ठरणार आहेत. आचारविचारातील उन्नतीकारक बदल हेच भक्तीचे मोजमाप आहे. भक्तीसह उर्वरित वर्तन मापदंड ही जीवन जगण्याची चौकट समर्थ प्रस्तुत करतात. आत्मीयतेला प्रयत्न, सावधपणा आणि सर्वोपयोगितेची जोड लाभावी आणि मानवी वृत्तीवागणूक व्यक्तीला व समाजाला प्रगतिकारक असावी या एकमात्र उद्देशाने समर्थ प्रबोधन करतात. लक्षात घ्या, भक्ती ही जीवनवृत्ती असणारा माणूस नीतिनियम, परोपकार, वीतरागीता, इतरांचा आत्मसन्मान जपणारा असतो. अशी वृत्तीच 'नरा'चा 'नारायण', 'सुरवंटाचे फुलपाखरू' घडविते. समर्थ सकल सामान्य जनांतून पुरुषोत्तम आकारला यावा या व्यापक समाज जाणिवेने मार्गदर्शन करतात. समर्थप्रणीत वर्तन मापदंडांचे जर प्रत्येकाने अनुसरण, आचरण केले तर एक नवा सशक्त, सक्षम, सहृदय आणि सुदृढ समाज उदयाला येईल. तसा तो यावा हीच समर्थांची तहान आहे.

समर्थ रामदासप्रणीत वर्तन मापदंडांच्या स्वीकाराने व वागणुकीने सामान्य माणसात असामान्य विधायक परिवर्तन होईल. आध्यात्मिक परिभाषेत सांगायचे तर 'बद्धा'चा 'सिद्ध' होईल. प्रत्येकाला आपल्या जन्माचे प्रयोजन, जीवनाची समग्र जाणीव आणि सर्वांभूती समत्वममत्व अशी विश्वबंधुता याची मनःपूर्वक ओळख होईल. सकल मानवसमूह कलह, क्लेश, कर्मठता मुक्त होईल. सर्व गुण्यागोविंदाने नांदणारे, परस्परांसह सर्वांची काळजी करणारे घेणारे होतील. एक नवे 'रामराज्य' उदयाला येईल. हाच समर्थांचा मानस आहे.

जीवन समग्रतेने जाणणे आणि जगणे हे कठीण वाटत असले तरी अशक्य नाही.यासाठी भक्तीरूपी फुंकणीने स्वतःतील 'सत्त्वगुण' फुलवायचा. विकसित करायचा. जोपासायचा. यामुळे प्रत्येक व्यक्ती-

**या कारणें आचारशुद्ध। त्या उपरी विचारशुद्ध**
**वीतरागी आणि सुबुद्ध। ऐसा पाहिजे।।** (१३-१०-१६)

या समर्थांच्या अपेक्षेला खऱ्या अर्थाने उतरेल.

... *उर्वरित पान १७ वर*

# जनीं सर्वसूखीं असा कोण आहे ?

**डॉ. कमलेश सोमण, गणेश नगर, धायरी, पुणे - ४११ ०४१, भ्रमणध्वनी : ९४२२३५०३५०**

**जनीं सर्वसूखीं असा कोण आहे ।**
**विचारें मना तूंचि शोधूनि पाहें ।**
**मना त्वांचि रे पूर्वसंचीत केलें**
**तयासारिखें भोगणें प्राप्त जालें ।। ११ ।।**

सज्जन मन हे नेहमीच योग्य विचार, योग्य ठिकाणी करणारे (विचारी-विवेकी) असते. मुख्य म्हणजे असे मन स्वत:ला जाणणारे असते. अशा मनाला अधिकाधिक अंतर्मुख करून आत्मशोधास प्रवृत्त करण्याचा प्रयत्न (श्लोकप्रवाहात प्रथमच) रामदासांनी केला आहे. शिक्षण म्हणजे साक्षात दर्शनच. हे साक्षात दर्शनच मनाचा संदेह-संशय मिटवत असते आणि त्याला अधिक शहाणे करते. यात एक गोष्ट मात्र खरी की शिकणे, हे पूर्ण अवधानाच्या, नि:शब्दतेच्या शोधावस्थेतच होऊ शकते.

जन्म आणि मृत्यू या दोन टोकांतले हे आयुष्य. पुनर्जन्म किंवा मृत्यूनंतरचे आयुष्य आहे की नाही, याबद्दल निश्चितपणे आपल्याला सांगता येत नाही. अर्थात या सर्वांची फिकीर करण्यापेक्षा आपल्या समोर जे आयुष्य पसरलेले आहे, ते *कंप्लिट वेलबीईंग* म्हणजेच सर्वात तंदुरुस्त, आनंदी आणि सर्वार्थाने समाधानाने (संपूर्ण मुक्ततेत) जगता येईल का, हा खरा (विचारी मनापुढे) प्रश्न आहे.

मध्यंतरी 'कंप्लिट वेलबीईंग' मासिकाने एक अखिल भारतीय सर्वेक्षण केले होते. विविध क्षेत्रातील प्रथितयश आणि सर्वार्थाने यशस्वी व्यक्तींमध्ये सर्वात तंदुरुस्त-सुदृढ, आनंदी आणि सर्वार्थाने समाधानी व्यक्ती कोण आहेत, याचा शोध घेता यावा, हा त्यामागचा हेतू होता. त्या सर्वेक्षणात एपीजे अब्दूल कलाम, सोनिया गांधी, लालूप्रसाद यादव, अनिल अंबानी, सलमान खान तसेच शाहरूख खान यासारख्या व्यक्तींची निवड केली गेली. लाखो लोकांनी या सर्वेक्षणात उत्स्फूर्तपणे भाग घेतला. निवडण्यात आलेल्या व्यक्ती मोठ्या आहेत यात शंकाच नाही. या व्यक्तींबद्दल भारताच्याच नव्हे तर जगाच्या कानाकोपऱ्यात कुठेही गेले तरी आदराने बालेले जाते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या सर्व क्षेत्रात सचिन तेंडुलकरला सर्वात तंदुरुस्त, सर्वस्वी आंनदी आणि पूर्ण समाधानी - कंप्लिट वेलबीईंग इंडियन - म्हणून सर्वाधिक मते मिळाली. सचिनसाठीदेखील तो एक मोठा सन्मान आहे. सर्वत्र विश्वंभर होऊन क्रिकेटप्रेमींच्या मनावर-हृदयावर राज्य करणाऱ्या सचिनला 'आनंदघन सचिन' म्हणून संबोधले जाते, ते सर्वार्थाने योग्यच आहे. फिटनेस, हॅपीनेस आणि वेलबीईंग तसेच ताण-तणावग्रस्तता व नियंत्रण, यासह अनेक मुद्यांवरचे सचिन तेंडुलकरचे विचार हे विलक्षण प्रगल्भ व परिपक्व आहेत. कमालीचा आत्मशोध घेत स्वतःच्या अंत:प्रेरणेने जगणारा आणि क्रिकेट जगताशी इमान राखणारा एक प्रतिभावान-प्रज्ञाशाली क्रिकेटपटू म्हणून आपण त्याला ओळखतो. एक निष्काम योगीपुरुष म्हणून आपण सचिनला संबोधले, तर ते अतिशयोक्ती वाटू नये. क्रिकेटबद्दल पराकोटीची प्रीती आणि सर्वसंपन्न असूनही पराकोटीची निवृत्ती, यांचा मिलाफ मोठ्या कुशलतेने सचिनने आपल्या जीवनात साधला आहे. असो.

**यशस्वी होणे म्हणजे काय ?** याविषयी नेमकेपणाने सांगता येईल. इमर्सनने एके ठिकाणी म्हटले आहे की :

मनापासून अगदी खळखळून हसता येणं, ज्ञानी-प्रज्ञाशील माणसांच्या आदरास आणि लहान मुलांच्या प्रेमास पात्र ठरणं, प्रांजल समीक्षकांची-निंदकांची दाद मिळविणं, आणि जवळच्या मित्रांनी केलेला विश्वासघात पचवता

येणं, दुसऱ्यातले चांगले-उत्तमोत्तम गुण वा त्यांनी उराशी जपलेली मूल्ये शोधता येणं, एखाद्या सुंदर निरोगी मुलाला जन्म देऊन, वा एखाद्या सामाजिक स्थिती-गतीत अंतःकरणापासून सहभागी होत सुधारणा करणं, हे जग, आहे त्यापेक्षा अधिक सर्वोत्तम करीत त्याचा निरोप घेणं, आपण जसे जगलो त्यामुळे, निदान एका तरी दुसऱ्या जिवाचं जगणं, त्याची तडफड-वेदना हलकी करणं, म्हणजे **यशस्वी होणं !**

आतापर्यंत आपण *कंम्प्लीट वेलबिईंग* तसेच *सर्वार्थाने यशस्वी होणं* याबद्दल बोलत होतो. या संदर्भात आपण सर्वात तंदुरुस्त, आनंदी आणि सर्वार्थाने समाधानाने जगणाऱ्या काही महान-आदरणीय व्यक्तींची नावे घेतली पण अस्सल जीवनात (लोनली ॲट द् टॉप) ते खरोखरीच सुखी-समाधानी आहेत का? हा खरा (विचारी मनापुढे) प्रश्न आहे. आज आपल्याला अवतीभोवती अनेक लेखक-कलावंत-उद्योजक-खेळाडू, अगदी भौतिक वैभवाच्या शिखरावर विराजमान झालेले, आपल्याला दिसत आहेत. आपण कोणीही मोठे कलाकार, चित्रकार, विविध विषयातील तज्ज्ञ असू, पण आपल्या स्वतःच्या दैनंदिन (आंतरिक) जीवनात मात्र आपल्या सर्व चिंतांसह आपण अत्यंत दुरावस्थेचे, अव्यवस्थेचे जीवन जगत असतो, ही वस्तुस्थिती आहे. या वस्तुस्थितीकडे पाहूनच श्रीसमर्थ आपल्याला शोधास प्रवृत्त करीत नसतील ना ? *जगी सर्व सुखी असा कोण आहे, विचारें मना तूंचि शोधूनि पाहें ।*

ज्येष्ठ साहित्यिक जी.ए. कुलकर्णी यांच्यास्मरणार्थ त्यांच्या कुटुंबीयांच्या वतीने देण्यात येणाऱ्या *प्रिय जी.ए. सन्मान* हा पुरस्कार स्वीकारताना नाटककार महेश एलकुंचवार यांनी जे भाषण केले, त्यात त्यांनी एक विलक्षण मौल्यवान आठवण नोंदवली आहे. त्यातील अर्थवानता पाहण्यासारखी आहे.

एलकुंचवार म्हणतात : 'मी बेबीताईंना (रोहिणी भाटे) अनेकदा भेटायचो. त्या जाण्याच्या सहा महिन्याआधी त्यांच्याशी बोलताना मी त्यांना विचारलं की, 'इतका तुम्ही लांबचा प्रवास केला. ६०-६५ वर्षे तुम्ही नृत्य करीत आहात. आपण मुक्कामाला पाहोचलो, असं वाटतं का तुम्हाला ?' त्या म्हणाल्या, 'मला कुठं जायचंच नव्हतं !' तेवढं एकच वाक्य त्या बोलल्या. ते उपनिषदिक वाक्य आहे. कुठं जायचंच नव्हतं, याचा अन्वयार्थ गेली कित्येक दिवस मी लावतोय..काही मिळवायचंच नव्हतं. मी आहे, तिथे साधना करीत होते. साधना आणि साध्य एकच गोष्ट होती, आणि मला त्याचा आनंद मिळत होता. याच्या पलीकडे काय असतं?'

कुसुमाग्रज यांच्या 'पांथस्थ' कवितेतील काही ओळी हाच अन्वयार्थ अधोरखित करतात.

....त्या असाध्याकडे
जाणाऱ्या मार्गावर
मी जातो आहे पुढें, सारखा पुढें -
गतीनें बधिर झालेल्या माझ्या मनाला
आता स्मरण उरलें नाही त्या स्थळाचें
ज्याच्याकडे मी जात आहे.
आणि राहिली नाही आवश्यकता
तिथपर्यंत पोहोंचण्याचीहि.
कारण या गतींतच आहे त्या श्रेयाचे संपादन
या प्रवासातच आहे,
प्रवासाची अंतिम सांगता.

एका शिष्याने आपल्या गुरूला विचारले, 'तुम्ही स्वतः सुखी आहात का ?'

तेव्हा गुरुजी त्याला म्हणाले, 'मला माहीत नाही. त्याबद्दल मी कधीच विचार केला नाही. आपण सुखी आहोत, असे ज्या क्षणी वाटते, त्या क्षणी सुख नाहीसे होते, होय की नाही? तुम्ही जेव्हा खेळत आणि आनंदाने ओरडत असता, त्यावेळी अचानक जर, आपण मोठ्या आनंदात आहोत, असे तुम्हाला जाणवले, तर काय घडते ? तुम्ही आनंदी राहत नाही. हे तुमच्या लक्षात आले का? म्हणजेच आनंद ही स्वतःचे भान असण्याच्या क्षेत्रातील गोष्टच नव्हे ! तुम्ही चांगले होण्याचा प्रयत्न करता, तेव्हा तुम्ही चांगले असता का? चांगुलपणाचा

सराव करता येतो का? की चांगुलपणा हा तुम्ही पाहता, अवलोकन करता, समजून घेता, म्हणून आपोआप, सहज अस्तित्वात येतो? त्याचप्रमाणे तुम्ही सुखी आहात, हे तुमच्या ध्यानात आले, तर सुख खिडकीतून केव्हाच उडून जाते. सुखाचा पाठलाग करणे आचरटपणाचे असते. कारण तुम्ही सुखाचा पाठलाग करीत नाही, तेव्हाच ते अस्तित्त्वात असते. सुख आणि आनंद यात काय फरक आहे? आनंदीपणा म्हणजे काय, सांगता येईल? सहज हसावे, एखाद्या गोष्टीमुळे किंवा निर्हेतुकपणे आनंदी व्हावे, सुखी असावे, जीवनानंद समजून घ्यावा, स्मित करावे, अजिबात न भिता दुसऱ्या व्यक्तीकडे नजरेला नजर देऊन पहावे, हे सारे आनंदीपणात येते. एकूणच सुखी, आनंदी असणे महत्त्वाचे आहे. आपल्या हृदयात जर गाणे नसेल तर जिणे कंटाळवाणे होऊन जाते. आणि अंतरंगातला हा आनंद सापडणे सोपे नाही. मुख्य म्हणजे आपल्या आनंदाचे ओसरणे हा मृत्यूच असतो.'

सुख विचाराबद्दल बोलताना जे. कृष्णमूर्तींनी एके ठिकाणी म्हटले आहे की, 'आपली समाजरचना ही सूखमूलक आहे. सुख पुन्हा मिळावे व तसेच मिळत राहावे, यासाठी केलेली धडपडच, त्या सुखाला दु:खाचे रूप देते. याचे कारण आपण त्या अनुभवाच्या स्मृतीला चिकटून राहतो. सुखकारक अनुभव पुन:पुन्हा घ्यावा, असे विचारांचे मागणे असते व तोच तो अनुभव जितक्या वेळा घ्याल, तितका तो यांत्रिक होत जातो. ज्यावर तुम्ही जितका अधिक विचार कराल, तितके सुखोपभोगाला विचाराने बळ चढते. अशारीतीने वासनेच्या मार्गाने विचार हाच सुखोपभोगांची निर्मिती करून त्यांना सातत्य देत असतो. विचार हा त्या आनंदाचे स्मृतीत रूपांतर करतो व स्मृतीत साठविलेल्या गोष्टींवर वारंवार चिंतन करून, ती स्मृती पोसली जाते, दृढ होते.

सुख हे नेहमीच चार टप्प्यांनी अस्तित्वात येत असते. वस्तूचे होणारे प्रथम दर्शन, तिच्यामुळे होणारी इंद्रिय संवेदना, तिचा मनाशी येणारा संग आणि त्यातून उत्पन्न होणारी वासना : दर्शन, स्पर्श, संग व वासना असा हा थोडक्यात क्रम आहे असे म्हणता येईल. एक लक्षात घ्या, आनंद ही तत्क्षणीची गोष्ट आहे आणि त्याविषयी विचार करून तुम्ही त्याचे सुखोपभोगात रूपांतर करता. वर्तमानात जगणे म्हणजे सौंदर्याचा चेतन साक्षात्कार असतो. आणि त्यात विलक्षण आल्हाद असतो, पण त्यापासून सुखोपभोग मात्र मिळवावयाचा नसतो. एखादा सुंदर चेहरा, पक्षी, साडीचा रंग असो वा सोन्याचा कलाकुसर केलेला दागिना, विचारांचा मध्ये शिरकाव होऊ न देता, तो अनुभव पुन्हा पुन्हा मिळावा, अशी मागणी न करता तुम्ही पाहू शकलात, तरच तिथे दु:ख नसेल, भय नसेल. पण ओसंडणारा आनंद असेल.'

एकूणच सुख, समाधान आणि आनंद ह्या अगदी वेगवेगळ्या गोष्टी आहे. समाधानाबद्दल स्वत: समर्थ पुढे एका मनाच्या श्लोकात म्हणतात :

**नव्हे पिंडज्ञानें नव्हे तत्त्वज्ञानें**
**समाधान कांही नव्हे तानमानें ।**
**नव्हे योगयागें नव्हे भोगत्यागें**
**समाधान तें सज्जनाचेनि योगे ।। १५३।।**

जरी पिंडज्ञान म्हणजे शरीरासंबंधीचे ज्ञान आपण संपादन केले, आत्मज्ञानासह ब्रह्मज्ञानाचा-परमात्म्याचा शोध घेण्याचा आपण अखंड-अथक प्रयत्न केला, सगळ्या पार्थिव भोगाचा व मागण्यांचा अगदी आपण त्याग केला, सारे योग आपण कठोर साधनेने जाणून घेतले, यज्ञयाग केले, इतकेच नव्हे तर संगीतादीनृत्यकला आपण मोठ्या अभ्यासाने जाणून घेतल्या, तरी मनाला पूर्ण समाधान काही मिळत नाही. मग समाधान कुठे मिळणार आहे ? समर्थ म्हणतात की, हे मना, खरे समाधान हे तुला फक्त सज्जनांच्या सहवासात आणि त्यांच्या बरोबरच्या संवादातूनच मिळणार आहे हे तू विसरू नकोस.

एका शिष्याने आपल्या गुरूंना विचारले, 'समाधान म्हणजे काय ?'

तेव्हा गुरुजी त्याला म्हणाले, 'समाधान ही वस्तू मात्र सर्वस्वी आगळी असते. समाधानी असणे हे अतिशय कठीण असते. कारण समाधान कुठल्यातरी गुप्तस्थानी

शोधून सापडण्यासारखे नसते. सुखाच्या जसे पाठीमागे लागता येते, तसे समाधानाच्या पाठीमागे लागणे शक्य नसते. समाधानाचा पाठलाग म्हणजे आपल्या अभिलाषापूर्तींचा पाठलाग करणेच असते. मुख्य म्हणजे समाधान हे प्रयत्नातून संपादन करता येण्यासारखे नसते. समाधान म्हणजे जे वर्तमान वास्तव आहे, त्याचे क्षणाक्षणाला होत जाणारे यथार्थ आकलन. अभावात्मक आकलनाचे ते सर्वोच्च रूप होय. समाधानी अवस्थेत जी कृती घडते, तिच्यात परस्परविरोध नसतो. विचलता, संभ्रमावस्था अशा व्यापारापासून मनाची मुक्तता करण्याची समर्थता समाधानात असते. एकूणच समाधानाचा व्यापार हा कालातीत स्वरुपाचा असतो.'


**मना त्वांचि रे पूर्वसंचीत केलें**
**तयासारखे भोगणें प्राप्त जालें ।।**

समर्थ म्हणतात, हे मना, तू आजवर जे पूर्वसंचीत केलेस, त्याप्रमाणे तुला भोगणे प्राप्त आहे. हे दु:ख भोगल्याशिवाय काही सुटका नाही, असा विचार करून, आपण मोठ्या धैर्याने जीवनाला-समस्येला सामोरे जा. वस्तुस्थिती पाहणे आणि ओळखणे (भोगणे) म्हणूनच महत्त्वाचे ठरते. मुक्तेश्वराच्या भारतातील एक ओवी आहे, ती या संदर्भात पाहण्यासारखी आहे.

**ईश्वरे प्रेरिलें प्रारब्धातें । प्रारब्धें प्रेरिलें मनाते ।।**
**यास्तव घडेल तेंचि निरुते । ब्रह्मसूत्र जाणावें ।। १ ।।**
**ईश्वरइच्छेनें घडे सकळ । वाउगी मनाची तळमळ**
**अज्ञानाचे हेंचि फळ । जे सुख-दु:खे प्रलपिजे ।।२।।**

**।।जय जय रघुवीर समर्थ।।**

**सुजन वाक्य**



▶सज्जन माणूस दुसऱ्याचं कल्याण करत असताना गुप्तपणे करतो आणि त्याची पसरलेली कीर्ती लोकांच्या समुदायात ऐकून मात्र त्याला संकोच वाटतो.

*...पान १३ वरून*

या साठी 'दासबोधा'तील समर्थ मार्गदर्शनाचे केवळ पारायण न होता, अंगीकरण, त्याची अंमलबजावणी, आचरण होणे गरजेचे आहे, नव्हे अनिवार्य आहे. आज नेमके तेच विसरले, दुर्लक्षिले जात आहे. यात नुकसान आपलेच आहे. समर्थांचे दिशादर्शन सार्वकालिक, सखोल आणि मानवतावादी आहे. आवश्यकता आहे ती त्या विचारांचा 'पुनश्च हरिॐ' करण्याची, प्रत्यक्ष वागणुकीत आणण्याची. यास्तव प्रत्येकाने ह्या क्षणापासून वचनबध्द, कटिबध्द होणे महत्त्वाचे आहे.

**।।जय जय रघुवीर समर्थ।।**

श्रीरामदास स्वामी संस्थानचे क्रांतिकारी पाऊल

## मासिक 'रघुवीर समर्थ' प्रकाशन

## आता हिंदी भाषेतूनही !

महाराष्ट्राप्रमाणेच समर्थांच्या विचारांचा प्रसार देशाच्या इतर राज्यांमध्येही व्हावा यासाठी श्रीरामदास स्वामी संस्थानतर्फे 'रघुवीर समर्थ' मासिक हिंदी भाषेतून प्रकाशित होत आहे. या मासिकाचे प्रकाशन ग्वाल्हेर (मध्यप्रदेश) येथून सुरू झाले आहे. हिंदी मासिकाचे संपादक मा.डॉ.श्री.मानस मनोहर दुबे, तसेच उपसंपादक श्री.उपेंद्र शिरगांवकर व श्री. राघवेंद्र शिरगांवकर आहेत. दासनवमीच्या सुमुहूर्तावर प्रथम अंकाचे प्रकाशन झाले आहे. सर्व समर्थ भक्तांनी या संधीचा लाभ घ्यावा.

अधिक माहितीसाठी संपर्क

आबामहाराज का श्रीराम मंदिर, दालबाजार, ग्वालियर-४७४००९ फोन : ०७५१ -४०७१४३२
श्री. उपेंद्र शिरगांवकर - ०९४२५७७१४३२

**पृष्ठ प्रायोजक :**
**स. भ. श्री. स्वानंद कुलकर्णी, मिरज**
**एस. के. इन्व्हेस्टमेंटस्**

अभंग योगवासिष्ठ

# वसिष्ठांनी केले रामासी प्रबळ

**श्री. वामन वा.कोल्हटकर**, फोन (०२०) २५४३८६६३, email - wavako@gamil.com
(विज्ञान मंदिर या फिजिक्स प्रयोगशाळेचे जनक) गणितमंदिर, कीर्तनशाळा, पुणे

**जयामाजि सर्व भूते भासमान।**
**स्थित तेवि लीन जयामाजी॥**
**तया सत्यात्म्यासी वंदू ऐक्यभावे।**
**तादात्म्य जाणवे नमन येथे॥**
**ज्ञाता ज्ञेय ज्ञान दृश्य द्रष्टा दर्शन।**
**कर्ता हेतु कर्म भास जेथे॥**
**तया प्रत्यगात्म्या वंदू अवशिष्टा।**
**केवल त्या बोधा नमन बोधे॥**
**आब्रह्मस्तंबांत जगासी जीवित।**
**आनंद बिंदूत ज्या सिंधूच्या॥**
**ब्रह्मानंदरूपा तया पुरुषोत्तमा।**
**करोनी वंदना ग्रंथारंभ॥**
**वासुदेव म्हणे आनंदीआनंद।**
**बिंदूही आनंदसिंधुरूप॥**

असा अभंग योगवसिष्ठांतील पहिला अभंग आहे. मौज म्हणून आपण योगवासिष्ठाचे पहिले श्लोक पाहू.

**यतःसर्वाणिभूतानिप्रतिभान्तिस्थितानिच।**
**यत्रैवोपशमंयान्तितस्मैसत्यात्मने नमः॥**
**ज्ञाताज्ञानंतथाज्ञेयंद्रष्टादर्शनदृश्यभूः।**
**कर्ताहेतुक्रियायस्मात्तस्मैज्ञस्यात्मने नमः॥**
**स्फुरंति सीकराद्यस्मादानंदस्यांबरेऽवनौ।**
**सर्वेषांजीवनंतस्मै ब्रह्मानंदात्मने नमः॥**

हे या ग्रंथाचे नमन आहे. यानंतर ग्रंथातील घटनाविषयाचा प्रारंभ होतो तो सुतीक्ष्ण नावाच्या ऋषींच्या पार्श्वभूमीप्रद कथेपासून. ब्रह्मस्वरूप जाणून घेण्यासाठी सुतीक्ष्ण हे अगस्ति ऋषींच्या आश्रमाकडे येतात आणि अगस्तींना ते प्रश्न करतात की ज्ञानाने मोक्ष मिळतो की कर्माचरणाने तो मिळतो ? तेव्हा अगस्ती उत्तर देतात की पक्षी जसा फक्त एकाच पंखाने कधी उडू शकत नाही त्या प्रमाणे आत्मज्ञानास (परोक्ष) ज्ञानही आवश्यक आहे. आणि (विहित) कर्मानुष्ठानही आवश्यक आहे. मात्र कर्मफलत्याग महत्त्वाचा म्हणजे असे की कर्तव्य म्हणून कायिक, वाचिक, मानसिक बौद्धिक सर्व कर्मे अवश्य करावीत पण त्यामागे त्या केलेल्या कर्माचे फळ मिळावे असा आग्रह अजिबात असता कामाचा नाही. (कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाच न। गीता) तात्पर्य, मोक्षासाठी ज्ञान आणि कर्म दोन्ही हवे यानंतर अगस्त्यांचा उपदेश सुरू. ते अग्निवेश्य-कारुण्य संवादाने सुरुवात करतात.

जुन्या संस्कृत वाङ्मयांत एकातून एक, एकातून एक अशी विषय मांडायची धाटणी मोठी और असते. या सृष्टीचक्रात पुष्कळ घटनासंच पुनःपुन्हा घडत असतात. जुन्या ज्ञानी लोकांस त्यांची आठवणही होते आणि पूर्वी अशा घटनांचा पुढील परिणाम काय घडला तेही त्यांच्या अन्तश्चक्षुपुढे उभे राहिलेले असते. अगस्तींनी असाच प्रश्न पूर्वी कारुण्य नावाच्या एका स्नातक - म्हणजे अध्ययन पूर्ण करून नुकत्याच घरी परतलेल्या तरुणास पडला होता आणि त्यावेळी त्याचे वडील अग्निवेश्य ऋषी यांनी त्याला काय उपदेश केला ते सांगण्यास प्रारंभ केला. आता, अग्निवेश्य तरी काय करतात, तर सुरुची नावाच्या एका अप्सरेचा इतिहास सांगू लागतात. ती अप्सरा एकदा आकाशातून जात असता हिमाद्रिशिखरावर तिला एक ओळखीचा इंद्रदूत दिसला. त्याला तिने विचारले की एवढ्या लगबगीने कुठे चालला आहेस ? तेव्हा तो सांगतो की गंधमादन पर्वतावर अरिष्टनेमी राजा पुष्कळ तप करतो आहेसे पाहून इंद्र त्याला स्वर्गात नेण्यासाठी मला विमानाने पाठवितो; पण मला तो स्वर्गातील गुणदोष विचारतो. मी जेव्हा त्याला सांगतो की स्वर्ग हा सर्व इंद्रियसुखांची खाण

आहे. पण तिथे ईर्षा, मत्सर, द्वेष, गर्व हे सारे भाव आहेतच. तेव्हा अरिष्टनेमी म्हणतो की मला असे बरबटलेले वैषयिक सुख नको आहे. मला शुद्ध निर्विषय सुख हवे आहे. तेव्हा इंद्राच्या सांगण्याने मी अरिष्टनेमीस वाल्मिकी मुनींच्या आश्रमी घेऊन गेलो तेव्हा वाल्मिकींनी त्याला, त्याअगोदर भरद्वाज या शिष्याला ब्रह्मदेवाच्या आज्ञेने आत्मज्ञानासाठी जे उत्तररामायण सांगितले ते उपदेशिले. (ते काय, ते देवदूताने अप्सरेस, अग्निवेश्याने कारुण्य या आपल्या मुलास आणि नंतर अगस्ति ऋषींनी सुतीक्ष्ण या मुनीस सांगितले. (हे पुढचे कोणी लिहिले ?)

महाभारतही व्यासांनी रचून ते आधी गणपतीकडून लिहून घेतले आणि नंतर शुक व आपल्या इतर शिष्यांस शिकविले. नंतर व्यासांच्या समक्ष वैशंपायनांनी ते जनमेजयास सांगितले. जर त्यात काही भेसळ त्यांनी मनची केली असती तर व्यासांनी त्यास विरोध केला असता पण तसा तो केला असता तर १) सौतींनी तो आपल्या कथनांत कुठेतरी नोंदविला असता किंवा २) जनमेजयसत्रसभेत झालेल्या एखाद्या वैशंपायनांच्या कथनांत जे व्याससंमतीने निर्णायक तात्पर्य निघाले असेल तेच सौति सांगणार. सौतींवर एवढा विश्वास टाकला नाही तर अख्ख्या महाभारताबाबत तरी ते कोणी लिहिले या बद्दल पुरावा काय सांगणार ? कारण आपण सौतींनी सांगिलेलेच भारत हाताळतो. सौतींनी भारत लिहिल्याची कुठेच नोंद नाही. आता, त्यांना विचारलेल्या प्रश्नांस त्यांची जी उत्तरे होती ती, एकतर व्यासांनी दिलेल्या त्या बाबतच्या स्पष्टीकरणानुसारच असतील किंवा त्यांनी ती विषय स्पष्ट करण्यासाठी मनाने सांगितली असतील. तरीही ते अतिरिक्त स्पष्टीकरण ग्रंथ संपादित (शवळीं) करून व्यासांनी या ग्रंथाची प्रथम प्रसिद्ध्युत्तर आवृत्ती सिद्ध केलेली असू शकते. म्हणजे, ते महाभारत तिघांनी लिहिले आहे असा बुध्दिभेद करण्याचे पाश्चिमात्य धोरण जतन करण्याची काहीच आवश्यकता नाही. व्यासांची सारीच पुराणे नैमिषारण्यातील श्रोत्यांपुढे सांगितली जात असत. तो त्यांचा स्थिर असा श्रोतृसमाज होता. पुढील सुधारित आवृत्ती काढायची प्रथा आजच पडली आहे असे मानायचे काहीच कारण नाही. एखादे लिखाण करायचे, त्याच्या नोटस् आपल्या श्रोतृसमाजास ऐकवायच्या, पुन्हा फायनल पुस्तक करायचे ही अगदी नैसर्गिक प्रक्रिया असू शकते. व्यासांबाबत तर सहजसिद्ध प्रक्रिया असणे उघड म्हणता येईल इतके स्पष्ट वाटते. कारण त्या व्यासभारित कालखंडांत त्यांचा चाहता वर्ग आणि शिष्यसमुदाय सारीकडे फैलावला होता. शिवाय वेदविभाग, पुराणरचनेमागील वेदोपबृंहणासारखी त्यांची कळकळ, उत्तुंग लोकोपयोगी कार्य करीत राहण्याची त्यांची धडपड आणि त्यासाठी आवश्यक ती त्यांनी जमा केलेली शिष्य -यंत्रणा इ. ध्येयप्रवृत्त दृष्टीकोनाकडे पाहता व्यासांना एक नुसता ग्रंथलेखक ठरविणे न्याय होणार नाही. आपण हे ही लक्षात ठेवले पाहिजे की रोमहर्षण हे सूत त्यांनी ''सूत'' जातीचे असूनही त्यांचे इतर गुण पाहून स्वतःचे पुराण सांगणारे शिष्य बनविले. आधुनिक काळांत १९ व्या शतकांत क्लाइनने ग्युटिंजनमधे गणित विज्ञान वाढीसाठी जसे चौफेर जागृत प्रयत्न केले तसेच व्यासांचे काम म्हणणे जास्त सयुक्तिक आहे. क्षमस्व! वरचा किचकट विषय बुध्दिभेद करणाऱ्यांसाठी लिहिला.

एखादे उत्तम काम स्वतः करून त्याचे श्रेय मात्र दुसऱ्याला देणे हे ज्याला ते श्रेय दिले जाते त्यालाही कसे चालेल किंवा योग्य वाटेल ? शिवाय त्या काळातील लोक अशा प्रसिद्धीची नाचक्की नाही का करणार ? व्यासांसारख्यांना त्याची गरज नव्हती. आज व्यासांसारखे लोक अनुपलब्ध आहेत म्हणून थोर लोकांच्या प्रतिभेचा उपमर्द करणे केव्हाही उचित नाही. तर्क हा योग्य दिशेनेच व्हायला हवा. शक्यताच सांगायची तर ती बोथट प्रतिभेची कां निवडावी ?.. आपल्या प्रत्येक ग्रंथाबाबत विद्यापीठ (म्हणजेच पाश्चात्त्य) पद्धतीचा विचार अशी गैर मल्लिनाथी करीत असतो. हे अश्लाघ्य आहे.

योगवासिष्ठांबाबतही असे गैर विचार अभारतीयच नव्हे तर भारतीयही पसरवीत असतात.

''वाल्मिकींच्या नावे दुसऱ्याच कोणीतरी लिहिलेला

ग्रंथ'' अशी त्या ग्रंथाची बरेचदा बोळवण केली जाते. वसिष्ठ ऋषींशी त्याचा संबंध लावणे, पुष्कळ चतकोर विद्वानांच्या बुद्धीला झेपत नाही. खरे तर त्या ग्रंथातील विषयांची झेप पाहता आइनस्टाईन सारख्यांच्या प्रतिभेशीच तुलना करावी लागेल... जर तो मध्ययुगात निर्माण झालेला ग्रंथ असला तर!! युरोपात मध्ययुगात हा ग्रंथ झाला असता तर आज त्या ग्रंथास किती डोक्यावर घेतले गेले असते याची कल्पनाही करवत नाही. तो एका थोर ऋषींचा ग्रंथ आहे असे मानले, तर ऋषींना आपण मुळातच थोर पण जुने पुराणे, आज मितीला कालबाह्य मानीत असल्याने त्यातील अत्यंत थोर विचार आपण जुने पुराणे मानून त्या ग्रंथाची 'दुर्लक्षित' सदरांत बोळवण करतो. आणि तथाकथित विद्वान 'राम वसिष्ठ' या व्यक्तिरेखाच काल्पनिक मानीत असल्याने आणि त्या ग्रंथातील विषय संस्कृतभाषाभ्यासकास अजिबात कळण्यासारखा नसून विज्ञानाभ्यासकास त्याची किंमत असल्याने आणि या दोहोंच्या अभ्यासक्षेत्रांत छत्तीसाचा आकडा जोपासला गेला असल्याने योगवासिष्ठ हा ग्रंथ आत्मज्ञानाभ्यासकांशिवाय इतर विद्यापीठीय अभ्यासकापासून वंचितच राहिला असावा. मात्र कुठलाही ग्रंथ, त्यातील विचारार्ह विषय कळो वा न कळो, त्याचे खरे लेखक किती आणि त्याचा काळ कोणता याबद्दल खारीच्या कुंपणाच्या झेपेने काथ्याकूट अहमहमिकेने करणे हे पाश्चिमात्त्य विचारसरणीचा अभ्यासक तर आवर्जून करतो. भारतीय विचारशक्ती तर गेली शेकडो वर्षे परभृत झालेलीच आहे. आपण या बाबत हे गृहीत धरू की योगवासिष्ठ हा ग्रंथ रामगुरू वसिष्ठांचा म्हणजे रामगुरु वसिष्ठांचा एक लक्षात ठेवा की बौद्धविचार, सांख्यविचार वैशेषिक विचार, हे आणि असे विचारपंथ हे एकदाच कोण्या गौतम बुद्धाने किंवा कणादाने मांडले असे मानणे हे संकुचित विचाराचे ठरेल. उदाहरणार्थ लुम्बिनीप्रांतातील कैकट समाजातील सिद्धार्थाच्या समकाळांत पुष्कळ लोक स्वतःस बुद्ध म्हणत असत. खुद्द सिद्धार्थाचा देवदत्त हा चुलत भाऊही स्वतःला बुद्धच म्हणत असे. यापैकी कोणाचेही पाळण्यातले नाव ''बुद्ध'' असे नव्हते. आपल्या बुद्धीला योग्य वाटणारा विचार, प्रतिष्ठित होऊन लोकांपुढे मांडतो तो बौद्ध वा बुद्ध. तसा विचार मांडणारा गौतमीचा पुत्र तो 'गौतम' बुद्ध. मुळात ते विशेषनाम नाही. योगवासिष्ठांत बुद्धमतादिक मते खोडलेली असल्याने पुष्कळच, नव्या प्रमाणे जुन्या मताच्या लोकांसही योगवासिष्ठ हा गौतमबुद्धानंतरचा ग्रंथ आहे असे गैरसमजाने वाटते. पण पुन्हा सांगतो, तसे मानायचे काही कारण नाही. आपल्या बुद्धीला पटणारे तत्त्वज्ञान सांगणारे लोक ते चार्वाकांपेक्षा जरा जास्त विचार करणारे असले की 'बौद्ध' या कळपांत जातात. असे वरचेवर होत असते. काळ फार मोठा आहे.

आपल्या कालगणनेनुसार रामाला आठलक्ष चौसष्ट हजार वर्षांपेक्षा जास्त काळ गेला आहे; कारण राम हा त्रेतायुगाच्या अखेरीचा आहे. (पंचांग पहा) वसिष्ठ ब्रह्मदेवाचे पहिले मानसपुत्र आहेत. आज ते सप्तर्षींमधे तपोलोकांत वास्तव्य करीत आहेतच. आजच्या, चाचपडत चाचपडत जाणाऱ्या तुटपुंज्या विज्ञान विचारांना नवे वैज्ञानिकही परिपूर्ण मानीत नाहीत. त्यांनाही पृथ्वीचे वय खरेच माहीत नाही. तपोलोक ही जाणीव उत्पन्न होण्यास अद्याप पुष्कळ काळ जायला हवा आहे. त्यामुळे आपल्या परंपरेतील जाणिवांना खोटे म्हणण्याचे काहीच कारण नाही. मौज म्हणजे, अशा कृत्रिम प्रश्नांची उत्तरे या योगवासिष्ठांतच समर्पकपणे दिलेली आढळतात. यासाठी भारतीय सृष्टिरचनेवर विश्वास हवा !! असो. नमनासाठीच पुष्कळ तेल जळाले. (ही म्हण आजच्या मराठी वाचकास कळेल का ?)

आता मागील लेखाचे अनुसंधान सोबत घेऊन आपण या लेखनास प्रारंभ करू. या वर्षी आपण प्रतिमास थोडे थोडे करीत महारामायण म्हणजेच जगप्रसिद्ध ''योगवासिष्ठ'' समजून घेणार आहोत.

विद्याभ्यासानंतर तीर्थयात्रेहून आलेला राम जगातील, कधी दूर न करिता येऊ शकणारी दुःखे पाहून कमालीचा निराश झालेल्या अवस्थेत अनेक महिने होता. दशरथाने

तो सुधारावा म्हणून पुष्कळ निष्फळ ठरलेले प्रयत्न करून झाले होते. राम कोणांत मिसळत नाही, त्याला कोणतीच मनोरंजनाची गोष्ट अगदी डोळ्यासमोर नको असते, मित्रपरिवार, गप्पाटप्पा, खाणेपिणे, फिरायला जाणे, अभ्यास करणे, काम करणे, आईवडिलांशी मोकळेपणे चार गप्पागोष्टी करणे, स्त्रियांत रमणे, उपासना करणे...कशाकशांतच लक्ष लागत नव्हते. तो फिका पडला होता, रोडावला होता. पण त्याचा आजार अगदी मानसिक होता. त्यावर औषध सापडत नव्हते. दशरथ कौसल्या अर्थातच चिंतेमध्ये होते.

अशा परिस्थितीत एकदम विश्वामित्र ऋषी एकदा रामाला मागण्यास आले. त्यांच्या एका यज्ञसंरक्षणासाठी त्यांना रामच हवा होता. १५ वर्षाच्या बाल रामास एवढ्या महत्त्वाच्या काभगिरीवर पाठविणेस दशरथ घाबरत होता. म्हणून दशरथ स्वतः त्या कामगिरीस अक्षौहिणी सैन्यासह निघाला तर विश्वामित्रांना क्रोध आला. तेव्हा दशरथगुरू वसिष्ठांनी दशरथास समजावले की रामाचे कल्याण करण्यासाठी ते त्यालाच नेण्याचा हट्ट धरीत आहेत. तू निश्चिंतपणे रामाला त्यांचे बरोबर पाठव. दशरथास तो मुद्दा पटला पण रामाच्या मानसिक आजारपणाची अडचण मोठीच होती. त्याने ती मोकळेपणाने भर सभेत वसिष्ठ-विश्वामित्रांस सांगितली. विश्वामित्रांनी तत्काळ रामाला पाचारण करविले. त्यावेळी राम आपल्या बंधुंसह सभेत आला. (इथवर पहिल्या वैराग्य प्रकरणाचे ३५ अभंग झाले आहेत.) आता अभंग ३४-३५ पहा-

**योगायोगे तोंचि बंधुंसवे राम।**
**सभेंत येउनि सकलां वंदी।।**
**पात्रता तयाची दिसे मूर्तिमंत।**
**युवा परी शांत वृद्ध भासे।।**
**वासुदेव म्हणे अविवेकनाशे।**
**उद्विग्नता त्याते दिसली नाही।।**
**नव्हता उद्विग्न नव्हता आनंदित।**
**पूर्णप्रायेहित दिसला परी।।**
**पित्यासी वंदूनी उभय मुनींते।**
**वंदी सकलांसी यथाक्रम।।**
**वंदन राजांचे स्वीकारी प्रेमाने।**
**आदरे रामाते वंदिती ते।।**
**अंकावरी राव म्हणे तया बैस।**
**भूमीवरी तोंच बसला राम।।**
**मृदु गालीचा तो शोभविला रामे।**
**दशरथ प्रेमे वदला तया।।**
**वासुदेव म्हणे ज्ञात्यांच्या उपदेशे।**
**वागावे, रामाते म्हणे राव।।**

आता, विश्वामित्रांनी संवाद सुरू केला. ते त्याला म्हणाले की रामा, सामान्य माणसासारखा तू विषयलंपट नक्कीच नाहीस. तरीही काहीतरी असे घडले आहे की कोणतासा उंदीर तुझ्या चित्ताच्या घरात घुसला आहे खरा, की जो तुझ्या चित्तगृहांत मोहाची बिळे पाडीत बसला आहे. तेव्हा या चित्तांत तो उंदीर काय धिंगाणा घालतो आहे ते सांग. आपण हां हां म्हणता त्याचा पक्का बंदोबस्त करू. रामाने प्रवासाहून आल्यावर राजवाड्याबाहेरच्या जगाच्या दर्शनाचा मनावर जो परिणाम झाला त्याचे पद्धतशीर वर्णन केलेले दिसून येते. ते वाचल्यावर संवेदनाक्षम चित्त थोड्याच अनुभवाने पुष्कळ ज्ञान कसे घेऊ शकते हे लक्षात येते. विशेषतः आज लोकशाहीच्या २०१३ सालात, दरमहा ६०० रुपयांत ५-६ माणसांचा संसार सहज होऊ शकतो असे बेलाशक विधान करणाऱ्या मंत्री लोकांच्या दगडासारख्या निःसंवेदनशीलतेची आठवण झाल्यावाचून राहवत नाही.

राम म्हणतो की माणूस सुखामागे धावतो. जसा हरिण मृगजळामागे धावतो. त्याने पळणाऱ्याची दमणूक मात्र होते. खरेतर आपला आनंद हा आपल्या स्वाधीन आहे पण तो अमुक आपल्याजवळ असले तरच आहे, तमुक मिळेल तर आहे, तमुक घडले नाही तरच आहे असा दुसऱ्या कुठल्यातरी वस्तूवर किंवा घटनेवर अवलंबून आहे असे माणसाला का वाटते ते कळत नाही. कधी कधी तो अगदी महान् तत्त्वज्ञानाप्रमाणे संसाराचा व्यर्थपणा दुसऱ्याला उपदेशिताना दिसतो; पण स्वतःच्या लौकिक

स्वार्थासाठी मात्र तो डोळ्यांत तेल घालून झटताना दिसतो. स्वतः जितका मूर्ख तितका तो स्वतःला अधिकाधिक शाहाणा, बुद्धिमान समजत असतो. कुठल्यातरी क्षुद्र गोष्टीलाच क्षणभर सर्वसुखाचे आगर समजून, वास्तविक अजिबातच तसे नसल्याने तोंडघशी पडून नंतर दुःखातिरेकाने चरफडत बसतो.

हे असे का होते ? घोडे नेमके कुठे पेंड खाते की त्यामुळे स्वतःहूनच पिंजऱ्यात अडकून नंतर चरफडत बसायची नेहेमी वेळ येत असूनही माणूस परत परत मोहात का पडतो ? मला तर असे समजून घ्यावे वाटते की असे स्वतःलाच सतत मोहांत गुरफटविणारे, फसविणारे जग आहे तरी काय ? ते कशाने जन्मले? त्याचे नेमके उद्दिष्ट तरी काय आहे? या स्वतःला कोणत्या तरी भ्रमात अडकवून स्वतःच त्याबद्दल रडत बसायच्या व्यूहांना काही अंत आहे का ? वेगवेगळे मुद्दे विचारात घेताना राम म्हणतो–

**※ संपत्तिनिंदा**

काही लोकांना वाटते की संपत्तीची वाण असली तरच दुःख माणसाला स्पर्श करते. ज्याच्या जवळ लक्ष्मी तो सर्व संकटांवर मात करतो. पण मला तर असे प्रत्ययाला येते की असे मानणे हेच मोठ्या संकटाला आपण होऊन पाचारण करणे आहे. कारण

१) लक्ष्मी इतके चंचल दुनियेत कोणी दिसत नाही. ज्यांच्याकडे लक्ष्मी वास करून आहेसे आपल्याला वाटते तो दुरून डोंगर साजरे असा प्रकार असतो. कशावरून ? तर, लक्ष्मीवानास जर तिच्या स्थिरतेची खात्री असती तर तो तिच्या पाठीस लागला नसता. उदाहरणार्थ आपल्याला आपल्या गृहलक्ष्मीबद्दल खात्री असल्याने आपण तिच्या सतत पाठीस न लागता निर्धास्तपणे इतर व्यवहारात मन घालू शकतो; पण लक्ष्मीवान तर सतत लक्ष्मीच्याच मागे असतो. तिचा सद्व्यय सुद्धा त्याला सहसा जमत नाही.

२) लक्ष्मीच्या मागे लागलेला माणूस हा उद्दाम होतो. सज्जन माणसाचीही सद्बुद्धी लक्ष्मीमुळे उलटी होते. लक्ष्मी ही दर्प आणणारी आहे. तो दर्प, ताठाच पुष्कळदा लक्ष्मीवंतास दारिद्र्य देतो.

३) पैशासाठी पुष्कळवेळा माणूस अत्यंत निंद्य कर्मे करतो. त्यामुळे पुष्कळदा त्याची लोकांत छी-थू होत असते. पण हावरटपणापायी तो कोडगेपणाचा दागिना आनंदाने मिरवीत असतो. त्यामुळेच तो स्वतःची संवेदनक्षमता आपण होऊन नष्ट करीत असतो आणि त्यातच त्याचा फार मोठा आंतरिक ऱ्हास होत असतो. विवेकशून्यतेमुळे त्याने सद्भिरूची गमावलेली असते. हळू हळू पशुतुल्य किंवा कीड्यामुंगीसारखी शूद्र होत गेलेली त्याची वृत्ती त्याला पुढील जन्म माणसाचा कसा देणार ?

४) आपणच जोपासलेल्या संवेदनाशून्य ताठ्यामुळे ज्याच्याकडून पुष्कळ ज्ञेय-अज्ञेय शत्रू त्याने तयार केलेले असतात, ते त्याची लक्ष्मी हिरावून कोणत्या क्षणी घेतात हे त्याला सारे आटोपल्यावरच कळते. तेव्हा वेळ हाताबाहेर निघून गेलेली असते.

**※ आयुष्यनिंदा**

पुढे राम 'आयुष्य' या कल्पनेचा समाचार घेतो. तो म्हणतो –

१) आयुष्य हे कमळाच्या पानावरील जलबिंदूरूप तथाकथित मोत्याप्रमाणे क्षणभंगुर आहे. एखादा उन्मत्त माणूस जसा आपल्याला केव्हाही दगा देऊ शकतो तसे ते आपणास केव्हाही दगा देऊ शकते.

२) आपण आपल्या देहालाच ''मी'' असे जोवर म्हणतो तोवर आयुष्य हे दुःखावह आहे. कारण ते वरील कारणामुळे अगदी बेभरंवशाचे आहे. आता शरीरच जर ''मी'' असेन तर शरीर कोणत्याही क्षणी या जगाचा निरोप घेण्याची शक्यता असल्याने काही लोक असा युक्तिवाद करतात की हाताशी आयुष्य आहे तेवढ्यात जमेल तेवढी मौजमजा घाईघाईने करून घेणे हेच महत्त्वाचे. पण या युक्तिवादामागील तत्त्वज्ञानाची बैठक अगदीच कुचकामी आहे. कारण आपण जर असा विचार करू की मी म्हणजेच जर

शरीर असे मानले तर आयुष्य हे शरीराला म्हणजे पर्यायाने मला असते. शरीराला, म्हणजे मला अनेक अवयव म्हणजे इंद्रिये असतात. पण असे दिसून येते की जेवढे आयुष्य शरीराचे असते तेवढेच आयुष्य त्याच्या अवयवांचे असते असे नाही. पण काही अवयवांचेच आयुष्य संपले की ''मी''चे आयुष्य संपले असे होते.

आपले पुष्कळ अवयव- इंद्रिये अशी उरलेली असतात की ज्यांचे आयुष्य चांगले धडधाकट असते. उदाहरणार्थ डोळे, नाक, कान, जीभ, त्वचा, हात, पाय व आतील पुष्कळ इंद्रिये या पैकी पुष्कळ कधीकधी सर्व इंद्रिये शाबूत असूनही आपण म्हणजे ''मी'' मात्र मेलेलो असतो हा काय प्रकार आहे ? समजा हृदयक्रिया बंद पडली तरी हृदय तर ठीकच असते ना! त्याची हालचाल मात्र बंद पडलेली असते. ही हालचाल शरीररूपी 'मी' करीत असतो का ? नक्कीच नाही. उलट असे मात्र म्हणता येते की कोणीतरी एक ''मी'' असतो की जो हृदयाची, आणि शरीराच्या विविध अवयवांची हालचाल करू शकतो त्या हालचालींचा अर्थ जाणून घेऊ शकतो, त्यातील आनंद व दुःख भोगू शकतो. गंमत म्हणजे आज जी गोष्ट आनंदाची-सुखाची वाटत असते तीच मागल्या किंवा पुढल्या कोणत्यातरी क्षणी दुःखाची वाटणारी असते. तात्पर्य, शरीराला ''मी'' म्हणणे हा बालहट्ट आहे. ''मी'' वेगळा, शरीर वेगळे हे खरे.

३) दीर्घायुष्य हेही सौख्यद आहेसे दिसून येत नाहीच. तरीही आयुष्याचा सोस माणसाला असतोच. तारुण्य तर कणाकणाने नष्ट होत असते. सगे सोयरे गेल्याच्या मनाला धक्का देणाऱ्या बातम्या रोज कानावर येत असतात. नव्या जगाच्या दृष्टीने तुमची किंमत शून्य असते. तरुण पिढी तुमची कदर करीत नसते. असे हे आयुष्याबाबतचे सुख हे बेभरंवशाचे आहे.

आता आपण रामाच्या वरील विवेचनांत आलेल्या विषयांस समजून देण्यासाठी रामाने काही सुंदर उदाहरणे दिली ती थोडी पाहू.

१) चिंतूनि अंतरी पेटतो सर्वदा आप्तगोतास्तव गिळतो सारे ।।
वनगज जैसा शृंखलानिबध्द अंतरीच दुःख करी बहु।
तैसी मुनिश्रेष्ठा अवस्था हे माझी कोंडल्या या वृत्ती स्वजनांस्तव ।।

२) अज्ञानांधःकारयुक्त रात्रीमाजी विषयचोरांची पडली धाड।
विवेक सद्रत्न हराया धांवतां ज्ञानवीरच त्या जिंकू शके।।

३) 'सुखदायी लक्ष्मी' मानितातीी मूढ परी ती विवेक हरण करी ।।
स्पर्शिता दाहक दुष्टां होई वश करिते निष्ठुर धनवंतासी ।।
रक्षकाही नाशी जेवी विषलता तेवी लक्ष्मीवंता लक्ष्मी नाशी ।।

४) पल्लवाग्रजल बिंदूसमतेवी मुने आयुष्यही क्षणभंगुर।
उन्मत्तासम ते त्यागील आपणा भुजंगालिंगनासम घोर ।।
बंधन वायूसी खंडन नभाचे तरंगतंतूंचे वस्त्र होई।
म्हणता ऐसे कोणी मानावा विश्वास परी न विश्वास आयुष्याचा ।।

रामाचे वयाच्या १५ व्या वर्षी अशा तऱ्हेचे जगाचे विदारक निरीक्षण ! अहंकार, चित्त, तृष्णा (वखवख), बाल्य, तारुण्य, म्हातारपण, काल.. या साऱ्यांबाबत आपली नकारात्मक मते राम या धड्यात मांडत आहे. ती आपण वैशाख महिन्यातील अंकांत मांडू.

अशा नकारात्मक झालेल्या रामाला, जवळ 'जिगर' या विना कोणतेही साधन नसतानाही विश्वविजेत्या रावणाला आडवे घालण्याइतके जबर मनःसामर्थ्य देणारा अफलातून बोध म्हणजे हे योगवासिष्ठ. हे वर्ष आपण त्याची मौज लुटूया.

या व पुढीलही कोणत्याही मजकुराबाबत काही शंका असल्यास लेखकाशी अवश्य संपर्क साधावा.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

# यज्ञसंकल्पना-१

स. भ. शरयु दाते, रामदासी, मिरज, जि. सांगली

प्राचीन काळी वेदमंत्रपठण, वेदघोष याला महत्त्व फार होते. ऋषी यज्ञ करीत असत. या यज्ञामध्ये वेदमंत्राच्या उच्चारणाला अधिक महत्त्व आहे. आजही कुठे कुठे ऋग्वेद संहिता स्वाहाकार केला जातो. कारण त्या वेदमंत्रात प्रचंड सामर्थ्य आहे. समर्थ म्हणतात-

**वेदी सामर्थ्य असे। जन उधरावया।** (७.६.२९)
**वेदाक्षर घडे ज्यासी। तो बोलिजे पुण्यरासी।**
**म्हणौनि वेदी सामर्थ्यासी। काय उणे।।३०।।** (दासबोध)

वेदमंत्राच्या केवळ श्रवणाने विशिष्ट परिणाम साधता येतो. भले अर्थ नाही कळला तरी केवळ ध्वनी लहरींच्या माध्यमातून विशिष्ट फळाची प्राप्ती होते. कारण वेद समाधीभाषेत ऋषींना स्फुरले, ते रचले असे म्हणत नाहीत. वेद दिसले म्हणजेच ऋषींना ते साधनेच्या अंती अवगत झाले अशी भाषा वापरली जाते.

वेद = ज्ञान. विद् (२ प.ब.)= जाणणे. जे जाणले जाते ते ज्ञान आणि ज्ञान = आत्मज्ञान. परमात्मस्वरूपाचे ज्ञान हे जाणून घेण्यासाठी वेदमंत्रघोष, मंत्रांचे श्रवण आवश्यक आहे. एक उदा. माझी एक विद्यार्थिनी आईच्या गर्भात असताना ऋग्वेद पारायण अखंड चालू होते. परिणामी ती मुलगी ४ थी, ७ वी स्कॉलरशीप परीक्षा, दहावी, बारावी, बी.एस.सी., एम्.एस्.सी. सर्व स्तरावर सातत्यानं मेरीटमध्ये आली. पुढे इंजिनियरींगच्या प्रथम वर्ष डिप्लोमाचं पुस्तकावर लेखक म्हणून तिचे नाव होते.

पाश्चात्त्य राष्ट्रे वेदांचा अभ्यास करीत आहेत. सौर सूक्ताच्या पठण-अनुष्ठानाने, श्रवणाने, हृद्रोग, नेत्ररोग, पंडुरोग बरे होतात. (शुकैषु मे हरिमोणं च नाशये) कारण ती सूर्योपासना आहे. समर्थ म्हणतात-

**वेदशास्त्र पुराण। भाग्ये जालिया श्रवण।**
**तेणे होईजे पावन। हे बोलती साधू।।**
**श्लोक अथवा श्लोकार्ध। नाही तरी श्लोकपाद।**
**श्रवण होता एक शब्द । नाना दोष जाती।।**

(भागवतातही 'श्लोकार्धं श्लोकपादं वा... असे म्हटले आहे.) अशा अनेक श्रेष्ठ ग्रंथांमध्ये वेदमंत्राचे महत्त्व पर्यायाने यज्ञाचे महत्त्व प्रतिपादिले आहे. शास्त्रांनी यज्ञ संकल्पनेचा विस्ताराने विचार केला आहे.

**यज्ञार्थात् कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबन्धनः।**
**तदर्थं कर्म कौन्तेय मुक्तसङ्गः समाचर।।**(३.९) भ.गीता

यज्ञासाठी- कर्तव्यपालनासाठी केल्या जाणाऱ्या कर्माव्यतिरिक्त हा मनुष्य लोक कर्मांनी बांधला गेला आहे. म्हणून हे अर्जुना, 'तू आसक्ती रहित होऊन कर्म कर,

गीतेच्या म्हणण्यानुसार सर्वस्वकर्तव्य = एक यज्ञच 'यज्ञ' शब्दाच्या अंतर्गत- यज्ञ, दान, तप, होम, तीर्थसेवन, व्रत हे सर्व येते. व्यवहारात - कर्तव्य म्हणून व्यापार, नोकरी, अध्ययन, अध्यापन इ. कर्मे ही शास्त्रविहित सांगितलेली आहेत. म्हणून ती कर्मे यज्ञच होत. जसे- डॉक्टर, वकील, बिल्डर यांनी प्रामाणिकपणे आपापली कर्मे केली तर तो यज्ञच होतो. बिल्डरने फार फायदा न घेता घरे बांधावीत. वकिलाने न्याय बाजू मांडून लोकांना न्याय मिळवून द्यावा वगैरे महाभारतात सजन कसाई-तराजूने पारडे व्यवस्थित ठेवून मांस विकल्याचे उदाहरण याचेच द्योतक आहे. म्हणून कर्मे कर्तव्य बुद्धीने करावीत; ती यज्ञस्वरूप होतात असे गीतेत म्हटले आहे.

यज्ञाया चरतः कर्म समग्र प्रविलीयते। (गीत. अ.४.२.३) ही कर्मे बंधनकारक होत नाहीत. कारण, 'मी करणारा' ही बुद्धीच तेथे नष्ट होते. कर्माचे फळ स्वतःच्या उपयोगापेक्षा जगाच्या कल्याणासाठी अर्पण करणे हाच

कर्मफलाचा त्याग आहे. असा त्याग केला की कर्म यज्ञस्वरूप होते. गीतेत अ. ३.१० मधील विचार पहा-

**सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः।**
**अनेन प्रसविष्यध्वं एष वोऽस्त्विष्ट कामधुक्।।** ३.१०

सृष्टीच्या प्रारंभी ब्रह्मदेवाने यज्ञासह प्रजा उत्पन्न केली. या यज्ञाने तुमची मनोकामना पूर्ण होवो असे ते म्हणतात. म्हणून

**देवान् भावयतानेन ते देवा भावयन्तु वः।**
**परस्परं भावयन्तः श्रेयः परमवाप्स्य थ।।**(११)

या यज्ञाने तुम्ही देवांना संतुष्ट करा, मग ते देव तुम्हाला संतुष्ट करतील. अशाप्रकारे परस्परांना संतुष्ट करून, तुम्ही आत्यंतिक कल्याण प्राप्त करून घ्यावे. परंतु

**इष्टान् भोगान् हि वो देवाः दास्यन्ते यज्ञभाविताः।**
**तैर्दत्तान प्रजायैभ्यो यो भुङ्क्ते स्तेन एव सः।।**(१२)

यज्ञाने संतुष्ट झालेले देव तुम्हाला इच्छित भोग देतील. मात्र त्यांनी दिलेल्यापैकी काहीही त्यांना न देता, स्वतःच त्या सर्वाचा उपभोग घेतो. तो चोर होय. (स्तेन एव सः) या दृष्टीने श्रीमद्भागवतातील रतिदेवाचे चरित्र वाचण्यासारखे आहे.

यज्ञ करून राहिलेल्या भागाचा उपभोग घ्यावा.

**यज्ञशिष्टाशिनः सन्तो मुच्यते सर्वकिल्बिषैः।**
**भुञ्जते ते त्वघं पापा ये पचन्त्यात्मकारणात्।।**(१३)

राहिलेल्या भागाचा उपभोग घेणारे सज्जन सर्व पापांपासून मुक्त होतात. पण जे स्वतःसाठीच अन्न शिजवितात(पचन्ति आत्मकारणात्) ते पापच खातात. म्हणून ते पापीच होत. ते अन्न सात्त्विक अन्न म्हणता येणार नाही. भागवतातला विचार पहा- यावद् भ्रियेत जठरं तावद् युक्तं हि देहिनाम्। अधिकं यो हि मन्येत स स्तेन इति उच्यते।।

उदरभरणापुरतेच म्हणजे देहाला आवश्यक तेवढेच मिळवावे. ते योग्यच आहे. पण त्यापेक्षा अधिकाची जो अपेक्षा करतो वा मिळवतो तो चोरच होय. निदान मिळविलेल्या अधिक अन्नाचा वा द्रव्याचा उपयोग दुसऱ्यांसाठी करावा. या हेतूनेच तैत्तिरीय उपनिषदातही अन्नं बहु कुर्वीत। तद् व्रतम्। म्हटले आहे. कशासाठी ? अतिथी धर्म पाळता यावा म्हणून. व्रत म्हणून कर्म करावे. संन्याशाने तीन दिवसापेक्षा जास्त काळ एका जागी राहू नये असे शास्त्र सांगते. अशांना सतत फिरत राहावे लागते. पण त्यांनाही क्षुधाशांतीसाठी अन्न हेच ते गृहस्थधर्मात शक्य होते. म्हणून गृहस्थाने अन्नाचा साठा करावा. पण तो दानासाठी. असे दान 'सात्त्विक दान' होय. व ते कर्म यज्ञच होय.

प्रजापतीने यज्ञासह ही सृष्टी उत्पन्न केली. त्यात मनुष्याबरोबरच प्राणी , वृक्ष, सूर्य इ.चा समावेश होतो हे सर्व स्वभावतःच यज्ञ उत्पन्न करीत असतात. **१) मनुष्य-** हा ज्ञान प्राप्त करतो. आपले धर्मविषयक कर्तव्य ज्ञानपूर्वक करीत असतो. **२) वृक्ष-** छायामन्यस्य कुर्वन्ति निष्ठान्ति स्वयमातपे हे सुभाषित प्रसिद्धच आहे. **३) सूर्य-** आकाशात तळपत असतो. का ? प्राणिसृष्टीसाठी, जगतकल्याणासाठी तो नसताच तर सृष्टीच राहणार नाही. म्हणून तो प्रकाश शक्तीचे समर्पण करीत असतो. आत्मतेजाने तळपत इतरांना तेज, प्रकाश, आरोग्य प्रदान करीत असतो. हा सूर्याचा यज्ञच होय. तो वनस्पतींचा प्राणच होय.

**४) वायू-** हा क्षणभर बंद होईल तर ? आत्मसमर्पण करणे थांबवील तर--! अनर्थ होईल. तो शरीरात संचार करतो. चलनवलन करतो म्हणून तर देहाचे व्यवहार नीट चालतात. (अहं वैश्वानरो भूत्वा-- हा श्लोक प्रसिद्ध आहे.) प्राणापान समायुक्तः पचाम्यन्न चतुर्विधम्।। **५) मेघ-** परोपकारार्थ वर्षाव करतो. संपूर्ण वृष्टी करून तो मोकळा होतो. वृष्टी हेच त्याचे समर्पण. नदी-नद पाण्याने भरून टाकतो. म्हणजे सर्वस्वाचे दान करतो. समर्पणाच्या बाबतीत मेघाची बरोबरी कोण करू शकेल ? याप्रमाणेच वृक्ष-वेली, नद्या, सज्जन, चंद्र यांचेही जीवन समर्पितच आहे. म्हणून सृष्टीतील या सर्वांचे समर्पण हा एक यज्ञच आहे. **६) भूमी-** ही भूमी प्राणिमात्रांना पुष्टी मिळवण्यासाठी अन्नभाग उत्पन्न करते. मधुर रसाने सर्वांना

तृप्त करून सोडते. सृष्टीतील हे सर्वजण आपला स्वाहाकार पूर्णपणे करून आम्हाला सुख, आनंद देण्यासाठी शक्तीची पराकाष्ठा करतात. हा सतत चाललेला त्यांचा यज्ञच होय. सर्व जगाकडे, या दृष्टीने पाहिले पाहिजे. हे अस्तित्व टिकवायचे तर 'त्याग', 'समर्पण' आवश्यक आहे. भारतदेश ही त्यागभूमी आहे. बाकी सर्व भोगभूमी आहे. म्हणून तर नाथराय म्हणतात- 'भरतखंडी नरदेहप्राप्ती। हे तो परमभाग्याची संपत्ती।। त्यागावरच सर्व जगाची स्थिती अवलंबून आहे. कशी ? ते विविध प्रकारच्या यज्ञप्रकाराद्धारा पाहू ! यज्ञसंकल्पना अनेक प्रकारे सांगता येईल.

**१) शरीरातील यज्ञ-**

वर एकदा प्राण-अपानाचा उल्लेख आला. प्राण, अपान, समान इ. पंचप्राण शरीरात व्यवस्थित असतील तरच व्यक्तीचे शरीर धड राहील. पचन नीट होईल. त्यावरच शरीराचे स्वास्थ्य अवलंबून आहे.

शरीरात डोळे पाहण्याचे काम करतात. दर्शनभक्तीचे समर्पण.

कान ऐकण्याचे काम करतात- श्रवणभक्तीचे समर्पण. याप्रमाणेच नाक, हात-पाय आपापले काम चोख करतात.म्हणजेच आत्मशक्तीचे समर्पण करीत असतात. मग पथ्य काय ? तर म. गांधीजींची 'तीन बंदरों की कथा' सदैव लक्षात ठेवावी. चांगले तेच पहा, चांगले तेच ऐका आणि चांगले तेच बोला. 'भद्रं कर्णेभिः--- या शांतिमंत्रात हाच संदेश उपनिषदांनी दिला आहे. समर्थही सांगतात- सदा देवकाजी झिजे देह ज्याचा... (मनाचे श्लोक क्र. ४८) शरीरात यज्ञ कसा चालतो. साधे उदा. डोळे रसदार फळ पाहतात, नाक त्याचा वास (चांगले/वाईट) घेते. हात ते मुखात घालतात. दात त्याचे चर्वण करतात. इ.पुढे मग पचन होते. या सर्वांत इंद्रियांचा स्वार्थ नाही. प्रत्येक इंद्रिय शक्तीची पराकाष्ठा करून शरीराला सामर्थ्य प्रदान करते.


**२) राष्ट्रयज्ञ-** शरीरात जसा अखंड यज्ञ चालू आहे, तसाच तो राष्ट्रातही चालू आहे. शरीराची प्रतिरूपता राष्ट्रात पहायला मिळते. १) ज्ञानी लोक राष्ट्राच्या कल्याणासाठी ज्ञानाचा यज्ञ करतात. जसे शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ इ. २) वीर शूर= आपले जीवन समर्पित करून राष्ट्राचे संरक्षण करतात. ३) इतरही लोक- म्हणजे कारागीर, शिल्पी राष्ट्रासाठी आपापल्या परीने जीवन समर्पण करतात. उदा. कैलासची लेणी. शिल्पकारांचे कौशल्य येथे पणास लागले आहे.यातील 'कैलास लेणे क्र. १६ हे तयार होण्यास २०० वर्षे लागली. एक शिल्पी आला काही कौशल्य समर्पित केले. दुसरा, तिसरा असे अनेक आले. तेव्हा कुठे ते शिल्प साकारले गेले. यात प्रत्येकाचे समर्पण आहे व तो त्यांचा कलेद्धारा यज्ञच आहे.

शरीर हे लहान, मर्यादित राष्ट्र तर राष्ट्र हा विस्तृत देह/शरीर 'पुरुषसूक्तात' विराट पुरुषाचे वर्णन आहे. 'सहस्रशीर्षा पुरुषः सहस्रपात-- इ. यात ब्राह्मण ज्ञानदान करतात. म्हणून ते मुख म्हटले आहे.क्षत्रिय राजे बाहूंनी राष्ट्राचे रक्षण करतात. वैश्य ऊरू (मांड्या) द्धारा,व्यापार करतात, शूद्र पायाद्धारा राष्ट्राची सेवा करतात. परंतु इथे कोणताही श्रेष्ठ कनिष्ठतेचा भाव नाही. कारण १) ज्ञानदान २) संरक्षण ३) व्यापार ४) सेवा ही सर्व कर्मे चालू आहेत. तोवरच राष्ट्रउभारणी चांगल्याप्रकारे होऊ शकते. म्हणून त्या प्रत्येकाचे कर्म श्रेष्ठच आहे. हा भाव पक्का हवा. म्हणून राष्ट्रात यज्ञबुद्धी असली पाहिजे. अशाप्रकारे राष्ट्र सुस्थितीत असल्यास लोकांची प्रवृत्ती यज्ञाकडे राहील. यातच राष्ट्राची उन्नती आहे.

*यज्ञसंकल्पनेचे अधिक विवेचन पुढील लेखात पाहू.*

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

**सुजन वाक्य**



केवलात्कर्मणो ज्ञानान्न हि मोक्षोऽभिजायते।
किं तूभाभ्यां भवेन्मोक्षः साधनंतूभयं विदुः।।

▶ **केवल कर्माने किंवा केवळ ज्ञानाने मोक्ष साध्य होत नाही, तर कर्म व ज्ञान ही मोक्षाची साधने आहेत.**

# समर्थांचा राम

**सौ. सीमा रिसबूड, संभाजीनगर.** फोन (०२४०)-२४५११६७

समर्थ रामदासांचे व रामाचे नाते अतूट, इतरांपेक्षा वेगळे होते. त्यांचा जन्मच रामनवमीला दुपारी १२ वाजता झाला. जन्माच्या वेळीच हे नाते दृढ झाले. काया, वाचा, मनाने रामासाठी होण्यासाठी या एकत्वात आड येणारे जिवलग, प्रपंच, देहबुध्दी, लोकाचार यांचा त्यांनी त्याग केला. स्वतःचे जीवनपुष्प श्रीरामचरणी वाहिले. नाशिकला श्रीरामाच्या दर्शनासाठी पायी प्रवास केला. गर्दीमध्ये वस्त्रांनी, पुष्पमाळांनी झाकलेले, धुपाच्या धुरानी झाकलेले श्रीराम त्यांना भावले नाहीत. ध्यानात मात्र सावळा,पितांबर नेसलेला, कोदंडधारी राम दिसला. आजानुबाहु, नानालंकारदीप्त, अभयकराने आश्वासन देणारा राम दिसला. सूक्ष्म ध्यानात हनुमंताने निर्गुण रूपाचा अनुभव दिला. हृदयमंदिरात श्रीराम स्थापन झाले. हाच अनुभव श्वासागणिक राहावा म्हणून १३ कोटी राम नामाचा जप टाकळीला केला. रात्री रामायणाचे लेखन करत आदिकांड, आरण्यकांड, किष्किधाकांड, सुंदरकांड, युद्धकांड लिहून काढली. साधनेनंतर रामदासांच्या व्यक्तिमत्त्वात बदल झाला. नेत्र वेधक झाले, बाहू पुष्ट, बलदंड छाती, डोक्यावर कुरळ्या केसांचा जटाभार, तपश्चर्येचे, विद्वत्तेचे तेज असे नारायणाचे ''रामदास'' झाले. त्यांच्या मुखातून येणारा ''जय जय रघुवीर समर्थ'' चा ललकार तेजस्वी, ओजस्वी, स्फूर्तिदायक, प्रेरणादायक, आश्वासक होता. त्यांचे मन व्यापक झाले ''राम आहे आदि अंती, राम सर्वांच्या चित्ती, हिन भाषेची व्युत्पत्ती राम नाम'' असे रामनाम ध्यानात, मनात रुजले.

समर्थ देशाटनात अयोध्येला पोहोचले. श्रीरामाच्या वास्तव्याने पावन झालेला तो प्रदेश तिथे सारेच राममय. ''जेथे जावे तेथे राम समागमी'' हा अनुभव आला. सगुण श्रीराम, मनातला आत्माराम, जनामध्ये दिसणारा आत्माराम सारे एकरूप झाले. अयोध्येतच आपण स्वरूप संप्रदाय, अयोध्यामठ, जानकीदेवी रघुनाथ दैवत हा समर्थ संप्रदाय स्थापन करावा असे वाटले. देशाटनाहून आल्यावर चाफळला राममंदिराची उभारणी केली. मंदिरासाठी भिक्षा मागताना २०५ मनाचे श्लोक रचले ''प्रभाते मनी राम चिंतीत जावा'' नुपेक्षी कदा रामदासाभिमानी'' ''जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा'' हे श्लोकातील चरण स्फूर्तिदायक, प्रेरणादायक, रामाचे अस्तित्व जाणवणारे होते. लोकांच्या मनात प्रभुरामाचा आदर्श रुजवला. मंदिराची उभारणी झाली. अंगापुरच्या डोहात मूर्ती सापडली.''राघोबा उदारा, ये माझ्या मंदिरा'' अशी समर्थांनी प्रार्थना केली. हे मंदिर म्हणजे सामाजिक उत्थापन होते. विकासाची प्रतिष्ठापना होती. आनंदवनभुवनाच्या स्वप्नाचा शुभारंभ होता.

नवविधाभक्तीने समर्थांनी सगुण, निर्गुण राम आपलासा केला. श्रवण, कीर्तन, नामस्मरण, वंदन, दास्य, सख्य व अर्चन, पादसेवन, आत्मनिवेदनाने ते अंतर्बाह्य रामाचे झाले. ''तुझा मी टोणपा झालो, कष्टलो बहूतां परी'', ''काया वाचा, मनोभावे तुझा मी म्हणवितसे हे लाज तुजला माझी, राम माझे ध्यानी, राम माझे मनी, शोभे सिंहासनी राम माझा'' ही त्यांची वचने ते निस्सीम रामाचे भक्त झाले याची साक्ष देतात. रामावतार व १६ वे शतक यातील काळाचे अंतर त्यांनी दूर केले. त्यांचे एकमेव दास्य श्रीराम, एकमेव लक्ष्य श्री रघुपतीचे चरण होते. देवाने दिलेल्या नरदेहाचा उपयोग श्रीराम उपासनेसाठी करायचा हे त्यांनी ठरवले. त्याने स्वर दिला रामकथा गायला, पाय दिले रामरंगी नाचायला, हात दिले विश्वात्मकाची सेवा करायला, डोळे दिले त्याचे सगुण

... *उर्वरित पान २९ वर*

# ‘बोलक्या पुस्तकातील’ दासबोध
## राज्य मराठी विकास संस्थेचा उपक्रम




*कपट आणि मत्सर। उठे देहीं तिरस्कार।*
*अथवा कामाचा विकार। तो रजोगुण।।*
*संसाराचे बहुत कष्ट। कैसा होईल सेवट।*
*मनास आठवे संकट। तो रजोगुण।।*

**श्रीसमर्थ रामदास रचित दासबोधातील अशा रचना जगण्यातलं सार सांगणाऱ्या आहेत. सुमारे साडेतीनशे वर्षांपूर्वीच्या या ग्रंथाला आता आधुनिक तंत्रज्ञानाचा वरदहस्त लाभला आहे. राज्य मराठी विकास संस्थेच्या माध्यमातून दासबोधाचं ऑडिओ बुक करण्याची अभिनव कल्पना राज्य शासनानं प्रत्यक्षात आणली आहे. त्यामुळे सुमारे सात हजार आठशे ओव्यांचा प्रचंड मोठा आवाका असलेला ह्य ग्रंथ ऑडिओ बुकच्या माध्यमातून सादर करणं ही नक्कीच महत्त्वपूर्ण घटना असून, तब्बल नऊ महिने रेकॉर्डिंग चाललेलं पन्नास तासांचं हे भव्य ऑडिओ बुक आकाराला आलं.**

‘राज्य मराठी विकास संस्थे’ने ऑडिओ बुकचा उपक्रम हाती घेताना सर्वात प्रथम दासबोधासारख्या महत्त्वाच्या ग्रंथाला प्राधान्य दिले. ‘दासबोधाच्या’ या ऑडिओ बुकचं दिग्दर्शन आणि संगीत संयोजन संगीतकार राहुल रानडे यांनी आणि श्लोकांच गायन शास्त्रीय गायक पं.संजीव अभ्यंकर यांनी केलं आहे. वीस दशकांतील सुमारे सात हजार आठशे ओव्या रेकॉर्ड करण्याचे शिवधनुष्य त्यांनी यशस्वीपणे पेलले आहे. दासबोधाचं ऑडिओ बुक करताना त्याला कोणत्याही वाद्यांची आणि चालींची मखलाशी न करता अतिशय पारंपरिक पद्धतीने केवळ तानपुरा आणि पं. संजीव अभ्यंकर यांच्या आवाजातून तो आकाराला आला. त्यासाठी तब्बल नऊ महिन्यांचा कालावधी लागला. तब्बल पन्नास तासांचं हे ऑडिओ बुक कदाचित सर्वात जास्त लांबीचं ऑडिओ बुक ठरावं. त्यातील भाषेबाबत संस्कृतचे ज्येष्ठ अभ्यासक प्रा. गोविंद काळे यांचे मार्गदर्शन लाभले.

इतक्या मोठ्या ऑडिओ बुकच्या प्रकल्पाविषयी रानडे म्हणतात,‘काही सिनेमांच्या निमित्ताने श्लोकांशी संबंधित काम केलं असलं तरी दासबोधाचं ऑडिओ बुक करताना त्यातील श्लोकांची प्रचंड संख्या हेच खरं आव्हान होतं. तसंच ऐकणाऱ्या प्रत्येकाला तो आवडण्यासाठी स्वच्छ उच्चारण आणि त्याचं पावित्र्य टिकवणं नितांत आवश्यक होत. हे गुण पं. संजीव अभ्यंकर यांच्या गायकीत असल्यानं त्यांना विचारलं. त्यांचा होकार आल्यावर ‘ट्रायल अँड एरर’ अशा पद्धतीनं काम सुरू झालं. रेकॉर्डिंग, त्याचं संकलन, ऐकणं, सुधारणा आणि मिक्सिंग अशा पाच टप्प्यांतून ती सगळी प्रक्रिया गेलेली असल्यानं ती शक्य तेवढी निर्दोष होऊ शकली. एप्रिल ते जानेवारी ह्या नऊ महिन्यांच्या काळात केवळ याच प्रकल्पानं झपाटलं होतं. या नऊ महिन्यांमध्ये प्रकल्पाच्या सुरुवातीला असलेली ऊर्जा कायम ठेवण्याचं आव्हान होतं. पण पं.अभ्यंकर यांनी ते सातत्यपूर्ण पद्धतीने टिकवून ठेवल्यानं या ऑडिओ बुकचा दर्जा उत्तम झाला. पुण्यातील डॉन स्टुडिओच्या रेकॉर्डिस्ट अर्चना म्हसवडे यांच्यासह संकेत घोटणकर आणि यश रानडे यांच्या सहकार्यामुळेच ही मोठी जबाबदारी पेलणं शक्य झालं.’

‘दासबोधातील शब्दप्रधान रचना ऑडिओ बुकच्या स्वरूपात आणताना गायकीला वाव नव्हता. श्लोकाचे भाव आणि आशय समजून घेऊन, ते रसाळ पद्धतीने सादर करणे महत्त्वाचं होतं. श्लोकांमध्ये संपूर्ण भाव उतरावा, यासाठी शांतपणे, सर्व शक्ती पणाला लावून हे काम केलं. हे काम म्हणजे एक महत्त्वाची संधी असल्यानं त्यावेळी ‘मरावे परि कीर्तिरूपी उरावे’ ही समर्थांचीच

उक्ती डोळ्यासमोर होती. मुळात माझ्यावर असलेल्या भाषेच्या संस्कारांचा, माझ्या चिंतनाचा, संवेदनशीलतेचा या कामी फायदा झाला. या आधीही रामदास स्वामींच्या रचनांवरील दोन अल्बम केल्याने त्यांच्या लेखनाशी नाळ जुळली होती,' असे पं. संजीव अभ्यंकर यांनी स्पष्ट केले.

'मराठी साहित्यातील उत्तमोत्तम पुस्तकांचं डॉक्युमेंटेशन आणि प्रसार करण्यासाठी ती श्राव्य स्वरूपात आणावीत असा प्रस्ताव राज्य शासनानं राज्य मराठी विकास संस्थेकडे मांडला. त्यात दासबोधाचं ऑडिओ बुक करण्याची कल्पना स्वतः मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनीच सुचवली होती.आताच्या काळात दासबोध घरात ठेवणं, तो वाचणं शक्य होईलच असं नाही; पण तो ऐकणं शक्य आहे. ऑडिओ बुकच्या माध्यमातून त्यातलं परिपूर्ण तत्त्वज्ञान सर्वांपर्यंत पोहोचू शकेल. तंत्रज्ञानाशी हातमिळवणी करून मराठी साहित्याला वेगळा आयाम मिळवून देणें हाच राज्य मराठी विकास संस्थेचा प्रयत्न आहे', असं या प्रकल्पाचे निर्मितीप्रमुख गिरीश पतके यांनी सांगितलं.

महत्त्वाचं म्हणजे, हे सर्व साहित्य राज्य मराठी विकास संस्थेच्या वेबसाईटवरून विनामूल्य डाऊनलोड करता येईल.

(सौजन्य - दै. महाराष्ट्र टाइम्स)

**राज्य मराठी विकास संस्था, महाराष्ट्र शासन तसेच श्रीमत् ग्रंथराज दासबोध ऑडिओ बुक स्वरूपात साकारण्यासाठी परिश्रम करणारे सुप्रसिध्द गायक पं. संजीव अभ्यंकर, संगीतकार श्री. राहूल रानडे व सहकाऱ्यांचे श्रीरामदास स्वामी संस्थानच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि आभार!**

---

*...पान २७ वरून*

रूप पहायला, श्वास दिला अनुसंधान साधायला व आयुष्याचा प्रत्येक क्षण त्याचे दास्यत्व करायला घालवायचा हे त्यांनी ठरवले.

श्रीरामाच्या ध्यानात समर्थांनी विपुल लेखन केले. लेखनात श्रीराम शब्द वारंवार आहे. नभासारीखे राघवाचे रूप त्यांनी पाहिले. अनंत राघवाच्या पंथावरून प्रवास केला. कृपा केली दाशरथीने समर्थ कृपेची वचने तो हा ''दासबोध'' या विचारात लेखन करून श्रीरामांनी हे केले असे म्हणून अलिप्त राहिले. लोकांना रामनामाच्या गजरासाठी संघटित केले. आदर्श राजा, लोकनेता म्हणून कोदंडधारी श्रीराम हे आराध्यदैवत म्हणून लोकांसमोर ठेवले. शिवाजीराजांच्या राज्याभिषेकाच्या क्षणी श्रीरामाच्या राज्याभिषेकाचे स्मरण केले. ''तुझा तू वाढवी राजा, सीघ्र आम्हांची देखता अशी प्रार्थना रामवरदायिनी तुळजाभवानीला केली.

श्रीराम उपासनेने समर्थांनी समर्थ संप्रदायच राममय केला. महंत भिक्षा मागताना राममहिमा सांगत. त्या सुस्वराने अवघा महाराष्ट्र व ११०० मठांचा परिसर राममय झाला. तरुणांपुढे हनुमानाची बलोपासना ठेवून त्यांना ''यत्न तो देव जाणावा'' हा मंत्र दिला. सर्वांच्या अंतःकरणावर कोदंडधारी रामाची प्रतिमा कोरली. आपल्या साऱ्या मनोव्याधीवर रामनामाची मात्रा अवघ्या मराठी मनाला समर्थांनी दिली.

दरवर्षी चैत्र महिन्यात रामनवमी साजरे करणारे आपण व समर्थांची रामउपासना यात महद्‌तर आहे. म्हणून समर्थांचा राम वेगळा वाटतो. कोदंडधारी रामापासून त्यांनी आत्मारामापाशी निजबोधाचा संवाद केला. ''राम आणि दास दोघे पहुडले रामी, हे ही बोलावया दूजा नूरेच ते धामी'' असे हितगुज केले. स्वतःच आत्मरूप जाणून त्यांनी लक्षावधींच्या आत्म्याची हाक ऐकली. माणसातलं रामपण जागवलं. नरामधला नारायण जागा केला व त्याने सूर्यमंडळ भेदिले. ''अपराधी जन चुकत गेले पण ते तूझे आहेत तूच सावर'' असे रोखठोकपणे सांगितले. रघुनाथ भजने त्यांना आत्मज्ञान प्राप्त झाले. त्यांनी सद्विचारांची देवाण घेवाण केली. भव्य, उदात्त, उत्तुंग आनंदवनभुवनाचे स्वप्न पाहिले.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



संत तुकाराम महाराजांचे साखळीचे १२ अभंग

# तुका म्हणे (अभंग ४ था)

सौ. माधुरी दि. जोशी, बुलढाणा, मो. ९८२२१९०९६३

**जैसी गंगा वाहे तैसे त्याचे मन।**
**भगवंत जाण त्याचे जवळी ।। १ ।।**
**त्याचे जवळी देव भक्तिभावे उभा।**
**स्वानंदाचा गाभा तया दिसे ।। २ ।।**
**तया दिसे रूप अंगुष्ट प्रमाण।**
**अनुभवी खूण जाणती हे ।। ३ ।।**
**जाणती हे खूण स्वात्म अनुभवी।**
**तुका म्हणे पदवी ज्याची त्याला ।। ४ ।।**

गंगा ज्याप्रमाणे अत्यंत पवित्र आहे, त्याचप्रमाणे सिद्धाचेही मन अत्यंत पवित्र झालेले असते. कामक्रोधादि विकार संपूर्ण निघून गेल्याने मन निर्मळ, निर्विकारी होते. यत्किंचितही स्वार्थ शिल्लक राहिलेला नसतो. वासनेचा मळ पूर्णतः निघून गेलेला असतो. असे अंतःकरण भगवत् प्रेमाने भरून गेलेले असते. एका भगवंताशिवाय दुसरा कुठला विचार चित्ताला स्पर्शही करीत नाही. असे भगवंतमय झालेले चित्त अत्यंत शुद्ध व पवित्र असते. म्हणून अशा मनाला महाराज गंगेची उपमा देतात. अखंड प्रवाहरूप असणे, सागररूप होणे, तृषार्ताची तहान भागविणे, दोन्ही काठांवरील लोकांचे कल्याण करणे, तुष्टता पुष्टता, पवित्रता प्रदान करणे हे जसे गंगेचे कार्य होय अगदी तद्वतच सिद्ध पुरुषही अखंड कार्यरत असतो, सागराशी म्हणजे सत्चिदानंद परमात्म्याशी एकरूप झालेला असतो, साहजिकच मनाच्या पवित्रतेमुळे इतरांच्या कल्याणासाठी सतत झटत असतो. दुःखितांचे दुःख नाहीसे होण्यासाठी, अज्ञान दूर करण्यासाठी ज्ञानाची ओढ निर्माण करतो, भक्तिरसाचे पान करवून त्यांना पुष्ट करतो, आपल्या बोलण्याने, कृपादृष्टीने, स्पर्शाने इतरांना पावन करतो, त्यांचे पाप हरण करतो, अशा करुणामयी प्रेमळ भक्ताजवळ भगवंत अखंड वास करतो. नव्हे तो व भगवंत एकरूपच झालेले असतात. पुढे दुसऱ्या चरणात महाराज म्हणतात,

**''त्याचे जवळी देव भक्तिभावे उभा।**
**स्वानंदाचा गाभा तया दिसे ।। २ ।।**

त्याचे जवळ देव असतो असे म्हणण्यामध्ये द्वैत शिल्लकच असते. वाच्यार्थाने अर्थ असा घेतला तरी लक्षार्थाने अर्थ वेगळाच सूचित होतो. त्याचेजवळ देव म्हणजे तोच देव होऊन बसतो. ''देव पहाया गेलो अन् देवचि होवून ठेलो'' हा तुकोबांचा अनुभव आहे. तोच भाव याही अभंगात जाणवतो. अंतःकरण शुद्ध, पवित्र, शांत झाल्याने अंतरी असलेला आत्मा स्पष्टपणे दिसतो. अर्थात अनुभवण्यात येतो. म्हणजे मीच आत्मा आहे हे ज्ञान होते. ज्याप्रमाणे कैरीने आंबा पाहण्याचे ठरविले तेव्हा शेतकऱ्याने तिला एका खोलीत, एका जागी, बघणाऱ्याच्याही नजरेस पडणार नाही अशा अवस्थेत ठेवले व तिला सतत आंब्याचे चिंतन करण्यास सांगितले. त्या कैरीने आंबा पाहण्याचा ध्यास धरला. अखंड आंबा चिंतनात ती मग्न झाली. गुपचूप एकांतात पडून राहिलेली ती कैरी सावकाश एक दिवस स्वतःच्या नकळत, स्वतःचे अस्तित्व विसरून जाऊन आंबाच होऊन बसली. अगदी ह्या दृष्टांताप्रमाणे आत्मचिंतनात गढून गेलेला जीव, एकांतात आवडीने भगवंताला आळवता आळवता, स्वतःचा जीवभाव विसरून, अलगद गुरूकृपेने आत्मभावावर आरूढ होतो. आपल्या हृदयातच स्वानंदाचा गाभा त्याला गवसतो, ''पहावे आपणासी आपण या नांव ज्ञान'' ज्ञानरूप परमात्मा त्याच्या अंतरी त्याला अनुभवास येतो. जणू काही अंगुष्ठ मात्र परमात्म्याचे दर्शन त्यास होते. म्हणून महाराज पुढे म्हणतात,

**''तया दिसे रूप। अंगुष्ठ प्रमाण।**
**अनुभवी खूण। जाणती हे ।। ३ ।।**

ध्यान, चिंतन करता करता स्वानंदाचा गाभा त्याला दिसतो. तो स्वानंदाचा गाभा कसा असतो ? तर तो अंगुष्ठाप्रमाणे दिसतो, येथे शब्दशः अंगठ्याप्रमाणे दिसतो असा अर्थ घेता उपयोगाचे नाही. ह्या सांगण्यामागे गूढ अर्थ दडलेला आहे. हाताच्या पाचही बोटांमध्ये अंगठा हे अत्यंत महत्त्वाचे बोट आहे. कारण काहीही धरायचे वा उचलायचे झाल्यास अंगठा महत्त्वाचा असतो. निरक्षर व्यक्तीचा अंगठा महत्त्वाचा मानला जातो. त्या अंगठ्यावरून ती व्यक्ती ओळखता येते. व्यवहारात अशाप्रकारे अंगठ्याचे महत्त्व आपण जाणतोच. पण अध्यात्म्याच्या दृष्टीने, ज्ञानमुद्रेमध्ये अंगठा हे शिवाचे व तर्जनी हे जीवाचे प्रतीक समजले जाते. अंगठा व तर्जनी हे एकत्र जोडले असता शिव-जीवाची ऐक्यता दर्शविली जाते. अर्थात् जीवा-शिवाचे ऐक्य सूचित होते. कठोपनिषदात ''अंगुष्ठमात्र पुरुषः'' असे परमात्म्याचे वर्णन आहे. अर्थात हा सिद्धांच्या अनुभवाचा प्रांत आहे. म्हणून ''अनुभवी खूण जाणती हे।'' असे म्हटले आहे.

येथे तया दिसे रूप असे म्हटले आहे. अध्यात्म्याच्या दृष्टीने दिसणे-पाहणे ह्या शब्दांचे अर्थ अनुभवणे असा होतो. व्यवहारातही आपण चव पहा असे म्हणतो किंवा पोत पहा असे म्हणतो. पहा ह्याचा अर्थ चव अनुभव, पोत अनुभव असा केला जातो. त्याचप्रमाणे आत्मदर्शन होणे, स्वरूप पाहणे -दिसणे म्हणजे अनुभवणे होय. स्वानंदाचा गाभा त्याला दिसतो म्हणजे तो स्वानंदरूपाचा अनुभव घेतो आणि म्हणून स्वात्मानुभवी दुसऱ्या आत्मानुभवी माणसाला ओळखू शकतो, जाणू शकतो, ज्याप्रमाणे एखाद्या आईलाच आईपण काय आहे हे जाणता येते किंवा एखाद्या कलावंतालाच दुसऱ्या कलावंताची जाण असते, कलेची जाण असते. अथवा अरबी घोडा पळविणाऱ्यालाच अरबी घोड्याची उत्तम पारख असते. समर्थ एके ठिकाणी म्हणतात-

**''मंद हळुहळू चालतो। चपळ कैसा आटोपतो।**
**अरबी फिरविणार तो। कैसा असावा ।।१९/७/१८।।**

सावकाश चालणारा सामान्य घोडा बाळगणाऱ्याला वेगवान व अरबी घोडा कसा सांभाळता येईल ? त्याला तसाच पाहिजे. हे जसे आहे अगदी त्याचप्रमाणे आत्मानुभवी संतालाच आत्मानुभवाची जाण असते. म्हणून महाराज पुढच्या चरणात म्हणतात,

**''जाणती हे खूण स्वात्म अनुभवी।**
**तुका म्हणे पदवी ज्याची त्याला ।।४।।''**

संतच संताच्या मनाची अवस्था काय आहे हे जाणू शकतात. संतांच्या अंतरस्थितीची कल्पना सामान्य माणसाला येणे शक्य नाही. म्हणून संतांना ओळखण्यासाठी थोडेतरी संतत्व आपल्यामध्ये असले पाहिजे. संत हे बाहेरून चार चौघांसारखे दिसतात. चार चौघांसारखेच कपडेलत्ते, खाणे-पिणे, व्यवहार करणे सुरू असताना दिसते. पण त्यांच्या अंतःकरणाची स्थिती मात्र असामान्य असते. सामान्य माणसांचे सर्व व्यवहार राग-द्वेषाने लिप्त असतात. तर संताचे सर्व व्यवहार राग-द्वेष रहित, अलिप्ततेने केले जातात. सर्व काही करून ते अलिप्त व अकर्ते असतात. अंतःकरण केवळ एका ईश्वरी प्रेमाने भरलेले असते. परमात्म्याचा दिव्य अनुभव अंतरी रुजलेला असतो.''जाले साधनांचे फळ। संसार झाला सफळ। निर्गुण ब्रह्म ते निश्चळ। अंतरी बिंबले।।''

ह्या पातळीला (पदवीला) ते पोहचलेले असतात. म्हणून ज्याचा त्याचा अनुभव जो तोच जाणू शकतो. किंबहुना त्याच्यासारखाच दुसरा आत्मानुभवी त्याला ओळखू शकतो. जसे की उत्तम पोहोणाराच उत्तम पोहोणाऱ्याची पारख करू शकतो. तसेच हे आहे.

**''नाना चातुर्याच्या खुणा। चतुर जाणे। किंवा**
**''भेजणार खाली पडला। तो भेजणारी जाणितला।**
**नेणता लोक उगाच राहिला। टकमका पाहत ।।**१९-७-२।।

समजा एखादा, डोंबारी तारेची कसरत करताना खाली पडला तर तो का पडला हे डोंबाऱ्यालाच कळते. त्याचप्रमाणे आत्मानुभवाची स्थिती काय असते हे एक आत्मानुभवीच

जाणू शकतो. दुसऱ्या सामान्य माणसाला ते उमगू शकत नाही. इतर प्रेक्षक जसे त्या पडणाऱ्या डोंबाऱ्याकडे डोळे विस्फारून टकमका पाहत राहतात. केवळ सांगून, वाचून, ऐकून आत्मानुभव कळू शकणार नाही.''जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे'' अशी एक म्हण आहे. त्यानुसार आत्मानुभव ज्याचा त्यालाच कळतो. केवळ मौन राहणे हीच स्थिती त्या संदर्भात होते. आत्मानुभवी शांत, आनंदी, निर्भय, समाधानी, ज्ञानरूप तृप्त होऊन जातो. ही आंतरिक स्थिती बाहेरून लक्षात येऊ शकत नाही. अशा प्रकारची आंतरिक स्थिती होणे म्हणजे पारमार्थिक दृष्ट्या श्रेष्ठ पदवी प्राप्त करणे होय. परमात्मप्राप्ती होणे हेच परमार्थाचे सर्वोत्तम ध्येय होय. आत्मानुभव दृढ, अपरोक्ष, अपरिवर्तनीय झाला की त्या ध्येयाची प्राप्ती झाली असे शास्त्र सांगते. तुकाराम महाराज त्याच दृष्टीने 'पदवी'शब्द वापरतात. गोंदवलेकर महाराज म्हणतात

**''राम सेवा करावी। व्यक्ति भक्तिसी लावावी।**
**याहूनी अन्य पदवी। नको आम्हा।।''**

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**






पाटणकर बंधू यांचे

**।।श्री परमेश्वर।।**

**एक कलात्मक आविष्कार**

**सुबक मूर्तींचे एकमेव दालन**




६ इंचांपासून ते ६ फुटांपर्यंत
विविध देवदेवतांच्या,
साधुसंतांच्या
सुबक व आकर्षक
प्लॅस्टर ऑफ पॅरिस,
फायबर व मार्बलच्या मूर्ती
फोटोप्रमाणे तयार करून मिळतील.

**५७६ नारायण पेठ, रमणबाग चौक, पुणे ४११ ०३०**
फोन(०२०) २४४५ ०५८७/७५८८२ ३५८३३/९८५०० ७२९८२
Website : www.shreeparameshwar.com

**•कॉर्पोरेट गिफ्टची खास सोय•**

लायन शरदचंद्र पाटणकर (माजी प्रान्तपाल)यांचे सौजन्याने


## मोहनबुवा रामदासी यांचे व्याख्यान

लक्ष्मी व्यंकटेश चॅरिटेबल ॲन्ड एज्युकेशनल ट्रस्ट आणि महर्षि विनोद रिसर्च फौंडेशनयांच्या संयुक्त विद्यमाने **दि. २० आणि २१ एप्रिल २०१३ रोजी, गोगटे शाळा, प्रभात प्रेस जवळ, नारायण पेठ, पुणे** येथे सिक्स्थ डायमेंन्शन व्याख्यानमाला आयोजित करण्यात आलेली आहे. (विनामूल्य) यामध्ये **श्री. मोहनबुवा रामदासी**, श्री. यमाजी मालकर, श्री. प्रदिप धुमाळ, योगरत्न संप्रसाद विनोद यांची व्याख्याने आयोजित करण्यात आलेली आहेत. **व्याख्यानाची वेळ सायं. ५.३० ते ८.३०** अशी आहे. अधिक माहितीसाठी संपर्क– श्री. विश्वास शेंडे – ९०४९२९६५३९

## श्रध्दांजली

■ कल्याण स्वामींचे वंशज डोमगाव मठाचे मठपती श्री. भाऊसाहेब योगिराज जहागिरदार यांचे दि. २५ जानेवारी २०१३ रोजी पुणे येथे निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ८७ वर्षे होते. त्यांचे आत्म्यास चिरशांती लाभो ही समर्थचरणी प्रार्थना.

■ आपल्या रघुवीर समर्थ मासिकामध्ये ज्योतिष विषयांवरील लेख लिहिणारे श्री. घनःश्याम जगन्नाथ भट यांचे दासनवमी दि. ६ मार्च २०१३ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचे आत्म्यास चिरशांती लाभो ही समर्थचरणी प्रार्थना.



# दृष्टांत

श्री. अमृतबुवा रामदासी,
सज्जनगड

**मी पणे वस्तु नाकळे। मी पणे भक्ती मावळे।**
**मी पणे शक्ती गळे। वैराग्याची ॥**-श्रीमत् दासबोध ७-७-४६

---

मनास निरनिराळ्या कल्पना करण्याची सवय. पण मन ज्याप्रमाणे कल्पना करत असते त्याप्रमाणे सर्वकाही असत नाही. त्यामुळे मन स्वगुणाच्या संगतीत संशय पाऊन मीपणाच्या अहंकाररूपी मार्गावर भरकटत जाते. मीपणा एवढा प्रबळ असतो की शस्त्राने त्याला तोडता येत नाही. फोडता येत नाही. मनास लागलेले मीपण सुटता सुटत नाही. मीपणामुळे ब्रह्मज्ञान कशास म्हणावे तेही कळत नाही. मीपणामुळे भक्ती मावळते आणि वैराग्याची इच्छशक्ती गळून पडते. मीपणाची बाधा कोणाला साहवत नाही.

**किं करोमि क्व गच्छामि किं गृण्हामि त्यजामि किम्।**
**आत्मना पूरितं सर्वं महाकल्पांबुना यथा॥**

ज्याप्रमाणे कल्पांत झाला असता महाप्रलय होतो आणि सर्वत्र पाणी भरून जाते त्याप्रमाणे सर्वत्र आत्मा भरून असल्यामुळे मी काय करू, कोठे जाऊ, काय घेऊ आणि काय सोडू ?

या मीपणाच्या संगतीमुळेच संशय असे निर्माण होतात. म्हणून जो मीपण सांडून राहतो तोच खरा सुखासीन असतो. आता हे मीपण कसे त्यागावे ब्रह्म कसे अनुभवावे आणि कोण्याप्रकारे समाधान पावावे हे जाणले पाहिजे. त्यासाठी 'मीपण' जाणून बुजून त्यागले पाहिजे. देहबुद्धी सोडून ब्रह्म अनुभवले पाहिजे. तरच समाधान प्राप्त होईल.

एक गुरू शिष्यांची जोडी मार्गक्रमण करीत असतात.शिष्य हा गुरूंच्या ध्यानात कायम मग्न असतो. तो शिष्य म्हणजे एका सत्शिष्याचा असावा असा असतो. जो की सद्गुरूंच्या आज्ञेचं पालन करण्यात स्वतःचं भाग्य समजतो. मार्गक्रमण करीत असता, त्यांना वाटेत एक नदी लागते. तो शिष्य सद्गुरूंच्या नामस्मरणात इतका तल्लीन झालेला असतो की त्याला समोर वाहत असलेली नदीपण दिसत नाही. अनभिज्ञपणे तो त्या नदीवरून त्या पाण्यावरून चालत जात असतो. त्याच्या पाठोपाठ त्याचे सद्गुरू येतात व ते दृश्य पाहतात. ते पाहून त्यांच्या मनामध्ये अहंभाव जागृत होतो. ज्यावेळेस गुरूंच्या मनात येते की माझ्या नामातच किती सामर्थ्य आहे की माझ्या केवळ नामस्मरणाने या अथांग पाण्यावर नुसता तरतो नाही तर तो त्यावरून चालत पार होतोय. असा विचार मनात येताच क्षणी गुरू पाण्यात बुडतात.

**तात्पर्य-** *जो परमशुद्ध असे ब्रह्मतत्व जाणतो तो बद्ध की मुक्त ही जाणीव ठेवत नाही. जो नामरुपात्मक गुणांच्याही पलीकडे जातो, त्याच्या ठिकाणी मुक्तपणाची जाणीव उरत नाही. तो स्वतःच देहभाव विसरून जातो आणि मी बद्ध का मुक्त याचाही त्याला विसर पडतो तोच मीपणाच्या जाणीवेतून मुक्त झालेला असतो.*

**॥ जय जय रघुवीर समर्थ॥**

# ‘देहाची कीर्ती आणि कीर्तिरूपी देह’
## मरावे परी कीर्तिरूपें उरावें

**श्री. ग. प्र. कुलकर्णी** - मो. ८७९३३६०८१४




युवक मित्रहो!

सप्रेम जय रघुवीर !

सध्याचे युग हे जाहिरातीचे, प्रसिद्धीचे युग आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. वर्तमानपत्र, टी.व्ही. चॅनेल्स, रस्त्यांवर-चौकाचौकात, गल्लीबोळातून लागणारे विविध व्यक्तींचे बॅनर्स, अशा विविध प्रकारच्या माध्यमांचा उपयोग प्रसिद्धीसाठी केला जातो. अशा माध्यमातून ‘येन केन प्रकारेण प्रसिद्ध पुरुषो भवेत्’ अशा हिरीरीने अनेक मंडळी धडपडत असतात. अगदी मागच्या पिढीपर्यंत आपल्या देशात ‘नेकी कर और दरियाँ में डाल’ म्हणजे ‘सत्कर्म करा आणि मी केले हे विसरून जा’ हे तत्त्वज्ञान जगणारी माणसं मोठ्या संख्येने दिसत होती. परंतु आता ‘जाणता राजा’ ‘गरिबांचे कैवारी’ आणि तत्सम मोठमोठी विशेषणे आपल्यामागे लावून, केलेल्या सत्कार्याची जाहिरात करून प्रसिद्धी मिळवणारे सत्पुरुष (?) सर्वत्र अवतरले आहेत. अशाच एका नेत्याच्या मुखातून ‘मरावे परी कीर्तिरूपें उरावे’ हे श्रीसमर्थ रामदास स्वामींचे वचन ऐकले आणि मनात चिंतन सुरू झाले. देहाची किर्ती का कीर्ती नावाचा देह ?

येथे लोकमान्य टिळकांची गोष्ट आठवते. एकदा लोकमान्यांकडे एक होतकरू समाजसेवक तरुण आला आणि त्याने टिळकांना विचारले,‘मला लोकमान्य व्हायचे आहे. यासाठी काय करावे ? त्यावर लोकमान्यांनी दिलेले उत्तर मोठे मार्मिक आहे. ते म्हणाले,“सर्वप्रथम ‘मी’ लोकमान्य व्हावं, ही इच्छा सोडून द्या व निःस्वार्थ भावनेने लोकांची सेवा करा.” कीर्ती मिळवणं हा सत्कार्यामागचा हेतू नसावा, तो त्या कार्याचा परिणाम असावा. प्रसिद्धी मिळवणं आणि कीर्तिमान होणं यात हाच फरक आहे. श्रीसमर्थ म्हणतात

**स्वयें आपण कष्टावें । बहुतांचे सोसीत जावे ।**
**झिजोन कीर्तीस उरवावे । नाना प्रकारें ।।**दा.१२-१०-१८।।

आपल्या वैदिक संस्कृतीने मनुष्याचे मानसिक, बौद्धिक, आत्मिक जीवन प्रगल्भ होण्यासाठी काही आदर्श जीवनमूल्ये सांगितली आहेत. या आदर्शांना व जीवनमूल्यांना प्राणपणानं जपणं असा ‘मरावे परी कीर्तिरूपें उरावे’ या श्री समर्थांच्या वचनाचा अर्थ होतो. प्रसंगी मृत्यु पत्करावा परंतु अपकीर्ती होईल अशा मार्गाने जाऊ नये.

**उत्तमगुणी शृंघारला । ज्ञानवैराग्यें शोभला ।**
**तोचि एक जाणावा भला । भूमंडळी ।।**दा.१२-१०-१७।।

### कीर्तिरूपी देहाने उरावे

प्रत्येक व्यक्तीचा दिसणारा देह, त्याचे कुळ, त्याचे नाव, रूप, रंग, आकार ह्यावरून त्याची ओळख ठरते. परंतु प्रत्येक व्यक्तीचा न दिसणारा परंतु जाणवणारा त्याच्या विचारांचा, गुणांचा, कर्मांचा एक देह असतो. केवळ चांगल्या दिसणाऱ्या व्यक्तीला कोणी चांगली म्हणत नाही. त्यासाठी त्याचे विचार, कर्म, गुण चांगले असावे लागतात. दिसणारा देह नष्ट होतो परंतु सत्कर्म, सद्विचार, सद्गुणरूपी देह नष्ट होत नाही. तो शाश्वत असतो. श्रीसमर्थ म्हणतात-

**येथील येथे अवघेंचि राहाते । ऐसें प्रत्ययास येतें ।**
**कोण कायें घेऊन येतें । सांगाना का ।।दा.१२-८-२८।।**

येथे सूर्यवंशी राजा दिलीप यांचे स्मरण होते. गुरू आज्ञेनुसार गोसेवा व गोरक्षण करीत असताना त्या गायीला खाण्यासाठी सिंहाने पकडले. त्या गोमातेचा जीव वाचावा

म्हणून महाराज दिलीप स्वतःचा देह सिंहाला खाण्यासाठी देण्यास सिद्ध झाले. तेव्हा मायावी सिंहाने महाराज दिलीपांना आपले तारूण्य, वैभव, राज्याची आठवण देऊन तू मृत्यु का पत्करतोस असा प्रश्न विचारला. तेव्हा दिलीप म्हणतात,''सिंहा, तु माझ्या या देहाची चिंता करू नकोस. हा केव्हा तरी जाणारच. तू माझ्या कीर्तिरूपी देहाची चिंता कर. आपल्या स्वार्थासाठी राजा दिलीपाने गुरुसेवेला अंतर दिले व गोहत्या होऊ दिली, असा कलंक माझ्या कीर्तिरूपी देहावर येऊ नये. म्हणून गायीऐवजी तु मला खा.'' असे म्हणून तो वीर मरणास सिद्ध झाला.

**कीर्ती पाहो जातां सुख नाही। सुख पाहातां कीर्ती नाही।**
**विचारेंविण कोठेंचि नाही। समाधान ।।दा.१२-१०-१९।।**

बाह्य सुखांसाठी हपापलेल्या व्यक्तीला कीर्ती मिळणे शक्य नाही. चार रुपड्यांसाठी आपले इमान विकून अपकीर्तीरूप नरकप्राय जीवन जगणारे उच्चशिक्षित लोक पाहिले की व्यथा होते. असो, जीवनमूल्यांशी तडजोड करून क्षणक्षण मरत जगायचे की जीवनमूल्यांशी एकनिष्ठ राहून आत्मसन्मानाने सत्कीर्तीरूपानें अमरत्व मिळवायचे ? यातील आपण काय निवडाल ? श्रीसमर्थांच्या पुढील विचाराचे चिंतन करूया.

**कीर्ती करून नाही मेले। ते उगेच आले आणि गेले।**
**शाहाणे होऊन भुलले। काये सांगावें ।।दा.१२-८-२७**

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

## रामदासी कीर्तन प्रशिक्षण वर्ग , सज्जनगड

श्री रामदास स्वामी संस्थानच्या वतीने ''रामदासी कीर्तन प्रशिक्षण वर्गाचे'' आयोजन करण्यात आले आहे. या वर्गास **राष्ट्रीय किर्तनकार श्री. वासुदेवबुवा बुरसे** मार्गदर्शन करणार आहेत.

**वर्गासंबंधी माहिती**



**कालावधी -** दिनांक १० मे ते १९ मे २०१३
दिनांक ९ मे रोजी सायंकाळी ५ वाजता गडावर पोहचणे अपेक्षित
**वयोमर्यादा -** १५ ते ३० वयोगटातील युवक आणि युवतींसाठी प्रवेश खुला.
**प्रवेशसंख्या -** ४०
**नाव नोंदणी अंतिम तारीख -** दिनांक ३ मे २०१३
दिनांक ५ मे रोजी आपणास प्रवेश निश्चितीबद्दल कळविले जाईल.
**पात्रता (किमान)-** तालांचे व स्वरांचे प्राथमिक ज्ञान आवश्यक
**संपर्क -** स. भ. शहाजीबुवा रामदासी, सज्जनगड मो. ९४२१८७१८६८
अधिकारी स्वामी - श्री. भूषण स्वामी, ९८२२४९०६६०
व्यवस्थापक - स.भ. मोहनबुवा रामदासी, सज्जनगड ९४२११७७८२१
सज्जनगड कार्यालय ०२१६२-२७८२२१

वरीलप्रमाणे सर्व मुद्दे समजून घेऊन लवकरात लवकर संपर्क साधण्याचा प्रयत्न करावा.
सोबत आपले ओळखपत्र असावे.
दहा दिवस निवासाच्या तयारीने आवश्यक साहित्य बरोबर आणावे.
(उदा. वही, पेन, भजनाची पुस्तके, आदि)

**कलियुगी कीर्तन करावे । केवळ कोमल कुशल गावे ।।**

या श्री समर्थ वचनास लक्षून या प्रशिक्षण वर्गाचा सर्वांनी लाभ घ्यावा.




# अभंग आस्वाद

श्री. प्रसादबुवा रामदासी, सज्जनगड, मो. ९४२१५७४२००

**कपिकुळाचे भूषण। चित्त रामाचे तोषण।**
**धन्य साधू हा हनुमंत। ज्ञान वैराग्य सुमंत ।**
**रामरंगी रंगे चित्त। अखंडीत सावचित्त ।**
**दास म्हणे मी लेकरू। विस्तारवी बोधांकुर।।**

भारताच्या प्राचीनकाळाच्या इतिहासात अनेक महान व्यक्ती होऊन गेल्या; पण त्या वंदनीय श्रेष्ठ पुरुषात भक्ती, ज्ञान, वैराग्य, शौर्य, त्याग, पराक्रम, सौजन्य, बुध्दिमत्ता अशा अनेक गुणांचा उत्कटत्वाने वास एकाच ठिकाणी पहायला मिळतो तो म्हणजे पवनपुत्र हनुमान.

मनासारखा वेग अर्थात शीघ्र आकलनशक्ती, वायुसारखा वेग म्हणजे विलक्षण धडाडीचे कर्तृत्व, जितेंद्रियत्व म्हणजे अस्खलित ब्रह्मचर्य, श्रेष्ठ प्रकारची बुध्दिमत्ता वायुसारखा पराक्रम, सर्वत्र संचार असून निःसंगत्व व श्रीरामावर नितांत श्रद्धा अशा अनेक गुणांनी युक्त असणाऱ्या मारुतिरायांचा आदर्श श्रीसमर्थांनी साडेतीनशे वर्षांपूर्वी शक्तीहीन आणि तत्त्वहीन झालेल्या समाजा समोर ठेवला.

श्री समर्थांचे मारुतिराय अत्यंत प्रिय असे दैवत आहे. मारुतिरायांवर समर्थांनी अनेक अभंग, स्तोत्रे, श्लोक रचलेली आहेत. पण या अभंगात मात्र समर्थांनी मारुतिरायांच्या अनेक पैलूंचे दर्शन घडवलेले आहे. त्याचे चिंतन समर्थ कृपेने करूया.

**यत्र यत्र कुले चैव एको भवति वैष्णव ।**
**कुलं तस्य तदा पापैर्मुक्तं तन्मोक्षगामिवै।।**

एखाद्या कुळात एखादा भगवत्‌भक्त निर्माण झाला तर त्याच्या पुण्याईने सर्व कूळ पापमुक्त होऊन मोक्षपदास जाते. हनुमंत हे उत्तम कुळातील आहेत. ते मर्कट नसून वानरवंशीय होते. त्यांचे पिता केसरी आणि माता अंजनी दोघेही ईशभक्त असून दोघे ह्याच वंशातील होत. यांचा ध्वज वानर चिन्हांकित होता, यास्तव त्यांना वानरवंशीय राजे म्हणत.

हनुमंताच्या भीमपराक्रमाने घाबरलेल्या रावणाने आपल्या सैन्यापुढे कबुली देताना म्हटले होते,''मी वानर कुळामध्ये सुग्रीवासह वाली, नील, जांबुवंतादी अनेक महापराक्रमी वानर पाहिले आहेत. पण याच्याप्रमाणे त्यांची गती नाही, तेज नाही, पराक्रम, बुद्धी, बल, उत्साह नाही आणि याच्यासारखे 'मनो वांछित रूप' ही त्यांना घेता येत नाही. म्हणून समर्थांनी वर्णन केले, मारुतीराय हे वानर कुळाचे भूषण आहेत.

रामायणाचा विचार जर आपण केला तर मारुतिरायांशिवाय रामायण पूर्णच होऊ शकत नाही. आपल्या अलौकिक कार्याने प्रभू श्रीराम आनंदी, समाधानी होतील असेच कार्य हनुमंताने केले. ''स्वामिकाजी तु सादर' असे वर्णन तुकोबांनी केले आहे. हनुमंताचे अद्‌भुत, अलौकिक चरित्र म्हणजे रामायणाचा प्राण आहे. हनुमंत हे स्वतः वंदनीय, श्रेष्ठ भक्त असूनही रामसेवा हेच जीवनाचे ध्येय मानले.

'धन्य साधू हा हनुमंत' या चरणामध्ये श्री समर्थ हनुमंताला साधू ही उपाधी लावतात. केवळ साधु नव्हे तर धन्य साधू असे म्हणतात. साधूच्या ठिकाणी असणारे गुण तुलसीदासांनी वर्णन केले आहेत.

**परहित-निरत निरंतर। मन क्रम बचनमें निव हौंगो।**
**बिगत मन समसी तलमन। परगुन नहि दोष कहौंगो।**
**परिहरी देह-जनित चिंता। दुःख-सुख सम-बुद्धि सहौंगो।**

सन्मार्गाने वर्तन करून जगाची काळजी जे वाहतात आणि स्वतः भवसागरात तरलेले असतात व कुठलाही हेतू न ठेवता इतरांनाही भवसागरातून पार करतात, असे

साधु असतात. म्हणून साधु हे विशेषण समर्थ हनुमंताला लावतात. रामायणामध्ये हनुमंताने अनेकांवर उपकार केलेले पहायला मिळतात. १) सीतेचे शोधन करून श्रीरामांवर उपकार २) रामसीता भेट ३) द्रोणागिरी पर्वत आणून महावीर लक्ष्मणाचे प्राण वाचवले. ४) रामप्रभूंच्या आगमनाची भरताला प्रथम बातमी मारुतीनेच सांगितली. ५) सुग्रीवाला संकटाच्या वेळी मारुतीने साथ दिली. असा परोपकारी हनुमंत असल्यामुळे साधुत्वाची उपमा त्यांना शोभून दिसते.

ज्ञान वैराग्य सुमंत- हनुमंत हे ज्ञान वैराग्याचे मुकुटमणी आहे. तुलसीदास वर्णन करतात.

**पवन तनय संकट हरन मंगल मुरती रूप**

**राम लखन सीतासहित हृदयी बसऊ सूरभूप**

रामरूपी ज्ञान, लक्ष्मण रूपी वैराग्य आणि सीतारूपी भक्ती या तिन्ही गोष्टी हनुमंताने आपल्याजवळ ठेवल्या आहेत. म्हणून 'ज्ञान वैराग्ये समर्था' असे वर्णन समर्थांनी केले आहे. कारण ज्ञान वैराग्याशिवाय परमार्थाची प्राप्तीच होऊ शकत नाही.

**रामरंगी रंगे चित्त। अखंडीत सावचित्त।**

चित्त हे आकाश तत्त्वापासून बनले. चित्ताच्या अनेक अवस्था आहेत, पण मारुतिरायाच्या चित्ताची अवस्था निरुद्ध म्हणजे निर्विकल्प समाधी झालेली आहे. हनुमंताला रामनामाशिवाय काहीही प्रिय नाही. त्यामुळे जानकीमातेने दिलेला नवरत्नांचा हारही दातांनी फोडून टाकला व स्वतःच्या हृदयातील रामाचे दर्शन सर्वांना घडवले. रामनामात रंगलेले मन रामकार्यात मात्र अखंड सावधान होते. अत्यंत हुशारीने देव, दानव, मानव, यक्ष, गंधर्व यांचे आपल्यापुढे काहीही चालू न देणाऱ्या रावणाच्या लंकेत जाऊन त्याच्या नगरीची होळी करणारे हनुमंत हे अलौकिक सावध आणि साक्षेपी होते.

दास म्हणे मी लेकरु। विस्तारवी बोधांकुर।।

या चरणामध्ये अत्यंत जवळचं नातं समर्थांनी मारुतिरायांशी जोडलं आहे. ''स्वामी कृपेची साउली। रामदासाची माउली'' अनन्यतेची उदाहरणं देताना चातक, चकोर, मासा, पतिव्रता अशी अनेक उदाहरणे देता येतात, पण समर्थांनी या ठिकाणी तान्हे बाळ, अर्भक ज्याप्रमाणे आईशी अनन्य असते त्याप्रमाणे मी तुझ्याशी एकरूप आहे. 'लेकुराचे हित। जाणे माऊलीचे चित्त' अशी समर्थांची धारणा आहे. म्हणून माझ्या कल्याणाचा, आत्मोन्नतीचा मार्ग दाखवण्याची विनंती समर्थ करतात. कारण 'आमुचे कुळी हनुमंत। हनुमंत आमुचे मुख्य दैवत। तयावीण आमुचा परमार्थ। सिद्धीते न पवे सर्वथा।।


ज्याप्रमाणे नंदीदर्शनाशिवाय शिवदर्शन नाही, उंदीरदर्शनाशिवाय गणेशदर्शन नाही, तद्वतच वायुनंदनाच्या दर्शनाशिवाय रामभक्तांना रामदर्शन घडणार नाही.

शक्ती, युक्ती आणि भक्ती हे त्रिविध सामर्थ्य ज्या मारुतीठिकाणी एकवटले आहे, त्या पराक्रमी पुरुषार्थी आणि चारित्र्यसंपन्न असणाऱ्या हनुमंताचा एक आदर्शच समर्थ रामदासांनी राष्ट्रापुढे ठेवला. मारुती उपासना म्हणजे शरीर संवर्धन, ज्ञान संवर्धन आणि निष्काम कर्मयोग हीच मारुती उपासना होय. अशा मारुतीरायांच्या स्मरणाने जन्म मरणातीत अशी अवस्था प्राप्त होवो हीच त्यांच्या चरणी नतमस्तक होऊन प्रार्थना करूया.

**जिथे काम निष्काम होऊनि राहे।**
**मनाच्या गतीची गती कुंठिताहे।**
**जगी बुद्धिमंतासी जो बुद्धि दाता।**
**स्मरा राघवाच्या महारुद्ररूपा।।**

**।। जय जय रघुवीर समर्थ।।**

## सुजन वाक्य



एककार्यनिविष्टं हि मनो धीरस्य भूपते।
न चाल्यते मेरुरिव वरशापबलैरपि।।

▶ एका कार्यामध्ये प्रविष्ट झालेल्या धीर पुरुषाच्या मनाला वर किंवा शाप मेरूपर्वताप्रमाणे बदलू शकत नाहीत.

दासबोध-
सानुल्यांसाठी

# जयास अहंकार नसे। नैराशता विलसे। जयापासी कृपा वसे। तो सत्त्वगुण ।।



सौ. अनुजा सोमण सातारा, मो. ९४२३३२४३३३

**आपल्या कुटुंबातील लहान मुलांना हे सदर वाचायवास द्यावे. या सदरातील गोष्टीचे तात्पर्य त्यांना जसे समजले तसे स्वहस्ताक्षरात लिहून पाठविणाऱ्या बालवाचकांची नावे मासिकात प्रसिध्द केली जातील.**

**जयास अहंकार नसे। नैराशता विलसे।**
**जयापासी कृपा वसे। तो सत्त्वगुण ।।६३।।**

(दशक दुसरा समास सातवा)

अर्थ- ज्याला अहंकार नाही, ज्याच्यापाशी निर्लाभी वृत्ती असते. ज्याच्यापाशी अज्ञानी जीवाबद्दल दया असते तो सत्त्वगुण होय.

अहंकार हा माणसाचा शत्रू, अहंकाराने सर्वत्र दुःख प्राप्त होते. तेव्हा अहंकार ह्या दुर्गुणापासून आपला बचाव करावयास हवा, नाहीतर त्या पैठणच्या ब्राह्मण मंडळींसारखी आपलीही अवस्था व्हायची.

एकदा श्री समर्थ रामदास स्वामी पैठण येथे आले. तेथे नित्य गंगास्नान करून माधुकरी मागायची व भोजन करायचे. मग नाथांच्या वृंदावनाशी कीर्तन करावयाचे हाच त्यांचा नित्यक्रम. एकदा पायात पादुका, काखेत तुंबा, कुबडी, गळ्यात मेखला, मस्तकी जटाभार व टोप अन् हातात गलोल, अशा वेषात ते गंगातिरी आले. तीरावरील ब्राह्मणांनी त्यांना प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. अन् हातातील गलोलाबद्दल चौकशी केली. एका अहंकारी ब्राह्मणाने श्रीसमर्थांना आकाशात उडणाऱ्या घारीवर नेम धरण्यास सांगितले.

श्रीसमर्थांनी ''आज्ञा'' असे शब्द उच्चारून, घारीवर अचूक नेम धरला, झाले. बिचाऱ्या घारीने प्राण गमावला. हा प्रकार पाहताच अहंकारी, गर्विष्ठ ब्राह्मणांनी आरडाओरडा सुरू केला अन् 'प्रायश्चित्त घेण्यास सांगितले.' श्री समर्थ रामदास स्वामींनी आज्ञेप्रमाणे प्रायश्चित्त घेतले. सर्व विधी उरकल्यावर ''आता मी पावन झालो का ?'' हा प्रश्न त्या ब्राह्मणांना विचारला. ब्राह्मणांनी 'हो' असे उत्तर दिले. लगेच श्री स्वामी समर्थ रामदास बोलले ''मग घार का जिवंत झाली नाही ?''

जर मृत्यू पावलेला प्राणी, आपल्या प्रायश्चित्ताने जिवंत झाला नाही, तर माझे पातक नष्ट कसे झाले ? हा प्रश्न ऐकून ब्राह्मण गडबडले. 'तद्नंतर श्री स्वामी समर्थ रामदासांनी आपल्या कृपेने तिला जिवंत केले' अन् घारीने मार्गक्रमण केले.

पाहिलंत मुलांनो, अहंकार बुद्धीला जाळून टाकतो. सुखाला दूर लोटतो.

**अहंता गुणे सर्वही दुःख होते।**
**मुखे बोलिले ज्ञानही व्यर्थ जाते**
**सुखी राहता सर्वही सुख आहे।**
**अहंता तुझी तूचि शोधूनि पाहे।। (म.श्लोक १६१)**

राजसूय यज्ञ केल्यावर, युधिष्ठिरास असाच वृथा अहंकार निर्माण झाला. पुष्कळ लोक आपल्यामुळे संतुष्ट झाले, आपण खूप दानशूर आहोत, वगैरे वगैरे.

एवढ्यात एक अर्ध शरीर सोन्याचे असलेले मुंगूस तेथे आले. अन् युधिष्ठिर करत असलेल्या, यज्ञातील उरलेल्या उच्छिष्ट (उष्टं) अन्नात लोळू लागले.

युधिष्ठिराने त्याला 'असे करण्याचे' कारण विचारले. तेव्हा मुंगूस म्हणाले,

'एका नगरात १२ वर्षे पाऊस पडला नव्हता. धान्याचा अत्यंतिक तुटवडा निर्माणझाला. एका ब्राह्मणाच्या घरी सात दिवस अन्न नव्हते.

*... उर्वरित पान ४१ वर*

# जुना दासबोध-सगुणध्यान (लेखांक नववा)

**सौ. मंजिरी श. धूपकर, पुणे.** मो. ९९२३०४५५५४

**येथे स्वहित तेंचि रत्न। गेलें न करितां प्रयत्न।**
**म्हणूनि चतुरीं यत्न। केला पाहिजे।।**

श्रीसमर्थ टाकळीला असताना पुरश्चरण, नामस्मरणाचे त्यांचे सातत्य, त्यांचे बुद्धिमत्तेचे सहज व्यक्त होणे, व्यग्र दैनंदिनी यांमुळे लोकांमध्ये त्यांच्याबद्दल निष्ठा निर्माण झाल्या होत्या. लोक त्यांना आपल्या अनेक शंका विचारीत असत. लोकांच्या ह्या शंकांना श्रीसमर्थांनी दिलेली उत्तरे आणि त्यातून केलेला उपदेश हा फक्त तेवढ्यापुरताच सीमित नव्हता. सर्वांना आणि सर्वकाळी हा मोलाचा उपदेश आयुष्याला उपकारक ठरला आहे. सगुणध्यान समासात श्रीसमर्थांनी ईश्वराच्या सगुणरूपाचे वर्णन उपदेश रूपात केले आहे. साक्षात्कारी श्रीसमर्थांनी केलेले हे वर्णन आहे. म्हणून ईश्वराचे रूप जे श्रीसमर्थांनी साक्षात पाहिले ते आपल्याला दाखविले आहे.

**देव घननील सांवळा। मुकुट कुंडलें मेखळा।**
**रूळे वैजयंती माळा। आणि पीतांबरु।। २।।**
**ऐसा शेषशयनावरी। क्षीरसागरीं निद्रा करी।**
**शंख चक्र गदाधारी। लक्ष्मीसहित।। ३।।**

श्रीसमर्थ सांगतात हा एक देव आहे, विष्णू. त्याचे पुढे दहा अवतार, मत्स्य, कूर्म, वराह, वामन, नरसिंह, परशुराम, श्रीराम, श्रीकृष्ण, बुद्ध आणि कल्की हे झाले. त्याही पुढे ज्याच्यासारखा त्याचा देव असे अनेक देव झाले. श्रीसमर्थ दुसरा देव, महादेव, जो कैलासपर्वतावर राहतो, तो सांगतात. श्रीविष्णू व महादेव हे दोन्ही मिळून देव एकच. समृद्धी आणि वैराग्य या विभिन्न प्रतिमांचे हरिहर म्हणजे विष्णू आणि महादेव हा मुख्य देव आहे. आपण जे कोट्यांनी देव मानतो; ते सर्व ह्या देवाचे अंश आहेत. म्हणून आपण मुख्य देवालाच भजावे, त्याची भक्ती करावी. आपल्याला मिळालेला नरदेह म्हणजे आपली समृद्धी आहे. पाठीला मिळालेला ताठ कणा, हाताच्या चार बोटांसमोर येणारा आपला अंगठा, आणि सर्वश्रेष्ठ बुध्दिमत्ता ह्या आपल्याला मिळालेल्या इतर प्राण्यांपेक्षा महत्त्वपूर्ण गोष्टी आहेत. नाना सुकृतांचे फळ। तो हा नरदेह केवळ। (२.४.१) म्हणून त्यांचे ममत्व न ठेवता, त्यांच्या साहाय्याने ईश्वरभक्ती करून मोक्षाप्रत जाण्याची इच्छा मानवजन्मातच करता येते. मोक्षासाठी विरागी वृत्ती ठेवणे आणि वाढविणे आवश्यक आहे.असा हा विष्णु आणि महादेव समृद्धी आणि वैराग्य, साधन आणि साध्य अशा अर्थाने एक देव आहे. हे सर्व उलगडून स्वतःशी समजून उमजून केले तरज देव भेटतो. असा हा हरि आणि हर भिन्न नसून एक आहेत. त्याची भक्ती करावी.

**एका भावार्थासाठी। देव लागे भक्तांपाठी।**
**भाव नसता जगजेठी। प्राप्त नाहीं।।८।।**

श्रीसमर्थांचा शिष्य ज्ञानासाठी सतत उतावीळ झालेला असतो. म्हणून गुरूंना शंका विचारून तो उपदेश घेतो. येथे हा शिष्य देवाच्या भक्तीची योजना श्रीसमर्थांना विचारतो. तेव्हा ते सांगतात, देवाचे नामस्मरण करावे, तेहि जाणिवेत, भक्तिभावाने करावे. हृदयापासून नाम घेतल्याने मनात ईश्वराव्यतिरिक्त इतर भाव येत नाहीत. मनात नित्य, ईश्वराला स्थान असावे. सत्त्वगुण हा देवाचा विशेष आहे. तोच मनीं बाळगावा. म्हणजेच देव मनात पुजावा आणि देवाचे कीर्तन करावे किंवा ऐकावे. देवाचे सगुणरूप मनात जपावे. देवाचे चरित्र मनात स्मरावे, त्याचे चिंतन करावे. हे करण्यासाठी मनाचा देव्हारा केवळ विकल्परहितच नव्हे तर शुद्ध, पवित्र ठेवावा. यासाठी मनाचा निश्चय ठाम असावा की जो नेम करवून घेतो. पण मुळातच चंचल असलेले मन विकल्प करतेच आणि निश्चयाच्या

आड येत राहते. यासाठी मनाचा निग्रह ही खूप मोठी गोष्ट आहे. तो असेल तर देव आपल्या जवळच असतो. देवाच्या सान्निध्याबद्दल मनात संशयाला जागाच उरत नाही. ईश्वर सान्निध्यात मन निश्चिंत होण्यासाठी वैराग्याची वाट अटळ आहे. वैराग्यवृत्ती दृढ झाल्यावर देहादि आसक्ती शिल्लक राहत नाही. निग्रह असा करावा की देह पडला तरी चालेल पण देव मिळाला पाहिजे. तरच वैराग्य अंगी वाढते. अशा भक्ताची देव आस करतो आणि भक्ताला निश्चिंतही करतो. असा देवभक्तीचा उपदेश श्रीसमर्थ करतात.

**देहपांग नि:शेष भंगे। तेव्हा प्राप्तीसी वेळ न लागे।**
**देव भक्तांपाठी लागे। नाभी नाभी म्हणोनी ।।१८ ।।**

श्रीसमर्थ आई आणि बाळ ह्यांच्या नात्यातील उदाहरणांनी भगवंत आणि भक्त ह्यांचे प्रेम सांगतात. बाळाला स्वतःचे हित-अहित कळत नाही म्हणून आई त्याला सांभाळतेच, त्याचे रक्षण करते. बाळ स्वावलंबी झाल्यावर आई निश्चिंत होते. भगवंताच्या भक्तीत भक्त आपल्या देहाची तमा बाळगीत नाही तेव्हा तो राम आपल्या भक्ताचे रक्षण करतो. भक्ताला सगुणरूपात दर्शन देऊन आपल्या अस्तित्वाची जाण देतो. भक्ताला संसारदुःखातून तो निवृत्त करतो. तो भक्त रामाचा होतो.

मनुष्याचा स्व-भाव आसक्तीत मग्न असतो. आशा हे आयुष्याचे साधन आहे; ती मरेपर्यंत सुटत नाही. म्हणून जन्ममृत्युचक्र चालूच राहते. ज्याला जी आशा त्यातच तो गुरफटत असतो. बहुतेकजण आशा, ध्यास, सुख हे स्वतःच्या प्रपंचात शोधत असतात आणि मानत असतात. किंबहुना ते सर्वस्वाने त्यामागे धावत असतात. त्यामुळे त्यांना मोक्षाची जाण येत नाही. प्रपंचाची ओढ मात्र प्रत्येकाला उपजत असते. कलियुगाचा महिमा असा आहे की, ज्ञानी, जाणते जनही प्रपंचात आसक्त असतात. प्रपंचात केव्हा, काय विपरीत घडेल ह्याचा नेम नाही. तरीही आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत मन प्रपंचात गुंतलेले असल्यामुळे पुन्हा जन्म मिळतो. प्रपंचाच्या मोहामुळे जन्मृत्यूच्या चक्रात वेदना सहन करीत तो अडकत जातो. ह्याला तो स्वतः जबाबदार असतो. प्रपंचात दुःख भोगतो तरी त्यालाच तो आनंद मानतो किंवा आनंदाची आशा धरीत चिवटपणे जगत राहतो. त्याचा देहाहंकार मोठा असतो म्हणून तो देवाला अंतरतो.

ज्या आपल्या देहावर माणूस एवढे प्रेम करतो तो देह काय आहे ह्याचे वर्णन श्रीसमर्थ अगदी रोकडेपणे करतात.

**देह विटाळाचे मूळ। देह अशुद्धाचा गाळ।**
**देह अनर्गळ। दुर्गंधीचा वोतिला।। ४४ ।।**
**देह कृमींचे कोठार। देह अस्थींचा पंजर।**
**जंव जिंकिला आहे जर्जर। खंगतां भंगे।। ४५ ।।**

देह कशापासून तयार होतो ह्याचे वर्णन शिसारी आणणारे आहे; तरीही देहाला गोंजारणेही सुटत नाही आणि देहाहंकारही सुटत नाही. देहात हजारो कृमी असतात. तसेच लहानमोठी मिळून दोनशे सहा हाडे आहेत. देह हा हाडामांसाचा पिंजरा आहे. देहाला त्रास होतो तेव्हा मात्र तो दुबळा होऊन चैतन्यहीन होतो. देहामध्ये वात, पित्त, कफ हे त्रिदोष आहेत. ह्यांचा असमतोल झाला की देह जर्जर होतो. शिवाय देहात टाकाऊ अशा मल, मूत्र व विष्ठा हेही आहेत. ह्यांच्यामुळेही देहाला दुःखे भोगावी लागतात. देहाच्या नवनळीतून देहातील घाण वाहत असते आणि ती देहाबाहेरही येते.

**वांति पित्त जन देखोनि पळती।**
**दुर्गंधीं गळती नवनाळीं।।** ओवीशतक १.८१ ।।
**नवनाळीं वाहे दुर्गंधी न साहे।**
**वांति होऊं पाहे देखतांची।।** ओवीशतक १.८२ ।।

देहाला असे अनेक विकार आहेत की ज्यामुळे देह क्षणभंगुर होतो. देहाचे चैतन्य केव्हा हरपेल ह्याचा नेम नाही. अशा अशाश्वत हाडामांसाच्या देहाचा अभिमान मूर्खपणाने धरला जातो. इतकेच नव्हे तर वस्त्रालंकारांनी देह सजविण्याची धडपड चालू असते. त्यात आपला मोठेपणा मिरविला जातो. शरीराला अनेक प्रकारचे सुगंध लावले जातात. अशा ह्या शरीरातली दुर्गंधी आपले रूप केव्हा आणि कसे उग्र करील, अनिर्बन्ध होईल ह्याचा नेम नसतो आणि तरीही देहासाठी आणि देहाचे कोडकौतुक

माणूस करीत असतो. माझे माझे ही भावना दृढ असते आईवडिलांचा मृत्यू पाहूनही पत्नी, मुले माझी माझी म्हणत माणसाचे जगणे सुरू असते. तीही गेली तरी जीवनाची अशाश्वतता त्याला उमगत नाही. स्वतःच्या देहावरचे प्रेम कमी होत नाही. वय वाढत असते. शरीराला वार्धक्य येते; तेव्हा क्वचित, आयुष्याचा अर्थ जाणवतो. मनी देहाहंता बाळगल्याचा पश्चात्ताप होतो. ह्या सर्वांचा परिणाम मन उद्विग्न होण्याव्यतिरिक्त काही होत नाही.

**तारुण्य वैभव निघोनि गेलें। मग मानस पस्तावलें।**
**हातींचे रत्न गळोनि पडलें। मग चरफडूं लागे ।।५४।।**

श्रीसमर्थ स्वहित करायला सांगतात. स्वहित करणे म्हणजे प्रथम स्वतःला ओळखणे. देहरूपी समृद्धीचा उपयोग मोक्षाप्रत जाण्यासाठी करावा. मनुष्यजन्मातच बुद्धीचा उपयोग करून मोक्षाचा प्रयत्न करता येतो. ह्यासाठी वैराग्य अंगी, मनी बाणवावे लागते. तेव्हा हरिहराचे आकलन होते. येथेच स्वहिताची सुरुवात होते.

एवढा सगळा उपदेश ऐकल्यावर शिष्य गुरूंना विचारतो

**तों शिष्य म्हणे स्वामी। सांगा कोण प्रयत्न करूं मी।**
**जेणें प्रयत्नें आत्मयारामीं। पावन होईजे ।।५६।।**

देह, प्रपंच हे सगळे नश्वर आहे. हे सर्व गुरुंच्या उपदेशातून शिष्याला कळले. पण म्हणून आपण नेमके काय करायचे हे त्याला समजत नाही म्हणून तो अस्वस्थ झाला आहे. ऐहिक गोष्टींचा त्याग करावा आणि नरदेहाने काही सार्थक करावे असे त्याला वाटते. म्हणून हा मार्ग तो देवाधिदेव गुरुंना विचारतो. देवाची ओळखसुद्धा आपल्याला गुरू करून देतात. देवाचे सगुणनिर्गुण दर्शन गुरुच करवितात. म्हणून शिष्याला ते देवाहून श्रेष्ठ वाटतात. तसेच तो संबोधन करतो, तरी मज देवाधिदेवें। मार्गी लाविजे।। ५८।। शिष्याच्या ह्या विनंतीला श्रीसमर्थ पुढील समासात मार्गदर्शन करतात. तो उपदेश शिष्याने शांततेने, सावकाशपणे, सावधपणे घ्यावा, असे श्रीसमर्थ सांगतात.

**।।जय जय रघुवीर समर्थ।।**

*...पान ३८ वरून*

उंदराच्या बिळातून त्याला सातूचे थोडेसे पीठ मिळाले. त्यापासून त्याने अन्न बनवले खरे. परंतु त्याचवेळी त्याच्या दारावर याचक उभा राहिला. त्या याचकास त्या ब्राह्मणाने अन्न देऊन टाकले. तेव्हा त्यातील काही अन्नकण जमिनीवर सांडले. त्या थोड्याशा विखुरलेल्या अन्नकणांत लोळल्याने माझे अर्धे शरीर सोन्याचे झाले. आता उर्वरित शरीर सोन्याचे होण्यासाठी, मी इथे लोळत आहे पण सारे व्यर्थच.

मुंगुसाची वचनं ऐकताच युधिष्ठिराची नजर स्मित हास्य करणाऱ्या श्रीकृष्णाकडे गेली. अन् त्याची चूक त्याला उमगली.

वरील दोनही गोष्टींतून नेमका कोणता अर्थबोध झाला ? ते जरूर कळवा.

आपल्या उत्तराची वाट पाहणारी आपली ताई.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**



# नमस्कार माझा सद्‌गुरू रामदासा (६)

सौ. संध्या अशोक कोल्हटकर, कोथरुड, पुणे. मो. ९८५००४३२७३

**खरी भक्ती त्या हो जगीं मारुतीची।**
**असे रामदासा परी मारुतीची।**
**नसे भेद दोघां जळीगार जैसा।**
**नमस्कार माझा सद्‌गुरू रामदासा ।। ६ ।।**

श्रीरामदास स्वामींच्या मनात प्रभू रामचंद्रांविषयी सेवाभाव होता. ते त्यांचे सद्‌गुरू होते. पण श्रीरामांचा लाडका भक्त हनुमंत हे समर्थांचे परमप्रिय दैवत होते. समर्थांना ११ वा रुद्र म्हणत. समर्थ हनुमंताचेच अवतार होते. ''भविष्यपुराण'' या ग्रंथात पुढे कोणकोण अवतारी पुरुष कुठे कुठे होणार याचे कथन आहे. श्री रामदास अवतारी पुरुष असून मारुतीच्या अंशे जन्मास येतील असे भविष्य कथन आहे. ही भविष्योत्तर परंपरा बखरकारांनी खालील श्लोकांत दिली आहे. (संदर्भ-समर्थांचे सामर्थ्य, श्रीरामदास स्वामींचा लीलानुग्रह-लेखक कृ.ना.आठल्ये)

कृतेतु मारुताख्यश्च, त्रेतायां पवनात्मजः।
द्वापारे भीम संज्ञश्च, रामदासः कलौयुगे।।

कृतयुगामध्ये ''मारु ती'' त्रेतायुगात ''पवनात्मज'' नामे करून अवतार होईल. द्वापारयुगात त्या अवतारी पुरुषाला 'भीम'असे नाव प्राप्त होईल तर कलियुगामध्ये तो पुरुष 'रामदास' या नावाने अवतीर्ण होईल. त्याच्या बालदशेपासून ते समाधीपर्यंत त्याच्या लीलेत काही ना काहीतरी मारुतीशी साम्य दिसेल असेही श्री.कृ.ना.आठल्ये म्हणतात.

सहाजिकच मारुतिरायाचे बरेचसे गुणसाधर्म्य समर्थ रामदासांच्यात दिसते. एखाद्या उपास्य देवतेची उपासना करणे म्हणजे त्यांच्या गुणांचे मनन चिंतन करून ते आपल्यात रूजवणे होय. हनुमंताजवळ शक्ती, बुद्धी, भक्ती, सिद्धी सर्वच सामर्थ्य होते म्हणूनच समर्थ हनुमानाला 'शक्तीबुद्धीचा निश्चयो' म्हणतात.

समर्थ रामदास स्वामी त्यांच्या बाल्यावस्थेतील काळात उड्या मारणे, झाडावर चढणे, पोहणे, झाडावरून घरांवर उडी मारणे, बारीक डहाळीला लोंबकाळणे या सर्व गोष्टींत तरबेज होते. वानराच्या व समर्थांच्या कृतीत फरक नसे. शक्तीचे सामर्थ्य असणाऱ्या मारुतिरायाची उपासना म्हणजे बलोपासना. त्याचे महत्त्व समर्थांनी स्वतः आचरणांत आणून इतरांनाही पटवून दिले. प्रत्येक गावात मारुती मंदिरांची स्थापना करून ''गांव तेथे मारुती'' ही संकल्पना अंमलात आणली. त्यातूनच व्यायामशाळा चालत होत्या. बलोपासना केली जात होती.

असाधारण पांडित्य, वक्तृत्व असणारा बहुधा दुबळा असतो तर ज्याच्याजवळ शौर्य, बळ असते त्याच्याजवळ तेजस्वी बुद्धी असतेच असे नाही. थोडक्यात बल व बुद्धी यांचा एकत्रित संगम असणे अवघड जाते. मारुतीरायाच्या ठिकाणी मात्र याचा उत्तम संगम होता. तसेच अनेक ग्रंथांचे वाचन करून, त्याचे मनन चिंतन करणारे अनेक गीता (गुरुगीता रामगीता वगैरे) वाचून त्यांचे रहस्य समजावून घेणारे, पंचवटी येथे अनेक संतमहंत योगी यांची प्रवचने, कीर्तने ऐकणाऱ्या समर्थांचा बहुश्रुतपणा विलक्षण होता. त्यांची विद्वत्ताही अगाध होती. तसेच त्यांचा त्यांच्या बलसामर्थ्यावरही विश्वास होता. मुसलमान राजवटीत मुगलसत्तेविरुद्ध कुणाची 'ब्र' काढण्याची हिम्मत नव्हती अशावेळी ''बुडाला औरंग्या पापी, मेंच्छ संहार जाहला'' असे मोठ्यांनी ओरडून, निधड्या छातीने सांगणाऱ्या समर्थांमध्येही ''शक्तीबुद्धीचा निश्चयो'' आपल्याला पाहायला मिळतो.

राम हा ॐकार आहे. अकार हा लक्ष्मण, उकार हा भरत, मकार हा शत्रुघ्न, सीतामाई अर्धमात्रा तर हनुमंत

नादबिंदू आहेत. त्यातील उच्च स्थान हनुमंताचे आहे. सद्‌गुरू आपल्या शिष्याला, भगवंत आपल्या भक्ताला नेहमी उच्चस्थान देतात. तर शिष्य आपल्या सद्‌गुरूला भक्त आपल्या भगवंताला कीर्तिच्या उच्च स्थानावर विराजमान करतात. मोठेपणा देतात. येथे 'असे रामदासा परी मारुतीची ' म्हणुन सद्गुरू समर्थांची थोरवी उद्धवसुत गातात. येथे मारुतीपरी रामदासाची न म्हणता रामदासापरी मारुतीची असे म्हणतात.

रामरक्षेतही ''अनुष्टुप छन्दः सीता शक्तिः, श्रीमद्‌हनुमान् कीलकम्'' असे म्हटले आहे. कीलकम् म्हणजे बैलगाडीच्या चाकाचा मधला खिळा. ज्या खिळ्यामुळे चाक गोलाकार फिरूनसुद्धा ते खाली निखळून पडत नाही. चाक व्यवस्थित गोल फिरू शकते म्हणून त्या खिळ्याला खूप महत्त्व आहे. रामरक्षेतही असे महत्त्वाचे स्थान हनुमंताला आहे. काहीजण कीलकम् चा अर्थ किल्ली असाही करतात. श्रीमान् हनुमान ही या स्तोत्रांत प्रवेश करण्याची किल्ली आहे.

समर्थांचे कार्य पाहता एक गोष्ट लक्षात येते की समर्थांचेही शिवाजीच्या धर्मसंस्थापनेच्या कार्यात महत्त्वाचे स्थान होते. समर्थांनी ११ मारुतींची स्थापना केली. शिंगणवाडीला समर्थ व शिवाजीची भेट झाली. चाफळच्या वीर मारुतीजवळ एका ठिकाणी समर्थ व शिवाजीराजे यांच्या गुप्त भेटीची जागा आजही पाहायला मिळते. पारगांवचा मारुती शिवाजीमहाराज पन्हाळगडावरून विशाळगडावर निसटले त्या रस्त्यावर आहे. मिठाईच्या पेटाऱ्यातून शिवाजीमहाराज संभाजीसह निसटले तेव्हा समर्थांच्या मठाधीपतींनी त्यांना सहकार्य केले. त्या रस्त्यावर समर्थांचे मठ होते. त्याचा शिवाजीराजांना उपयोग झाला. समर्थांनी ''राजकारण बहुत करावे। परंतु कळोचि नेदावे।'' अशा गुप्त तऱ्हेनेसुद्धा शिवरायांना मदत केली. अगदी ''अफझलखान निघाल्याचा'' संदेश सुद्धा पत्राद्वारे गुप्तपणे मठाधिपती सदाशिवशास्त्री मार्फत शिवरायापर्यंत पोहोचवला. ''विजापूरचा सरदार निघाला आहे'' अशी गुप्त सूचना पाठविताना, प्रत्येक चरणाचे आद्याक्षर वाचले असता संदेश जाईल अशी खबरदारी घेतली होती. वरवर पाहता हे पत्र उपदेशाचे वाटते सर्वात शेवटी ''इष्ट योजना करावी'' असेही म्हटले आहे.

मारुतीराय कुशल योद्धा उत्तम राजदूत होते. मुखातून एकही अपशब्द किंवा अशुद्ध शब्द ज्यांच्या तोंडी कधीही येत नाही असे, शुद्ध व स्पष्ट वाणी असणारे ते एक व्याकरण पंडित होते. गायन कलेतही प्रवीण होते. समर्थांची करुणाष्टके भावनाप्रधान व करुणरसानी भरलेली आहेत. त्यांचे अभंग भक्तिपूर्ण आहेत. त्यांचे बागप्रकरण इमारत प्रकरण वगैरे स्फुट काव्य पाहता त्यांची निरीक्षणशक्ती व अभ्यास दांडगा होता यात शंका नाही.

आपल्या आराध्य दैवत श्रीरामावर राक्षसांचा आघात होऊ नये, शत्रूचा त्याला त्रास होऊ नये म्हणून माजगांव येथील वीरमारुती सज्ज आहे. असा त्या मारुतीचा आविर्भाव आहे. वीरमारुतीचे स्तोत्र लिहिताना समर्थांनी असा उल्लेख केला आहे.

**अद्‌भूत वेशे आवेशे। कोपला कर्णकर्कश।।**
**धर्मस्थापनेसाठी। दास तो उठीला बळे।।**

शारीरिक सामर्थ्याची उपासना करणारा हनुमंत, इंद्रियावर ताबा मिळवणारा वायुपुत्र हनुमान, एकीकडे सेवाभाव तर दुसरीकडे भयचकित करून टाकणारा पराक्रम असे अद्‌भुत मिश्रण होते.

त्याच मारुतीचा अंश असणारे समर्थसुद्धा बलोपासना करणारे, शारीरिक सामर्थ्यावर निष्ठा ठेवणारे, श्रीरामाप्रती सेवाभाव असणारे होते. शिवरायाला धर्मसंस्थापनेत मदत करत होते. निद्रिस्त समाजाला जागे करण्यासाठी दासबोध, आत्माराम, रामायण वगैरे लेखन, प्रवचने,कीर्तने समर्थांनी केली. मठस्थापना करून मठाधिपतीमार्फत समाजाला जागृत केले. संघटन शक्ती वाढवली. मारुती मंदिरे बांधून समाजाचे शारीरिक बळ वाढवले. समाज विघातक वृत्तींचा नायनाट करण्यासाठी उत्तम विचारांची बैठक तयार करण्यासाठी मनाचे श्लोक लिहून त्याचा प्रसार करून मानसिक बळ निर्माण केले.

''श्रीरामाची सेवा करण्यासाठी तू वानराचा जन्म का मागतोस ?'' असा प्रश्न विचारल्यावर मारुतीने सांगितले

होते ''अन्न, वस्त्र, निवारा या तीन गोष्टींमध्ये मनुष्याच्या वेळेचा खूप अपव्यय होतो. वानरजन्मात यात वेळ वाया जात नाही कारण 'घर' करावे लागत नाही. झाडाची फळे खाऊन जगता येते, पोट भरता येते. त्यामुळे अन्न शिजवण्यात वेळ जात नाही व वस्त्राची गरज नाही म्हणजे हा सर्व वेळ मला श्रीरामाची सेवा करण्यात घालवता येईल. समर्थांचेही तसेच आहे. मिळेल ती भिक्षा गोदावरीच्या पाण्यात बुडवून निरस करून खाल्ली. वस्त्र फक्त कौपिन. तर निवास गुहेत, डोंगरात किंवा रानावनात ! समर्थांनी नरदेहामध्ये अन्न, वस्त्र, निवारा यासाठी आपला वेळ खर्ची घातला नाही. ब्रह्मचर्याचे पालन केले. संसारात गुंतले नाहीत. जास्तीत जास्त वेळ रामभक्तीसाठी व रामकार्यासाठी दिला.

अशा तऱ्हेने अनेक वेळा अनेक ठिकाणी मग ती दास्यभक्ती असो किंवा रामकार्य आपल्याला मारुतिरायांत व समर्थांच्यात साम्य दिसते. एकाच यज्ञ प्रसादाचे भक्षण कौसल्या व अंजनीने केले होते. दशरथाने पुत्र कामेष्टी यज्ञ केला होता. यज्ञप्रसादाचे तीन भाग करून तीन राण्यांना देण्यात आले. कैकयीचा भाग घारीने पळवून नेला व तो अंजनीवानरीने ग्रहण केला हा कथा भाग आहे. प्रत्यक्ष यज्ञपुरुष तिच्या पोटी मारुती बनून जन्मास आले. कैकयीला, सुमित्रा व कौसल्याराणीने आपल्यातील अर्धा अर्धा भाग दिला. अंजनीने यज्ञ प्रसादातील १/३ भाग ग्रहण केला. तर दशरथाच्या तीन राण्यांनी मिळून २/३ भाग ग्रहण केला. राम,लक्ष्मण,भरत,शत्रुघ्न हे चौघेही पराक्रमी होते. पण मारुतिरायांची शक्ती, बुद्धी विलक्षण होती. त्यांचाच अंशावतार समर्थ रामदास होते. श्रीराम हे भगवान विष्णूंचा अवतार होते. परब्रह्मस्वरूप होते. मारुतीने आपले सर्व सामर्थ्य बुद्धी त्या परब्रह्माच्या चरणी अर्पण करून श्रीरामांचे दास्यत्व करण्यातच श्रेष्ठत्व मानले. श्रीरामांनी ''तू माझा कोण आहेस ?'' असा प्रश्न हनुमंताला विचारताच,

**देहबुद्ध्या तु दासोऽहं । जीवबुद्ध्यात्वंदशकः ।**
**आत्मबुद्ध्या त्वमेवाहं । इति मे निश्चिता मतिः ।।**

देहपातळीवर मी तुमचा दास आहे, तर जीव पातळीवर तुमचा अंश आहे आणि आत्म्याच्या पातळीवर तुम्ही आणि मी एकच आहोत याबद्दल मला पूर्ण खात्री आहे असे समर्पक उत्तर मारुतिरायांनी दिले. भक्ताच्या अंतःकरणात परमेश्वरासंबंधी दृढ निष्ठा असली पाहिजे. मी त्यांच्या हातातील कळसूत्री बाहुली आहे हे स्पष्ट ज्ञान हवे. तो माझा स्वामी मी त्याचा सेवक हा भाव निष्ठापूर्वक जागृत ठेवला पाहिजे. हेच विचार समर्थांचे सुद्धा होते. हनुमंताची दास्यभक्ती सर्वात श्रेष्ठ मानली जाते. श्रीरामाप्रती मारुतीची लीनता नम्रता वाखाणण्यासारखी होती. तशीच निष्ठापूर्वक भक्ती समर्थांची होती. रामकर्ता ही जाणीव समर्थांना होती म्हणूनच ते,''मी करुनी अकर्ता'' असे म्हणतात.

**मी कर्ता ऐसे म्हणसी तेणे तू कष्टी होसी ।**
**रामकर्ता म्हणता पावसी । येश कीर्ती प्रताप ।।**

६/७/३६ ।। दासबोध

असा उल्लेख सहजसोप्या शब्दांत दासबोधात करतात.

प्रत्येक गोष्टीत रामाला पाहणे हा मारुतिरायाचा स्थायीभाव होता. राम नसेल तर ती गोष्टच नको. म्हणून सीतामाईनी दिलेला माळेतील मणी फोडून त्यात राम आहे कां ? असे पाहणारा मारुती सर्वश्रुत आहे.

तोच भाव मनांत ठेवून समर्थ म्हणतात,''तो गे तो चि तो राम सर्वत्र पाहे।'' सर्वही दैवतांमध्ये समर्थ 'रामच' पाहतात. जल आणि गार हे जसे तत्वतः एकच आहेत, तसेच प्रत्यक्ष मारुतीराय भक्तांसाठी साक्षात्, सघन रुप घेऊन 'समर्थ रामदास' म्हणुन आले. दोघेही तत्वतः भिन्न नाहीत. आराध्य व उपासक एकच असतात . भगवंत भक्तीची लीला करण्यासाठी आराध्य देव व भक्त बनतात अशा श्रीरामरूप समर्थांना सद्गुरुंना माझा नमस्कार असो.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

## दुरुस्ती

दासनवमी २०१३ विशेषांकामध्ये **पू. अनिरुध्द बापूंचे** लौकिक शिक्षण **एम. डी. (मेडिसीन)** ऐवजी एम. बी. बी. एस. असे छापले गेले आहे. त्याबद्दल आम्ही दिलगीर आहोत.

# दासनवमी कार्यक्रम वृत्ते

## 'हौशी भजनी मंडळ' रुणवाल इस्टेट, मानपाडा, ठाणे (प.)

या मंडळात मागील पाच वर्षांपासून 'ग्रंथराज दासबोधाचे' सामूहिक पारायण होत असून यावर्षीही दि. २६ फेब्रु. ते ६ मार्च २०१३ दासबोध पारायण करण्यात आले. वीस ते पंचवीस जणांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. दिनांक ६ मार्च (दासनवमी) रोजी जवळपास ८० जणांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

या मंडळात एकादशीचे सामूहिक भजन व वाचन होत असते. तसेच नवरात्रात देवीचे भजन घरोघरी जाऊन करण्यात येते. दररोज संध्याकाळी ५.०० वा. रामनाम जप व रामरक्षा व इतर स्तोत्रे म्हटली जातात. यावर्षी जानेवारीपासून महिन्याच्या पहिल्या दिवशी सज्जनगडावरील उपासना सुरू केली आहे.

**यावर्षी पारायण काळात 'रघुवीर समर्थ' अंकाचे वीस वर्गणीदार झाले आहेत.**

**सौ. पुष्पा विश्वनाथ प्रभुणे**, मो-९८२०१०४६६५

## दासनवमी उत्सव - पूर्णा (जि. परभणी)

दि. ६.३.२०१३ बुधवार रोजी दासनवमी उत्सव श्री.अनंत श्रीधर परांजपे यांच्या राहत्या घरी आनंदनगर, पूर्णा जि. परभणी येथे मोठ्या उत्साहात साजरा झाला.

श्री. अनंत परांजपे हे मागील ४० वर्षांपासून दासनवमी साजरी करतात. या कार्यक्रमात शहरातील अनेक स्तरांतील लोकांनी सहभाग नोंदविला. त्यात प्रामुख्याने श्री. व सौ. भाले, रानडे, लांबे, करंदीकर, पेडगावकर, राळेगावकर, चिटणीस, दीक्षित,परांजपे कुटुंबीय यांनी परिश्रम घेतले. उत्सवात सकाळी दासबोधाचे वाचन, सायंकाळी 'मनोबोध/समर्थ-उपासना इ. कार्यक्रम झाले. त्यानंतर परभणीहून आलेले स. भ. श्री.अनिल गणेश रामदासी (सेवा निवृत्त बँक अधिकारी) यांचे समर्थ चरित्र व त्यांचे विचार यावर प्रबोधन झाले. नंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. भक्तिभावाने झालेल्या कार्यक्रमात प्रत्यक्ष श्री रामदासस्वामींचे अस्तित्व जाणवले ते होणाऱ्या ''जय जय रघुवीर समर्थ'' या जयजयकाराने.

**श्री. अनंत परांजपे**, मो.०९४०३६४६४५१

## दासबोध मंडळ, सासवड, ता. पुरंदर, पुणे

सालाबादप्रमाणे याही वर्षी श्री. बुधकर राममंदिर सासवड येथे ''दासनवमीचा'' उत्सव करण्यात आला. सकाळी ९ ते १२ दासबोध वाचन व दुपारी ३.३० ते ५.३० प्रवचन, कीर्तन, व्याख्यान, भजन इत्यादी कार्यक्रम करण्यात आले. त्याचे आयोजन श्री. अप्पा खळदकर यांनी केले व कार्यक्रमाची धुरा सांभाळली.

**श्रीमती संजीवनी लिमये, पुणे, स्वामी शिवानंद सरस्वती, श्री. एके, सौ. जयश्री कुलकर्णी, सौ. उर्मिला प्रभुणे, श्री.निलेश शित्रे, श्री. क्षीरसागर, डॉ. सौ. राजुरकर, श्री.वेदान्त खळदकर, श्री. भोंगळे इ. वक्त्यांचे मार्गदर्शन उत्सवात लाभले.** श्रीदासनवमीस सौ. प्रतिभा शित्रे यांनी समर्थ चरित्रातील ''निर्वाण दिन'' वाचला. नंतर गुलाल फुले उधळून आरती केली. सकाळी १२ वाजता नंतर गौतमी जगताप यांच्याकडे महाप्रसाद करण्यात आला. जवळ जवळ प्रसादाचा लाभ १०० ते १२५ लोकांनी घेतला. त्याच दिवशी सेवेकऱ्यांना श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. अशी नऊ दिवसाच्या दासनवमीची उत्साहाने, बहुसंख्येने व सर्वांच्या परिश्रमाने सांगता झाली.

## लासलगाव, (नाशिक)

सरस्वती नगर, लासलगाव येथे मागील ६ वर्षांपासून कै. स.भ. राधाकृष्ण सखाराम कुलकर्णी यांच्या प्रेरणेने व स्मृतीप्रीत्यर्थ श्रीदासनवमी महोत्सव संपन्न होतो. यावर्षी हा उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या उत्सवात

सामुदायिक दासबोध पारायण, कीतर्न, भजन असे कार्यक्रम संपन्न झाले. सौ. सखी प्रदीप कुलकर्णी व दासबोध अभ्यास मंडळातील भगिनी व बंधुवर्ग या उत्सवात सक्रिय सहभाग होता.

## उपासना केंद्र-अहमदनगर

अहमदनगर शहरात यावर्षी श्री रामदास स्वामी संस्थान (सज्जनगड) संचालित उपासना केंद्र आणि श्री समर्थ मंडळ (ट्रस्ट) अहमदनगर विद्यमाने दासनवमी उत्सव दिनांक २६ फेब्रुवारी ते ६ मार्च २०१३ पर्यंत साजरा करण्यात आला. दिनांक २६ फेब्रुवारी दुपारी २ पासून श्री. ग्रंथराज दासबोध ग्रंथाचे पठण, त्यानंतर गडावरील दैनंदिन उपासना, दासनवमीपर्यंत नियमित उत्साहामध्ये करण्यात आली. व्यासपीठ प्रमुख श्री.उदय सभारंजक (प्रवरासंगम) यांनी जबाबदारी पार पाडली. दासनवमीच्या दिवशी (६ मार्च २०१३) ह.भ.प. राघव चैतन्य महाराज (पुणे) यांचे जाहीर कीर्तन झाले. काल्याची दहीहंडी फोडून सर्वांनी काल्याचा व खिरीचा (गव्हाच्या) प्रसाद घेतला.

ग्रंथराज दासबोध पारायणासाठी श्री. शेलार नाना पुणे (हरिभक्त) यांनी दासबोधाचे १०१ ग्रंथ समर्थ भक्तांना दिले. तसेच श्री.गिरीष सातोनकर यांनी सेवामूल्य रु.१०० घेऊन दासबोध ५० ग्रंथ पारायणासाठी दिले. या दोघांचे आम्ही आभार मानतो व लाख मोलाचे धन्यवाद देतो. पारायणासाठी श्री समर्थ मंडळाचे अध्यक्ष ॲड.अच्युतराव पिंगळे, श्री.सुनिल रामदासी (संचालक व माजी नगरसेवक) श्री.सचिन पारखी (सेक्रेटरी व नगरसेवक) श्री.अनंत हौशिंग(खजिनदार) व सर्व संचालक यांनी बहुमोल सहकार्य केले. तसेच नगर शहरातील अनेक दानशूरांनी आर्थिक सहकार्य करून दासनवमी उत्सव प्रसन्न वातावरणात संपन्न केला. या कामी श्री.के.पी.कुलकर्णी यांनी बहुमोल सहकार्य केले. श्री.हिलगुडे बी.के. यांनी उपासना केंद्र प्रमुख म्हणून या सर्वांचे आभार व्यक्त केले.

श्री दासनवमीच्या निमित्ताने दि. ३ मार्च २०१३ रोजी 'स्वर मंदिर' या सौ.वैजयंती तुंगार यांच्या घरी श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या दासबोध ग्रंथावर आधारित त्यांनीच स्वरचित, संगीत व गायन असा ''श्रीदासबोध स्तवनांजली'' हा गीतांचा कार्यक्रम सादर केला. हार्मोनियम वादन श्री.मकरंद खरवंडीकर यांनी केले व तबला वादन श्री.हर्षद भावे यांनी केले.

तसेच नगर आकाशवाणी ९०.४ या केंद्रावर सकाळी ११ ते १२.३० या वेळात सी.डी.माध्यमातून प्रसारित केला. श्रोत्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## गडहिंग्लज वृत्त

दिनांक २५/१/१३ रोजी समर्थनगर, भडगाव ता. गडहिंग्लज येथे दासनवमीच्या निमित्ताने समर्थ सेवा ट्रस्ट, भडगाव यांच्या वतीने मनाचे श्लोक पाठांतर स्पर्धा व निबंध स्पर्धा घेण्यात आल्या.

स्पर्धेमध्ये गडहिंग्लज तालुक्यातील जवळपासच्या गावातील विद्यार्थी व शिक्षक यांची उपस्थिती उल्लेखनीय होती. या स्पर्धेची सुरु वात सकाळी ठीक ११.०० झाली. आपल्या आयुष्यामध्ये पाठांतराचे किती महत्त्व आहे हे विद्यार्थ्यांना सांगत मा.श्री.आप्पा पाटगावकर यांनी स्पर्धेची सुरुवात केली. स्पर्धेमध्ये १ ली व २री साठी १ ते २५ मनाचे श्लोक व गणपतीची आरती, ३ री व ४ थी साठी २६ ते ५० मनाचे श्लोक व हनुमानाची आरती व ५ वी ते ७ वी या गटासाठी ५१ ते १०० मनाचे श्लोक व मारुतीस्तोत्र असे पाठांतराचे विषय ठेवण्यात आले होते. प्रत्येक गटातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

निबंध स्पर्धेसाठी खुला गट व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी दिलेले विषय-१) घडीने घडी सार्थकाची करावी २) श्रीसमर्थ एक कुशल समर्थ ३) श्रीसमर्थांची लेखनसंपदा ४) समर्थांचा उत्तम पुरुष ५) मुखी राम त्या काम वाधूं शकेना, ८ वी ते १० वी साठी १) आरोग्यम् धनसंपदा २) श्रद्धा व अंधश्रद्धा ३) सामर्थ्य आहे चळवळीचे ४) मी एक आदर्श नागरिक ५ वी ते ७ वी साठी १) यत्न तो देव जाणावा २) बहुत पाठांतर दे रे राम असे उत्कृष्ट विषय निबंध स्पर्धेसाठी दिले गेले होते.

या स्पर्धेसाठी प्रत्येक गटातून विद्यार्थी व शिक्षकांचा सहभाग उल्लेखनीय होता.

**सौ.संगीता सुनील पाटील**

## शेवगांव (जि. अहमदनगर) येथील श्रीराम मंदिरात श्रीदासनवमी उत्सव सोहळा संपन्न

शेवगांव जि.अ.नगर येथील श्रीराम मंदिरात श्रीराम मंदिर देवस्थानचे वतीने सालाबादप्रमाणे याही वर्षी 'श्रीदासनवमी उत्सव सोहळा' दि. २६/२/२०१३ ते मंगळवार दि. ६/३/२०१३ बुधवार पर्यंत मा.एस.व्ही. कुलकर्णी सर (सेवानिवृत्त प्राचार्य भारदे हायस्कूल, शेवगांव) यांच्या मार्गदर्शनाखाली पारंपारिक पद्धतीने व मोठ्या उत्साहात पार पडला.

सदर उत्सवामध्ये दररोज सकाळी ६ ते ७ मनाचे श्लोक, प्रदक्षिणा व प्रभात फेरी, सकाळी ७ ते ९ - श्रीमद् दासबोध पारायण व रात्रौ ७.30 ते ८.30 करुणाष्टके असे कार्यक्रम संपन्न झाले. यावर्षी सुमारे ८० स्त्री पुरुषांनी श्रीमद् दासबोध पारायणामध्ये सहभाग घेतला. यावर्षी या उत्सवांतर्गत श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले होते. श्रीक्षेत्र परळी वैजनाथ येथील भागवत कथाकार श्री. वे.शा.सं. लिंबेकर शास्त्री यांच्या सुश्राव्य वाणीत दु. २.30 ते ६ या वेळेत श्रीमद् भागवत कथा प्रवचन संपन्न झाले. तसेच श्री.तुकाराम चिक्षे सर यांनी संहिता पारायण वाचन केले.

यावर्षी या सोहळ्याचे निमित्ताने देवस्थानचे वतीने सामाजिक बांधिलकी म्हणून विद्यालयातील गरजू विद्यार्थिनींना सायकलचे वाटप करण्यात आले. सदर सायकल वाटप स्टेट बँक ऑफ इंडिया शेवगांवचे ब्रँच मॅनेजर मा. श्री. सतिश यादव साहेब व पंचायत समिती शेवगांवचे उपसभापती मा.श्री.अरुण पाटील लांडे यांचे शुभहस्ते झाले. यावेळी योगायोगाने प्रसिद्ध सिने अभिनेते श्री. नंदू माधव (हरिश्चंद्राची फॅक्टरी फेम) प्रवासादरम्यान असल्याने सदर कार्यक्रमास उपस्थित राहिले. त्यांनी देवस्थानच्या या कार्यक्रमाचे कौतुक करून उपस्थितांना मार्गदर्शन केले. श्रीदासनवमीचे दिवशी सकाळी गावातून ग्रंथ मिरवणूक झाली. त्यानंतर समर्थ भक्त मा.श्री.एस.व्ही.कुलकर्णी सरांनी श्रीसमर्थ निर्याण कथा सांगितली व त्यानंतर या उत्सवाचा समारोप झाला व सांगता झाली. सदर उत्सवासाठी श्रीराम मंदिर देवस्थानचे अध्यक्ष श्री.अरुणराव गालफाडे विश्वस्त राजेंद्र गालफाडे व प्रकाश गालफाडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

**संस्थानने केलेल्या आवाहनानुसार आम्ही शेवगांवकरांचे वतीने १०१ नवीन लोक रघुवीर समर्थ मासिकाचे वर्गणीदार केले आहेत.**

## निंबेनांदूर येथे दासनवमी उत्सव संपन्न

शेवगांव तालुक्यातील निंबेनांदुर या सुमारे दोन-अडीच हजार लोकवस्तीच्या गावी त्या गावचे रहिवासी स.भ.सराफ व सेवानिवृत्त अध्यापक श्री.चंद्रकांत पंडित सर यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीदासनवमी उत्सव सोहळा संपन्न झाला. यावेळी गावातील स्त्री पुरुषांनी श्रीमद् दासबोध पारायणात सहभाग घेतला. तसेच त्याच गावातील ३०-४० महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थिनींना घेऊन हा उत्सव अत्यंत उत्साहात साजरा झाला.

सुमारे तीन वर्षांपूर्वी श्री.पंडित सरांनी गावकऱ्यांच्या संपूर्ण सहभागातून एक टुमदार श्रीराम मंदिर गावात उभारले व गत सालापासून याच मंदिराच्या सभागृहात दासनवमी उत्सव साजरा होत आहे. श्री. पंडित सरांनी स्वखर्चाने विकत घेऊन श्रीदासबोध ग्रंथ पारायणासाठी उपलब्ध करून दिले.

सर्वात वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे दासनवमीचे दिवशी वारकरी संप्रदायानुसार भजन कीर्तन झाले व त्यानंतर निर्याण कथेचे निरूपणानंतर सर्व समर्थ भक्तांनी प्रत्येकाने आमटी भाकरी आणून काला केला व महाप्रसादाचा लाभ घेतला व उत्सवाची सांगता झाली. योजकस्तत्र दुर्लभः।

## उपासना केंद्र भोपाळ (म.प्र.)

श्रींचा व समर्थ सद्‌गुरुंच्या अनुकंपेने व श्रीरामदास स्वामी संस्थान सज्जनगडच्या, संपर्क कार्यालयाद्वारे निर्देशित व आपल्या सर्वांच्याच आशीर्वादाने, माघ कृष्ण प्रतिपदा शके १९३४ ते तदानुसार माघ कृष्ण नवमी शके १९३४ पर्यंत श्रीमद् दासबोधाचे सामूहिक वाचन, वरील कार्यालयावर दुपारी १.३० पासून सायं. ४.१५ पर्यंत, व त्यानंतर गडावरील होणाऱ्या उपासनेच्या कार्यक्रमात करण्यात येत होता. यात दररोज सुमारे १५ ते २५ बंधु-भगिनींची उपस्थिती राहत होती.

दिनांक २ मार्च २०१३, शनिवार सायं ६ वा. ह.भ.प. अभिषेक शेवडे, विदिशा यांचे कीर्तन व ५ मार्च २०१३ मंगळवार सायं. ६ वा. श्री.जयंत पुराणिक यांच्याद्वारे समर्थगीत याची प्रस्तुति करण्यात आली, कार्यक्रम फारच सुंदर होता दोन्ही कार्यक्रमांत बरीच गर्दी होती त्यामुळे आपले कार्यालय लहान भासत होते.

दिनांक ६ मार्च २०१३ बुधवार श्रीमद् दासबोध वाचन, मनाचे श्लोक व उपासनाची सांगता करण्यात आली. नंतर दुपारी १ वा. ७५ पेक्षा जास्त पानांचा महाप्रसादाचा कार्यक्रम संपन्न झाला.

**- श्रीमती आशाताई सोले, श्रीमती उषाताई लाम्बोर**

## जबलपुर

समर्थ भक्त परम पूज्यनीय कमल ताई रामदासी की प्रेरणा और मार्गदर्शन तथा डा. शिरीष जामदार, अध्यक्ष, समर्थ रामदास सेवासमिती, जबलपूर के नेतृत्व में श्री दत्त भजन मंडल और समर्थ रामदास सेवासमिति के संयुक्त तत्वधान में प्रति वर्ष की तरह इस वर्ष भी श्रीदासनवमी महोत्सव का आयोजन दिनांक २६ फरवरी से ६ मार्च तक स्थानीय दत्त मंदिर में आयोजित किया गया।

उत्सव के अंतर्गत भजन, भक्तिगीत, हनुमानचालीसा, करुणाष्टके, सुन्दरकाण्ड, संयुक्त शोभायात्रा तथा चिंतन विचार का कार्यक्रम रखा गया था। ग्रंथराज दासबोध का चक्रीय पारायण भी किया गया, जिसमे नारी शक्ति एवं पुरुषो ने भी बड़ी संख्या में भाग लिया। कार्यक्रम के अंतर्गत आर्ट ऑफ लिविंग द्वारा भजन की प्रस्तुति दी गई जिसमे बंगलुरु से पधारे श्री अभिषेकजी ने सुन्दर भजन प्रस्तुत किए। श्री श्रीकांत भुसारी जी द्वारा मनमोहक भक्तिगीत प्रस्तुत किया गए। श्री.राजेंद्र नेमा जी की मंडली द्वारा हनुमानजालीसा एवं श्री शरद आठलेजी ने सुन्दरकाण्ड का वाचन किया। डा.जितेंद्र जामदार जी ने स्वामी रामदासजी एवं श्री.विवेकानंदजी के बारे में सारगर्भित चिंतन विचार प्रस्तुत किये। डा.मनीषा व्यास द्वारा 'गुरु तत्व'' पर प्रकाश डाला। महोत्सव के अंतिम दिन और दिनांक ६ मार्च को उपस्थित जनसमुदाय द्वारा श्री दासबोध के अंतिम समास का सामुहिक वाचन और श्रीराम जयराम जयजय राम मंत्र का जाप किया गया। श्री अभय गोरे द्वारा ''प्रपंच और परमार्थ'' विषय पर मराठी में चिंतन विचार प्रस्तुत किए गये, तत्पश्चात महाप्रसाद का वितरण किया गया।

चिंतन विचार कार्यक्रमों का संचालन क्रमशः श्री अभय गोरे, विश्वास पाटणकर तथा नितिन देसाई द्वारा एवं धन्यवाद जापन समिति के सचिव नितिन देसाई ने किया। सम्पूर्ण कार्यक्रमों की सफलता के लिए अधिवक्ता उदय देशमुख, श्री. दिगंबर फाटक, सुरेश बेहेरे, दिलीप बेदरकर, राजेश तोफखानेवाले, विनोद चव्हाण, बलवंत भावे, दिलीप सप्रे, राजू कोतवाल, श्रीपाद परांजपे, श्रीमती रोहिणी बेहेरे, विजया देसाई, निताली देसाई, जयश्री कुलकर्णी, भाग्यश्री पाटणकर, नीला सरवटे, सुचेता यावलकर, नयना यावलकर, मंगला फाटक, स्नेहा आठले, अमिता ठोसर, रूपा तेलगांवकर विशेष सहयोग तथा चैतन्य ओक, सतीश देशपांडे, दत्तात्रय कुलकर्णी एवं श्रीमती श्रद्धा बंगारे का अप्रत्यक्ष रूप से सहयोग रहा।

**नितीन देसाई**, सचिव,
समर्थ रामदास सेवा समिति, जबलपुर

## ‘रघुवीर समर्थ’ मासिकाची वर्गणी भरण्यासाठी व जाहिरात, पृष्ठप्रायोजन सेवा करण्यासाठी मासिकाच्या पुढील प्रतिनिधींशी संपर्क करावा.

### मासिक ‘रघुवीर समर्थ’ प्रतिनिधी

| | नाव | ठिकाण | भ्रमणध्वनी |
|---|---|---|---|
| १) | श्री. ठोंबरे श्रीपाद रघुनाथ | बारामती | ९६८९६०३६६६ |
| २) | श्री. माधव रामचंद्र देशपांडे | सांगली | ९८६०२४२४२३ |
| ३) | श्री. तुकाराम गोविंदराव मार्कंडेय | जालना | ९४२३४५७६६५ |
| ४) | श्री. सुधाकर भगवान रामदासी | बीड | ९४०३४८६६६९ |
| ५) | डॉ. अशोक नारायणराव कुलकर्णी(सेलगांवकर) | परभणी | ७५८८५७१६०१ |
| ६) | श्री. सोपान रामभाऊ तिडके | जालना | ९४२१४२५५७८ |
| ७) | सौ. निशा श्रीकांत महाशब्दे | नंदुरबार | ९८२३५४८६४९ |
| | | | ९४२१५२४२३८ |
| ८) | सौ. पुष्पा विश्वनाथ प्रभुणे | ठाणे(मानपाडा) | ९८२०१०४६६५ |
| ९) | श्री.दिलीप दिनकर जोशी | बुलढाणा | ९८५००७९४६७ |
| १०) | श्री. केदार कृष्णनाथ कुलकर्णी | वाई | ९९२२२३४००३ |
| ११) | श्री. दिलीपकुमार पोपटराव माने | करमाळा (जि. सोलापूर) | ८००७२२७७७५ |
| १२) | श्री. रामचंद्र भगवंत गौरकर | बार्शी (जि. सोलापूर) | ९७६३१३८८२६ |
| १३) | श्री. संजय हरिदास पाटील | पंढरपूर | ८४४६४१९१४२ |
| १४) | सौ. सखी प्रदीप कुलकर्णी | लासलगाव(जि.नाशिक) | ९२७२२५१०३० |
| १५) | श्री.नरेंद्र कवडे | पंढरपुर | ९४२१०३१७३२ |
| १६) | श्री. स्वानंद कुलकर्णी | मिरज | ९४२२६१५६१९ |
| १७) | श्री. अनिल शिवाजीराव मुळे | औरंगाबाद | ९४२३१४८४८२ |
| १८) | श्री. प्रदीप नातू | कल्याण | ९९६७३७९३१६ |
| १९) | श्री. कुलकर्णी अशोक दिगंबर | (अंबरनाथ) ठाणे | ९८६९४६८५२० |
| २१) | श्री. धीरज पेटकर | (फलटण) सातारा | ९४२१११९६११ |
| २२) | श्री. रोहित कुलकर्णी | परभणी | ९८९०५३११३३ |
| २३) | श्री. शरद वामन बारपांडे | चाळीसगांव | ९७६७२५४७२८ |
| २४) | श्री. उदय लक्ष्मीकांत सभारंजक | नेवासा(जि. अहमदनगर) | ९८८११७७०२६ |
| २५) | श्री. सुधीर रामदासी | निलंगा(लातूर) | ८०५५१०४०६३ |
| २६) | श्री. संतोष कुसूरकर | कोयाळ (जि. अहमदनगर) | ९३२६६९९९८४ |
| २७) | श्री. श्रीधर सीताराम रामदासी | माजलगांव(जि.बीड) | ९४२३७५७३५२ |
| २८) | श्री. नितिन देसाई | जबलपूर(म.प्र.) | ०९४२५८००८९२ |
| २९) | श्री. विनोद चावरे | नांदेड | ९४२३१३५६७५ |
| ३०) | श्री. रोहित गौरीशंकर वाळिंबे | (भोर)पुणे | ७८७५६३१५०५ |
| ३१) | श्री.सोपान तिडके | जुना जालना | ९४२१४२५५७८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२) | श्री.एस्.व्ही.कुलकर्णी (सर) | शेवगांव (अ.नगर) | ९४२०२४१६०१ |
| ३३) | श्री. बळवंत कृष्णाजी हिलगुडे | अ.नगर | ९९६००१८९६१ |
| ३४) | श्री. प्रकाश भास्कर रामदासी | अ.नगर | ९८८१५९९६९९ |
| ३५) | श्री. राजेश चांदेकर | नागपूर | ९९३०२३९११७ |
| ३६) | श्री. जयंत कुलकर्णी | चिंचवड (पुणे) | ०२०/२७३५३०३६ |
| ३७) | श्री. आदित्य देशपांडे | यवतमाळ | ९९७५६६५२९९ |
| ३८) | श्री. अभिजीत घनवटकर | गणपतीपुळे | ९१५८६०७०३० |
| ३९) | श्री. श्रीकांत ठुसे | पुणे | ९४२३५७२५७५ |
| ४०) | श्री. महेश पुरुषोत्तम टिल्लू | अलिबाग | ८८०५०२२४३३ |
| ४१) | श्री. श्रीराम रामदासी | अंबेजोगाई (जि. बीड) | ९४२२९६८२०३ |
| ४२) | श्री. विनोद रामदासी | दिंडोरी (जि. नाशिक) | ९६०४१५४८०७ |
| ४३) | श्री. राजेश कुलकर्णी | सोलापूर | ९८५०९३२६३१ |
| ४४) | श्री. रामदास तुपे | औरंगाबाद | ९४२१६६५३७३ |

**अधिक माहितीसाठी संपर्क : श्री. रवि देशपांडे – ९४०५५४२४६१ (सातारा कार्यालय)**

# रघुवीर समर्थ मासिक सभासदांशी हितगुज

- ‘रघुवीर समर्थ मासिक’ प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला पोस्टामार्फत पाठविले जाते.
- महिन्याच्या २५ तारखेपर्यंत मासिक न मिळाल्यास कृपया स्थानिक पोस्ट ऑफिसमध्ये चौकशी करावी.
- एखाद्या महिन्याचा अंक न मिळाल्यास २५ तारखेनंतर स्थानिक प्रतिनिधी अथवा सातारा कार्यालयाकडे संपर्क केल्यास आपणास दुसरी प्रत पाठविण्याची व्यवस्था केली जाईल.
- **अंकासंबंधी समस्या निवारणासाठी संपर्क –**
  **श्री. रवि देशपांडे – ९४०५५४२४६१ (सातारा कार्यालय)**
- मासिकाची वर्गणी–
  **वार्षिक वर्गणी– रु. १५०/–, चार वर्षांसाठी – रु. ५००/–आठ वर्षांसाठी – रु. १०००/–**
- कोणत्याही महिन्यापासून वर्गणीदार होता येते.
- मासिकाच्या कव्हर पाकिटावर आपल्या पत्त्याच्या खालील बाजूस वर्गणी संपण्याचा कालावधी दिलेला आहे. कृपया वर्गणीदारांनी तो पाहून एक महिना आधीच वर्गणी M.O. किंवा D.D. ने पाठवावी किंवा खालील बँक खात्यात आपण **चेकने** किंवा **ऑनलाइन** जमा करावी.

**श्रीरामदास स्वामी संस्थान, सज्जनगड IDBI Bank, Satara City Branch,**

**बचत खाते क्र. 45110010830237 IFSC - IBKL 0000451**

- वर्गणी पाठविल्याची माहिती एका स्वतंत्र पोस्टकार्डवर किंवा ईमेल द्वारे किंवा एस.एम.एस. करून आपले संपूर्ण नाव व पत्ता दूरध्वनी क्रमांकासहित कळवावी. ‘‘**रघुवीर समर्थ**’’ साठी असा उल्लेख करावा.

**❁ मासिकाची वर्गणी पाठविण्याचा पत्ता ❁**

**श्रीरामदास स्वामी संस्थान, सातारा कार्यालय**

**‘चंद्रहास’ प्लॉट नं. ३६ ब, सर्व्हे नं. ४६७/७ अ, उत्तेकरनगर, सदरबझार, सातारा ४१५००१.**

ई–मेल : raghuvirsmasik@gmail.com

# श्री दासनवमी महोत्सव, सज्जनगड शके १९३४



सज्जनगडावरील श्री समर्थांची उत्सवमुर्ती



श्री अंगाई देवीची पूजा करताना
संस्थानचे अध्यक्ष श्री. भूषण स्वामी व सौ. भार्गवी स्वामी



उत्सवातील छबिन्यात सहभागी झालेले समर्थ भक्त



श्री समर्थ समाधीस तेरा प्रदक्षिणा



सांप्रदायिक भजन करताना अध्यक्ष व अधिकारी स्वामी
श्री. भूषण स्वामी, श्री. शहाजीबुवा रामदासी व समर्थ भक्त



अध्यात्म रामायणातील सुंदरकांडाचे निरुपण करताना
श्री. राघवेंद्रबुवा देशपांडे रामदासी



श्री समर्थांची निर्याणकथा सांगताना श्री. मोहनबुवा रामदासी



महाप्रसाद

RNI - MHMAR/2007/19142 Regd. No. SATARA/036/2013-2015

# श्री दासनवमी महोत्सव, सज्जनगड शके १९३४



सज्जनगड पाणी पुरवठा योजनेच्या उद्घाटन प्रसंगी मा.आ.श्री.छ.शिवेंद्रराजे भोसले,मा.आ.श्री.शशिकांत शिंदे, जि.प.अध्यक्षा सौ.अरुणादेवी पिसाळ,श्री.फरोख कुपर, श्री.बाळासाहेब स्वामी, श्री.भूषण स्वामी, श्री.राजीव भोसले



रघुवीर समर्थ मासिकाचा दासनवमी विशेषांक व ग्वाल्हेर (म.प्र.) येथून प्रकाशित होणाऱ्या हिंदी आवृत्तीच्या प्रथम अंकाचे प्रकाशन करताना उपस्थित मान्यवर



डॉ.स्वर्णलता भिशिकर यांनी उत्सवात श्री समर्थ समाधीसमोर प्रवचन सेवा केली.

श्री.रविंद्र कुलकर्णी श्री समर्थ समाधीसमोर गायन सेवा करताना

सौ.शिल्पा पुणतांबेकर श्री समर्थ समाधीसमोर गायन सेवा करताना



श्री माणिकप्रभु संस्थान,माणिकनगरचे सचिव व श्री माणिकप्रभुंचे वंशज श्री.आनंदराज माणिकप्रभु यांनी श्री समर्थ समाधीसमोर शास्त्रीय गायन सादर केले सोबत श्री.जयंत केजकर

राष्ट्रीय कीर्तनकार श्री.भरतबुवा रामदासी श्री समर्थ समाधीसमोर कीर्तन सेवा करताना

प्रेषक :

प्रति,

।। रघुवीर समर्थ ।।

श्री रामदास स्वामी संस्थान,श्री रामदास स्वामींचा मठ,
सज्जनगड, जि. सातारा, पि.४१५ ०१३. फोन : (०२१६२) २७८२२१